प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
# पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

## सामाजिक न्यायाचा विजय : पंतप्रधान मोदी



रालोआच्या अभूतपूर्व यशावर प्रतिक्रिया व्यक्त करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा सामाजिक न्यायाचा विजय असल्याचे म्हटले आहे. या निवडणुकीत बिहारच्या जनतेने रालोआला आशीर्वाद देत ऐतिहासिक आणि अभूतपूर्व विजय मिळवून दिला आहे. बिहारच्या जनतेचे मन:पूर्वक आभार. हा प्रचंड जनादेश आम्हाला जनता जनार्दनाची सेवा करण्यासाठी आणि बिहारसाठी नवनवे संकल्प राबविण्यासाठी शक्ती देईल, असा विश्वासही मोदी यांनी व्यक्त केला आहे.

## बिहारच्या विकासाला गती येईल : नितीश कुमार

नितीश कुमार यांनी या विजयाचे श्रेय बिहारचे मतदार आणि रालोआतील एकजुटीला दिले आहे. मतदारांनी आमच्यावर विश्वास ठेवून भरघोस मते दिली. त्याबद्दल मतदारांचे मन:पूर्वक आभार मानतो, त्यांना नमन करतो, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले सहकार्य आणि एलजेपीचे चिराग पासवान, जीतन राम मांझी आणि उपेंद्र कुशवाह यांचेही त्यांनी आभार मानले. तसेच या सर्वांच्या सहयोगाने बिहारची घोडदौड सुरू राहील, विकासाला गती येईल, असे त्यांनी म्हटले आहे.

मुंबई शनिवार, १५ नोव्हेंबर २०२५ । स्थापना वर्षे ८७ । मुंबई आवृत्ती वर्ष १६ वे । मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अहिल्यानगर, नाशिक, सोलापूर, बीड, परभणी, हिंगोली, बेळगाव, गोवा येथून एकाचवेळी प्रसिद्ध. KLR-005/2024-2026 पाने १६ (१२+४) । किंमत ₹ ५

# बिहारात भगवी त्सुनामी; भाजपने रचला इतिहास!

## एनडीएला दणदणीत बहुमत; 'महागठबंधन'चा धुव्वा

### एनडीए २०० पार

- काँग्रेसचा दारुण पराभव
- लालूप्रसाद यांना मोठा धक्का

● या निवडणुकीत सर्वाधिक मतांची टक्केवारी राष्ट्रीय जनता दला (राजद)ची आहे. राजदच्या मताची टक्केवारी २३ टक्के, त्या खालोखाल भाजप २०.८ तर मित्रपक्ष जेडीयूच्या मतांची टक्केवारी १९.२५ टक्के आहे. । पान २




बिहार पक्षीय बलाबल

| | 2020 | 2025 |
|---|---|---|
| भाजप | 74 | 89 |
| जदयू | 43 | 75 |
| राजद | 75 | 22 |
| एलजेपी | 01 | 17 |
| काँग्रेस | 19 | 06 |
| एमआयएम | 05 | 05 |
| एचएएमएस | 04 | 05 |
| इतर | 04 | 09 |



नवी दिल्ली : बिहार विधानसभा निवडणुकीतील ऐतिहासिक विजयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भाजप मुख्यालयात आगमन झाल्यानंतर त्यांचे पुष्पवृष्टी करून जल्लोषी स्वागत करण्यात आले. भाजप अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्यासह अन्य पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. (फोटो : पीटीआय)

पाटणा : वृत्तसंस्था

देशाच्या राजकारणावर मोठा प्रभाव टाकणाऱ्या बिहार विधानसभा निवडणुकीत भगवी त्सुनामी आली असून भारतीय जनता पक्ष आणि जेडीयू या प्रमुख पक्षांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) ने सुस्पष्ट बहुमत मिळवत सत्तास्थापनेवर शिक्कामोर्तब केले. एनडीएने दोनशेचा आकडा (२०२) पार केला. विशेष म्हणजे या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने 'न भूतो' यश मिळवले. ८९ जागा मिळवत सर्वांत मोठा पक्ष ठरण्याचा मान भाजपने मिळवला. त्या खालोखाल नितीश कुमार यांच्या जेडीयूने ८५ जागा मिळविल्या; तर विरोधी महागठबंधनचे मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार तेजस्वी यादव यांचा राष्ट्रीय जनता दल (राजद) तिसऱ्या क्रमांकावर फेकला गेला. या पक्षाला केवळ २५ जागा मिळाल्या. काँग्रेसचा दारुण पराभव झाला असून केवळ सहा जागाच निवडून आल्या. तेथे या पक्षाच्या अस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला आहे. एकूणच विरोधकांच्या महागठबंधनचे या निवडणुकीत अक्षरश: पानिपत झाले. एनडीएने बहुमतासाठी लागणारा १२२ चा आकडा केव्हाच पार करत २०२ पर्यंत मजल मारली आणि इतिहास घडवला. या निवडणुकीतही मोदींचा करिष्मा कायम असल्याचे दिसून आले.

● मोदींचा करिश्मा कायम । पान २

## एनडीएच्या विजयाची ५ कारणे

१ **जागावाटपाचा निर्दोष फॉर्म्युला :** एनडीएच्या निर्णायक विजयाला निवडणुकीपूर्वीच अंतिम रूप देण्यात आलेल्या आणि काटेकोरपणे तयार केलेल्या जागावाटपाचा फॉर्म्युला कारणीभूत ठरला.

२ **जंगलराजचा मुद्दा रेटला :** एनडीएने लालू-राबडीदेवी यांच्या काळातील अराजकता आणि जंगलराज मुद्दा जोरकसपणे मांडत मतदारांत भीतीचे वातावरण निर्माण केले.

३ **व्यापक जातीय समीकरण :** एनडीएच्या विजयाचे आणखी एक प्रमुख कारण म्हणजे जातीय समीकरण.

४ **महिलांसाठी कल्याणकारी योजना :** सुपौल, किशनगंज आणि मधुबनीसारख्या अनेक जिल्ह्यांमध्ये पुरुषांपेक्षा महिलांनी १०-२० टक्के जास्त मतदान केले.

५ **नितीश कुमारांची प्रतिमा :** नितीश कुमार यांनी बिहारात आपली प्रतिमा स्वच्छ ठेवली, वय आणि प्रशासनाच्या आव्हानांबद्दल ते सर्वात विश्वासार्ह नेतृत्व असल्याचे सिद्ध केले.

## काँग्रेसचे लवकरच विभाजन होणार

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भाकीत

नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा

काँग्रेस पक्षाचा अजेंडा हा मुस्लिम लीग आणि माओवादाभोवती फिरत आहे. त्यामुळे आजची काँग्रेस मुस्लिम लीग, माओवादी काँग्रेस (एमएमएस) बनली आहे, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी काँग्रेसवर घणाघाती टीका केली. वेगळा अजेंडा असलेल्या काँग्रेसमध्ये पुन्हा एकदा मोठी फूट पडू शकते, असे भाकीतही त्यांनी केले.

● आजची काँग्रेस मुस्लिम लीग, माओवादी काँग्रेस असल्याचा घणाघात; बिहारनंतर आता प. बंगालमधील जंगलराज संपविणार

बिहार विधानसभा निवडणुकीतील एनडीएच्या ऐतिहासिक विजयानंतर भाजप मुख्यालयामध्ये उपस्थितांना ते संबोधित करत होते. यावेळी त्यांनी काँग्रेस, राजद यांच्यावर जोरदार टीका केली. तसेच ऐतिहासिक विजयाबद्दल भाजप आणि एनडीएच्या नेत्यांचे आणि कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले. बिहार जिंकल्यानंतर आता प. बंगालही जिंकणार, तेथील जंगलराजही संपविणार, अशा शब्दांत पंतप्रधान मोदी यांनी विरोधकांना इशारा दिला. यावेळी भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह वरिष्ठ नेते आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज काँग्रेस /...८

## मुख्यमंत्री कोण?

● बिहारात भाजप सर्वांत मोठा पक्ष ठरल्याने मुख्यमंत्री बदलला जाईल, अशी जोरदार चर्चा आहे. या पार्श्वभूमीवर भाजपचे बिहार प्रभारी विनोद तावडे म्हणाले की, नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखालीच आम्ही निवडणूक लढलो. आता पुढे मुख्यमंत्रिपदाबाबत कोणता निर्णय घ्यायचा, हे एनडीएतील सर्व पक्ष मिळूनच ठरवतील.

## प्रमुख पराभूत

- तेज प्रताप यादव (महुआ)
- शत्रुघ्न यादव (खेसारीलाल यादव) (छपरा)
- त्रिपुरारी कुमार तिवारी ऊर्फ मनीष कश्यप (चनपटिया)

## प्रमुख विजयी

- तेजस्वी प्रसाद यादव (राघोपूर/राजद)
- अनंत कुमार सिंह (मोकामा/जदयू)
- श्रेयसी सिंह (जमुई/भाजप)
- सम्राट चौधरी (तारापूर/भाजप)
- मैथिली ठाकूर (अलीनगर/भाजप)
- विजय कुमार सिन्हा (लखीसराय/भाजप)
- मंगल पांडे (सीवान/भाजप)
- रेणू देवी (बेतिया/भाजप)
- ओसामा शहाब (रघुनाथपूर/राजद)
- विजय कुमार चौधरी (सरायरंजन/जदयू)
- आनंद मिश्रा (बक्सर/भाजप)

## राज्यात महायुतीची ५०-५० टक्केच युती

### अर्ध्या ठिकाणी आमने-सामने

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

बिहार विधानसभा निवडणूक निकाल लागत असताना राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचे वातावरण तापले आहे. राज्यात महायुती ५० टक्के ठिकाणी युती करेल तर ५० टक्के ठिकाणी स्वतंत्र लढणार असल्याचे समजते. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्ष जोरदार तयारी करत आहेत. यामध्ये महायुतीची कुठे कुठे युती होईल आणि कुठे होणार नाही याची उत्सुकता राजकीय वर्तुळात आहे. या पार्श्वभूमीवर सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कल्याण-डोंबिवलीमध्ये महायुतीची युती फुटणार तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातही युती नसणार आहे. मात्र रत्नागिरी, धाराशिव या जिल्ह्यांमध्ये युती होणार आहे. काही ठिकाणी अजूनही युतीसंदर्भात चर्चा सुरू असून महत्त्वाच्या ठिकाणी शेवटच्या क्षणी निर्णय घेतला जाऊ शकतो.

## आज ना उद्या, भाजपची जेडीयुशिवाय सत्ता?

नवी दिल्ली : उमेश कुमार

पुढारी विशेष

बिहार विधानसभा निवडणुकीत एनडीएच्या ऐतिहासिक विजयामुळे सत्तेची दिशा पूर्णपणे बदलली आहे. निकालांसह मुख्यमंत्र्यांच्या पदावर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. पाटण्यापासून दिल्लीपर्यंत, सत्तेचा चेहरामोहरा बदलेल का असा प्रश्न आहे. नितीश कुमार शपथ घेतील, परंतु ते पूर्ण कार्यकाळ टिकू शकतील याची खात्री नाही. पहिल्यांदाच भाजप जेडीयुशिवाय सरकार स्थापन करण्याच्या स्थितीत आहे. परिणामी येत्या काही महिन्यांत मुख्यमंत्र्यांचे स्थान बदलू शकते आणि बिहारमध्ये महाराष्ट्रासारखे राजकीय परिदृश्य उदयास येऊ शकते, अशी अटकळ आहे.

यामागील संपूर्ण रचना निवडणूक आकडेवारीवर आधारित आहे. जर भाजप, लोजपा, एचएएम आणि आरएलएम यांना जोडले तर एनडीए सहजपणे बहुमताचा आकडा ओलांडेल. अशा परिस्थितीत नितीश कुमार यांना मुख्यमंत्रिपदी का ठेवावे यावर अशी चर्चा होणे स्वाभाविक आहे. तथापि केंद्रातील भाजप /...८








# निवडणूक निकाल २०२५ बिहार विधानसभा



# बिहारात मोदींचा करिश्मा कायम; मतचोरीचा मुद्दा फेल

**पाटणा : वृत्तसंस्था**

बिहार विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने लावून धरलेला मतचोरीचा मुद्दा सपशेल फेल गेला आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा करिश्मा लोकसभेप्रमाणेच या निवडणुकीतही कायम राहिला. रात्री सव्वाअकराच्या सुमारास सर्व २४३ जागांचे निकाल घोषित झाले असून, त्यात एनडीएतील भाजप ८९, जेडीयू ८५, एलजेपी १९ तर महागठबंधनमधील राजदचे २५ उमेदवार विजयी झाले. या आघाडीला एकूण ३५ जागाच मिळाल्या. विशेष म्हणजे एमआयएमने ५ जागा जिंकल्या.

बिहार विधानसभेच्या २४३ जागांसाठी ६ आणि ११ नोव्हेंबर अशा दोन टप्प्यांत मतदान झाले. सरासरी ६६.९१ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावून नवा इतिहास घडवला. गेल्या ७५ वर्षांतील हा सर्वोच्च मतदानाचा विक्रम ठरला. त्यातही महिलांच्या मतदानाचा टक्का ८.८० टक्क्यांनी अधिक आहे. त्यामुळे हा वाढलेला टक्का कोणाला धक्का देणार याचे औत्सुक्य होते.

त्यातच मतदार पुनरिक्षण मोहीम (एसआयआर) आणि मतचोरीच्या मुद्द्यावरून निवडणूक जाहीर होण्याच्या आधीपासूनच विरोधकांनी रान उठविल्यामुळे ही निवडणूक लक्षवेधी होणार अशी चिन्हे होती.

एसआयआर आणि मतचोरीच्या मुद्द्यांवरून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी राज्यात मत अधिकार यात्राही काढली होती. तिला प्रचंड प्रतिसाद मिळाला होता. मात्र यात्रेत सहभागी झालेल्या या गर्दीचे मतात परिवर्तन करण्यात महागठबंधन अपयशी ठरली. मतचोरीचा मुद्दा सपशेल फेल ठरला. विशेष म्हणजे काँग्रेसने सपाटून मार खाल्ला असून पक्षाच्या अस्तित्वालाच घरघर लागली. निवडणूक रणनीतिकार प्रशांत किशोर यांचा जनसुराज पक्ष अजिबात प्रभाव पाडू शकला नाही. त्यांचा पक्ष भोपळाही फोडू शकला नाही.

शुक्रवारी सकाळी मतमोजणी सुरू झाली. सुरुवातीला घेण्यात आलेल्या टपाल मोजणीमध्ये भाजप, जदयू आणि राजद यांच्यात 'काँटे की टक्कर' पाहायला मिळाली. तिन्ही पक्षांचे प्रत्येकी किमान ७० उमेदवार आघाडीवर असल्याचे दिसू लागल्याने उमेदवारांसह नेतेमंडळींचीही घालमेल होत होती. त्यातही कधी जदयू तर कधी भाजपचे उमेदवार आघाडी घेत होते. या टप्प्यावर राजदने काही वेळा आघाडी घेतली होती. चिराग पासवान यांच्या नेतृत्वाखालील लोजपचा एकही उमेदवार आघाडीवर नव्हता.

दुपारी अडीचच्या सुमारास राजदची आघाडी कमालीची घटायला सुरुवात झाली आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीची घोडदौड सत्तास्थापनेच्या दिशेने होत गेली ती शेवटपर्यंत कायम राहिली. कल स्पष्ट होताच भाजप-जदयू उमेदवारांच्या समर्थकांनी फटाकेबाजी आणि गुलालांची उधळण करत प्रचंड जल्लोष सुरू केला.

या निवडणुकीत एनडीएतील प्रमुख पक्ष भाजप आणि जेडीयूने प्रत्येकी १०१ जागा लढविल्या होत्या. तर एलजेपीला २९ जागा दिल्या होत्या. हिंदुस्थानी आवामी मोर्चा (सेक्युलर) (हम) आणि राष्ट्रीय लोक मोर्चा (आएलएम) प्रत्येकी सहा जागा लढवल्या होत्या. भाजपचे चाणक्य आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली रालोआच्या प्रचाराची रणनीती ठरविण्यात आली होती. त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह स्टार प्रचारकांची फौज मैदानात उतरविण्यात आली होती. बिहारची निवडणूक नितीश कुमार यांच्याच नेतृत्वाखालील लढविण्यात येईल, अशी घोषणा भाजपने केली होती. ती कायम ठेवत भाजपने मतदारांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण केले. त्यातच महिलांच्या खात्यात रोख दहा हजार टाकून विरोधकांच्या टीकेची धार बोथट केली. त्याची परिणती रालोआला घवघवीत यश मिळण्यात झाली.

दुसऱ्या बाजूला महागठबंधनकडून राजद नेते तेजस्वी यादव आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी प्रचाराची कमान सांभाळली होती. त्यांच्या सभा आणि रॅलींना चांगला प्रतिसाद मिळत होता. मात्र हा प्रतिसाद मतांमध्ये परावर्तीत होऊ शकला नाही.

## बिहार निवडणुकीतील मते अन् टक्केवारी






पाटणा : बिहार विधानसभेच्या निवडणुकीचा कल एनडीएच्या बाजूने स्पष्ट होताच भाजपसह राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या कार्यकर्त्यांनी राजधानी पाटणा येथे फटाक्यांची आतषबाजी करत जल्लोष केला.

## बिहार निवडणूक प्रक्रियेत सुरुवातीपासूनच गडबड : राहुल गांधी



● बिहार निवडणुकीचा बिगूल वाजल्यापासूनच या प्रक्रियेत गडबड करण्यात आल्याचा आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला. बिहार निवडणुकीत काँग्रेसह महागठबंधन आघाडीला दारुण पराभवास सामोरे जावे लागले. निकालानंतर प्रतिक्रिया देताना राहुल गांधी म्हणाले की, बिहारमधील ज्या लाखो मतदारांनी महाआघाडीवर विश्वास व्यक्त केला, त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. हा निकाल खरोखरच आश्चर्यकारक आहे. ही निवडणूक सुरुवातीपासूनच निष्पक्ष नव्हती. आम्हाला विजय मिळवता आला नाही. ही लढाई संविधान आणि लोकशाहीच्या संरक्षणासाठी आहे. काँग्रेस पक्ष आणि इंडिया आघाडी या निकालाचा सखोल आढावा घेतील आणि लोकशाही वाचवण्यासाठी अधिक जोमाने प्रयत्न करतील, असे राहुल गांधी म्हणाले.

## सर्व विभागांत एनडीएची बाजी!



**पाटणा : बिहार विधानसभा निवडणुकीत एनडीएची जबरदस्त लाट पाहायला मिळाली. २०११ नंतर पहिल्यांदाच एनडीएने घवघवीत यश मिळवले आहे. बिहारच्या सर्व सहा विभागांमध्ये एनडीएने बाजी मारली असून दुसरीकडे महागठबंधनला या सर्वच भागांत मोठे नुकसान झाले.**

**अंग प्रदेश** येथील २७ पैकी २५ जागांवर एनडीएने आघाडी घेतल्याचे पाहायला मिळाले. २०२० च्या तुलनेत एनडीएला यावेळी ७ जागांचा फायदा मिळाला. या भागात महागठबंधनने केवळ दोन जागांवर यश मिळाले. त्यामुळे २०२० च्या तुलनेत महागठबंधनला ६ जागा गमवाव्या लागल्या.

**भोजपूर** येथे ४६ जागांपैकी ३८ जागांवर एनडीएने आघाडी घेतली. मागील निवडणुकीच्या तुलनेत एनडीएला सुमारे २७ जागांचा फायदा मिळाला, तर महाआघाडीला ७ जागा मिळाल्या. २०२० च्या तुलनेत त्यांना २७ जागांचे नुकसान झाले.

**मगध प्रदेश** येथील ४७ पैकी एनडीएने ३८ जागा जिंकल्या. २०२० च्या तुलनेत एनडीएने यावेळी २१ अधिक जागा जिंकल्या. महाआघाडीला केवळ येथे ९ जागांवरच समाधान मानावे लागले. २०२० च्या तुलनेत त्यांना येथे २१ जागा गमावाव्या लागल्या.

**मिथिलांचल** येथील ५० पैकी ४१ जागा एनडीएने जिंकल्या. म्हणजेच २०२० च्या तुलनेत एनडीएला यावेळी ८ जागांचा फायदा मिळाला.

**सीमांचल** येथे एक्झिट पोलमध्ये महागठबंधनची कामगिरी चांगली राहील, असे सांगितले गेले होते. पण आलेल्या निकालानुसार त्यांचे येथेही नुकसान झाले आहे. येथील २४ पैकी एनडीएने १४ जागा जिंकल्या. २०२० च्या तुलनेत एनडीएला यावेळी २ जागांचा फायदा झाला आहे. येथे महागठबंधनला ४ जागा मिळाल्या.

**तिरहुत** या विभागात तर ४९ पैकी ४८ जागांवर एनडीएची सरशी झाली. येथे एनडीएला एकूण १७ जागांचा फायदा झाला, तर महागठबंधनला केवळ एका जागेवर समाधान मानावे लागले. २०२० च्या तुलनेत त्यांना १७ जागा गमवाव्या लागल्या.

## बिहारी विजयाचा मराठी सूत्रधार!



**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

**लोकसभेपाठोपाठ विधानसभा निवडणुकीतही बिहारमध्ये भाजपच्या एनडीएचा विजयी ध्वज फडकवण्यात महाराष्ट्राचा मोठा हात आहे. तो हात म्हणजे, भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस आणि बिहारचे प्रभारी विनोद तावडे. बिहारच्या रणांगणात उतरताना आम्ही साधारणतः सप्तसूत्री राबवली आणि त्याच जोरावर आज एनडीएची सत्ता पुन्हा आली अन् बिहारात भाजप सर्वांत मोठा पक्ष ठरला, अशी प्रतिक्रिया विनोद तावडे यांनी 'पुढारी'लो दिली.**

१ तावडे म्हणाले, मुख्यमंत्री नितीशकुमार लालू यादवांचे बोट धरून जाणार असल्याचे समजताच त्यांना परत भाजपकडे आणण्यापासून पुढच्या निवडणुका जिंकायच्या हे पहिले सूत्र होते. त्यानुसार नितीशकुमार तेजस्वी यादव सोबतचे युती सरकार सोडून भाजपकडे परतले. नंतर आम्ही लोकसभा निवडणूक तिथे दणदणीत जिंकली. बिहारने ताकद दिल्यानेच पुढे मोदी सरकारचे राज्यारोहण भाजपला सोपे गेले.

२ नितीशकुमारांच्या संयुक्त जनता दलासोबत एनडीएची युती असली तरी ही युती फक्त वरच्या स्तरावर म्हणजे नेत्यांच्याच पातळीवर होती. ही युती खालपर्यंत कार्यकर्त्यांमध्ये रुजवणे आवश्यक होते. गेल्या तीन वर्षांत आम्ही नितीश कुमारांसोबतची युती खालपर्यंत पोहोचवली, असे तावडे यांनी अधोरेखित केले.

३ कोणत्या मतदारसंघात कोणत्या समाजाचा उमेदवार देणे आवश्यक आहे, याचे नियोजन आम्ही आधीच केले. परिणामी, मुस्लीम आणि यादव (माय) यांचे प्राबल्य असलेल्या जागांपैकी ३० जागा आम्ही जिंकल्या. यात निषाद म्हणजे मच्छिमारही आम्ही सोबत घेतले. 'मल्ला नहीं, मुल्ला हैं...' असा नारा प्रचारात चालवला.

४ तावडे म्हणतात, बिहारच्या मागासलेपणाचा मुद्दा विरोधकांना मांडता आला नाही, असे म्हटले जात असले, तरी आम्ही विकासाचे चित्र बिहारी मतदारांसमोर ताकदीने उभे केले. त्यासाठी आमची टॅगलाईन होती 'रफ्तार पकड चुका हैं बिहार!'...

५ बिहारच्या निवडणुकांत साधारणतः २० ते २२ हत्या होण्याची परंपराच निर्माण झाली आहे; मात्र या निवडणुकीत दहशत, हिंसाचार होणार नाही, याची काळजी आम्ही पोलिस प्रशासनासोबत घेतली व त्यासाठीची व्यूहरचना आखली.

६ आजवर पंतप्रधान नरेंद्र मोदींपासून अनेक मोठ्या नेत्यांच्या निवडणुकांचे व्यवस्थापन व्यवसाय म्हणून सांभाळणारे प्रशांत किशोर बिहारच्या निवडणूक रिंगणात उतरले होते. त्यांच्याबद्दल राजकीय माध्यमांमध्ये मोठे कुतूहल असले, तरी प्रशांत किशोर यांना महत्त्व द्यायचे नाही, त्यांच्या टीकेलाही उत्तर द्यायचे नाही, असे धोरणच आम्ही सहावे सूत्र म्हणून स्वीकारले आणि ते तंतोतंत पाळले.

७ लालूप्रसाद यादव यांच्या कारकिर्दीतील जंगलराज बिहारच्या आजच्या पिढीला आठवत नाही; मात्र या जंगलराजच्या आठवणी जागवण्याचे, आजच्या पिढीतील मतदारांना त्याची जाणीव करून देण्याचे काम आम्ही केले. विशेतः सामाजिक माध्यमांवर हा जंगलराजचा मुद्दा आम्ही अत्यंत आक्रमकपणे चालवला, व्हिडीओ दाखवले, पुन्हा जंगलराज नको हा मुद्दा बिहारी जनतेच्या मनावर ठसवला.

## बिहार निवडणुकावरही 'लाडक्या बहिणीं'चा प्रभाव..!

**वसंत भोसले**

**मध्य प्रदेशनंतर महाराष्ट्र आणि महाराष्ट्रानंतर बिहारमध्ये देखील महिलांसाठी जाहीर केलेल्या मुख्यमंत्री महिला रोजगार योजनेचा मोठा परिणाम बिहार विधानसभा निवडणुकीमध्ये दिसून आला त्यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्री आणि मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या नेतृत्वावर पुन्हा एकदा मतदान करण्यात आले.**

बिहार विधानसभा निवडणूक ही राष्ट्रीय लोकशाही आघाडी विरुद्ध महाआघाडी यांच्यात अटीतटीची होईल, नव्याने स्थापन झालेल्या जनसुराज पक्षाचा कोणताही प्रभाव दिसणार नाही, असा अंदाज व्यक्त करण्यात येत होता. पण तो फोल ठरला. निवडणूक एकतर्फी झाली आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीला प्रचंड बहुमताने बिहारच्या मतदाराने निवडून दिले.

बिहार विधानसभेची निवडणूक जवळ आली असताना फेब्रुवारीमध्ये मांडलेल्या अंदाजपत्रकात अनेक योजना जाहीर करण्यात आल्या होत्या. त्याशिवाय बिहार सरकारने गेल्या चार महिन्यांमध्ये २६ वेगवेगळ्या योजना जाहीर करून थेट लाभ देण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्रामध्ये मध्य प्रदेशप्रमाणेच लाडकी बहीण योजना जाहीर करून महिलांना दरमहा दीड हजार रुपये देण्याची योजना आखण्यात आली होती. त्याच धर्तीवर बिहारमधील नितीश कुमार यांच्या सरकारने मुख्यमंत्री महिला रोजगार योजना तयार केली आणि प्रत्येक महिलेला रोजगार सुरू करण्यासाठी दहा हजार रुपयांचे अनुदान देण्यात आले.



बिहारच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच सर्वोच्च सर्वाधिक ६६.९१ टक्के मतदान झाले. यापूर्वी २०२० च्या विधानसभा निवडणुकीत ६० टक्केपेक्षा अधिक आणि १९९८ च्या लोकसभा निवडणुकीत ६४ टक्के मतदान झाले होते. मागील निवडणुकीत पुरुषांचे मतदान ७० टक्के आणि महिलांचे मतदान ५३ टक्के झाले होते. यावेळी महिलांच्या मतांमध्ये १८ टक्क्यांनी वाढ झाली आणि पुरुषांच्या मतांमध्ये आठ टक्क्यांनी घट झाली. त्यामुळे महिलांच्या मतांवरच राष्ट्रीय लोकशाही आघाडीला मोठ्या प्रमाणात बहुमत मिळाले.

खास या योजनेसाठी एक कोटी २५ लाख महिलांची यादी तयार करण्यात आली होती. त्याशिवाय शेतकरी, शेतमजूर रिक्षा चालक यांच्यासाठी; शिवाय बेरोजगार पदवीधर, पदविकाधारक, बारावी पास असलेल्या सर्व तरुणांना आर्थिक लाभ देण्यात आला होता. त्याचा परिणाम बिहारमधील मतदानामध्ये भरघोस वाढ झाली आणि ते सर्व मतदान राष्ट्रीय लोकशाही आघाडीला मिळाले. त्यामुळेच न भूतो न भविष्यती अशा प्रकारचे बहुमत या आघाडीला मिळाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, बिहारचे मुख्यमंत्री नितेश कुमार, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह सुमारे दोन डझन नेत्यांनी संपूर्ण बिहार पिंजून काढला. तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय जनता दलास मत म्हणजे पुन्हा एकदा जंगल राज येण्यासाठी निमंत्रण देणे असा प्रचार करण्यावर नरेंद्र मोदी यांनी सर्वाधिक भर दिला होता. गृहमंत्री अमित शहा यांनी मतदार यादींचे फेरसर्वेक्षण आणि घुसकरांची मते घुसखोरांची मते यावर प्रचारात भर देऊन बिहारच्या जनतेला आव्हान केले.

Progenesis® fertility center

प्रत्येक जोडप्याच्या स्वप्नांसाठी, प्रोजेनेसिस



उपलब्ध सुविधा
• फर्टिलिटी तपासणी • IUI • IVF • IVF-ICSI • लेजर असिस्टेड हॅचिंग • ब्लास्टोसिस्ट ट्रान्सफर • एम्ब्रियो / एग फ्रिझिंग

आमची वैशिष्ट्ये
अत्याधुनिक उपचार | सर्वोत्तम यशदर | अनुभवी वंध्यत्व तज्ञ डॉक्टर | आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा | पारदर्शक उपचारपद्धती



21 IVF सेंटर महाराष्ट्रभर
11 वर्षांचा विश्वास, महाराष्ट्रभरात 21 सेंटर्स आणि हजारो जोडप्यांच्या चेहऱ्यावरचं समाधान! तज्ज्ञ डॉक्टरांचे अचूक मार्गदर्शन आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानासोबतच प्रोजेनेसिस IVF देते आपुलकीची साथ. म्हणूनच तर पालकत्वाच्या स्वप्नासाठी आम्ही आहोत हजारो जोडप्यांची पहिली पसंती!

प्रोजेनेसिस फर्टिलिटी सेंटर
बोरिवली । ठाणे । वाशी । अंधेरी । घाटकोपर । कल्याण । पनवेल । विरार । पुणे- औंध । पुणे- कल्याणी नगर । नाशिक । नागपूर । कोल्हापूर । छत्रपती संभाजी नगर । अहिल्या नगर । अमरावती । सोलापूर । नांदेड । जळगाव । धुळे । रत्नागिरी
www.progenesisivf.com
For Consultation: 89561 60873 | Whatsapp 94239 71620
Disclaimer: Images shown are for illustrative purposes only.
Sex selection and prenatal sex determination are illegal and not done here.

# शिंदे गटाची ५० टक्के जागांची मागणी मुंबईत भाजपला लहान भाऊ करणारी

## व्यावहारिक निकषांवरच जागावाटप करण्याची मुंबई भाजपची भूमिका




● मागील नगरसेवकांपेक्षा व्यावहारिक निकषांचा आग्रह भाजपकडून केला जात आहे. मावळत्या सभागृहातील सर्वाधिक ८३ माजी नगरसेवक भाजपकडे आहेत. तर, काँग्रेसकडे १९, सपा ४, अजित पवार गट २, शरद पवार गट २, एमआयएम १ आणि अन्य २ आहेत. त्यामुळे काँग्रेससह अन्य २५ जागा कोणाकडे जाणार याचा निर्णय घ्यावा. याचा फॉर्म्युला ठरल्यानंतर उबाठा गटाकडील जागा शिंदे गटाकडे की भाजपकडे याचा निर्णय सर्वेक्षण आणि वॉर्डातील सद्यस्थितीच्या आधारे करण्याची भूमिका भाजपकडून मांडली जाण्याची शक्यता आहे.

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई महानगरपालिका निवडणुकांसाठी शिवसेना शिंदे गटाने किमान ५० टक्के जागांवर दावा करत भाजप नेतृत्वाकडे त्यासाठी आग्रह धरण्याची तयारी चालविली आहे. मात्र, शिंदे गटाची ही मागणी म्हणजे जागावाटपातच भाजपला लहान भाऊ बनविण्याचा प्रयत्न ठरू शकतो. त्यामुळे भाजपनेही प्रत्येक वार्डातील पक्षीय बलाबल मांडत व्यावहारिक निकषांवर जागावाटप व्हायला हवे, अशी भूमिका घेतली आहे.

२०१७ च्या निवडणुका प्रत्येक पक्षाने स्वतंत्रपणे लढविल्या होत्या. त्यामुळे तेव्हाचे बलाबल हा निकष बाजूला सारत सद्यस्थितीच्या आधारावर चर्चा करण्याची भूमिका घेतली आहे.

आगामी महापालिका निवडणुकांसाठी शिंदे गटाने किमान ५० टक्के जागा मिळाव्यात असा आग्रह धरला आहे. त्यासाठी २०१७ आणि २०१२ सालच्या निवडणुकातील विजयी नगर-सेवक शिंदे गटात दाखल झाल्याचा दाखला दिला जात आहे. शिंदे गटाच्या या भूमिकेवर भाजपने अद्याप अधिकृत भूमिका मांडलेली नाही. मात्र, मागील नगरसेवकांचा आधार या निवडणुकीत घेता येणार नाही. २०१७ च्या निवडणुका प्रत्येक पक्षाने स्वतंत्रपणे लढविल्या होत्या. शिवाय, मावळत्या सभागृहातील ६५ नगरसेवक शिंदे गटात असल्याचा दावाही भाजप नेते अमान्य करत आहेत. एकसंध शिवसेनेच्या चिन्हावर ८४ नगरसेवक निवडून आले होते. पुढे मनसेसह अन्य पक्षातील नगरसेवक ठाकरेंनी स्वतःकडे खेचले. शिवसेनेतील दुफळीनंतर बलाबल बदलले आहे. सध्या ठाकरे गटाकडे ५६ तर शिंदे गटाकडे ५८ माजी नगरसेवक आहेत. त्यामुळे ५० टक्के जागांसाठी मागील नगरसेवकांचा निकष भाजपकडून बेदखल केला जात आहे.

# बिहार तो झांकी है, मुंबई अभी बाकी है!

## भाजप कार्यकर्त्यांचा मुंबईत जल्लोष : स्थानिक निवडणुकांतही विजय मिळवण्याचा निर्धार




मुंबई : बिहार विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीदरम्यान एनडीएने आघाडी घेतल्यामुळे मुंबईत भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी पक्ष कार्यकर्त्यांसह आनंदोत्सव साजरा केला.

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

बिहार विधानसभा निवडणुकीत विजयाने महाराष्ट्र भाजपचा उत्साह दुणावला आहे. बिहार विजयानिमित्त नरिमन पॉईंट येथील भाजप प्रदेश कार्यालयात विजयोत्सव साजरा करण्यात आला. 'बिहार तो झांकी है, मुंबई अभी बाकी है' असे म्हणत मुंबईसह महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी एका अर्थाने रणशिंग फुंकले.

बिहार विजयानंतर भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली प्रदेश कार्यालयात हा विजयोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी चव्हाण म्हणाले, बिहारमध्ये एनडीएला स्पष्ट बहुमत मिळणार हे स्पष्ट होते. राहुल गांधी यांनी 'व्होट चोरी'सारखा फेक नॅरेटिव्ह तयार केला. परंतु बिहारच्या जनतेने त्यांचा डाव वेळीच ओळखला. महाराष्ट्रात उद्धव ठाकरे यांनी कोरोना काळात केलेला भ्रष्टाचार मुंबईकर विसरणार नाही. प्रेताच्या टाळूवरचे लोणी खाणारे हे लोक माणुसकी विसरले होते. येणाऱ्या निवडणुकीत त्यांची जागा दाखवून द्यायची आहे. बिहारच्या जनतेनेही त्यांना त्यांची जागा दाखवली. आता स्थानिक निवडणुकीतही हेच घडणार आहे, असेही ते म्हणाले.

## महापालिकेच्या प्रमुख रुग्णालयांच्या सुरक्षेचे आता आठवड्याला ऑडिट

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई महानगरपालिकेच्या कूपर आणि नायर रुग्णालयांमध्ये निवासी डॉक्टरांवरील हल्ल्यानंतर प्रशासनाने रुग्णालयांच्या सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्याचा निर्णय घेतला आहे. याचाच एक भाग म्हणून, सायन, नायर, कूपर आणि केईएम रुग्णालयांमध्ये आता दर आठवड्याला सुरक्षा ऑडिट करण्यात येणार आहे. या संबंधित रुग्णालयांच्या अधिष्ठात्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

गेल्या आठवड्यात कूपर रुग्णालयातील तीन निवासी डॉक्टरांवर रुग्णाच्या कुटुंबाने हल्ला केला होता. त्यानंतर कूपर रुग्णालयातील निवासी डॉक्टरांनी चार दिवसांचा संप पुकारला होता. या आठवड्यात नायर रुग्णालयातील निवासी डॉक्टरांनीही संप पुकारलेला होता. यासाठीच डॉक्टरांवर नातेवाइकांकडून होणारे हल्ले, वादावादी टाळण्यासाठी सुरक्षा यंत्रणा सक्षम करण्यासाठी प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.

### ४० डार्क स्पॉट्सवर सुरक्षा नाही

● २०२४ मध्ये, महानगरपालिका रुग्णालयांमधील निवासी डॉक्टरांची संघटना असलेल्या बीएमसी मार्डने चारही वैद्यकीय महाविद्यालयांच्या कॅम्पसचे सुरक्षा ऑडिट केले. अहवालात असे म्हटले होते की महाविद्यालयांमध्ये ४० डार्क स्पॉट्स होते. त्यापैकी १० सायन हॉस्पिटलमध्ये, १२ नायर येथे आणि १८ केईएम आणि कूपर येथे होते. तथापि, ओळखल्या गेलेल्या सर्व डार्क स्पॉट्सवर अद्याप सुरक्षा सुनिश्चित केलेली नाही.

साप्ताहिक सुरक्षा लेखापरीक्षणात आढळणाऱ्या कोणत्याही त्रुटींबद्दल संबंधित रुग्णालयाचे अधिष्ठाता महानगरपालिका उपायुक्त (आरोग्य) यांना अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नियमित देखरेख प्रणाली तयार करणे, जबाबदारी वाढवणे आणि सुरक्षितता सुध-रणांसाठी डेटा-आधारित उपाययोजना करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला महापालिका उपायुक्त शरद उघाडे यांनी सांगितले

**अपुरी सुरक्षा व्यवस्था**

महापालिकेच्या केईएम, सायन, नायर आणि केईएम वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालये कनिष्ठ आणि वरिष्ठ अशा ३,५०० निवासी डॉक्टरांना नियुक्त करतात. या चार वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये ६०० हून अधिक सुरक्षा कर्मचारी तैनात आहेत. प्रत्येक वैद्यकीय महाविद्यालयात १५० ते २०० सीसीटीव्ही कॅमेरे बसवलेले आहेत. सुरक्षा परिघ असूनही, निवासी डॉक्टरांना असुरक्षित वाटते. सुरक्षा व्यवस्था अपुरी असल्याचे त्यांचे मत आहे.

धौती-योग®
चूर्ण व टॅबलेट्स
पोट साफ न होणे, बद्धकोष्ठ, गॅसेस, ॲसिडिटी, मूळव्याध इ. विकारांवर प्रभावी !
आजच रात्री घ्या, सकाळी OK!
9422011723

## एसटीच्या उत्पन्नवाढीसाठी पंचसूत्री आराखडा जाहीर



**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) उत्पन्नवाढ, कार्यक्षमता आणि प्रवासी सुविधांच्या उन्नतीसाठी एक सर्वसमावेशक 'पंचसूत्री आराखडा' तयार केल्याची माहिती परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी शुक्रवारी दिली.

१ एसटीच्या व्यवस्थेचे मूल्यमापन आणि नियोजन दैनंदिन पातळीवर व्हावे, यासाठी सकाळी १० वाजता आगारात, ११ ला विभागात आणि १२ वाजता प्रादेशिक स्तरावर आढावा बैठक अनिवार्य करण्यात आली आहे.

२ डिझेल हा एसटीच्या खर्चातील सर्वांत मोठा घटक असल्याने असल्याने किलोमीटर प्रति १० लीटरनुसार चालकांना दररोजचे लक्ष्य दिले जाईल.

३ आता सर्व वेळापत्रकांची शास्त्रशुद्ध पुनर्मूल्यांकन प्रक्रिया सुरू केली जात आहे. मध्यवर्ती कार्यालयाची मंजुरी असलेल्या फेऱ्याच राबवाव्यात, असे निर्देश आहेत.

४ आरक्षणास उपलब्ध बसची संख्या वाढवणे, भारमान ८० टक्के पेक्षा कमी न ठेवणे, चांगले भारमान असणाऱ्या दिवशी जादा फेऱ्यांची उपलब्धता, आणि प्रत्येक फेरीची देखरेख पर्यवेक्षकांच्या 'दत्तक' तत्त्वावर बस फेऱ्या देणे अशा अनेक सुधारणा होत आहे.

५ स्वच्छ, टापटीप बसस्थानके, प्रसाधनगृहांची दररोज किमान तीन वेळा तपासणी, उशिरा सुटणाऱ्या किंवा रद्द बस फेऱ्यांची प्रवाशांना योग्य माहिती दिली जाईल.

## संक्षिप्त

### भीमराव पांचाळे यांना विठ्ठल उमप फाउंडेशनचा जीवनगौरव पुरस्कार



**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

लोकशाहीर विठ्ठल उमप फाऊंडेशनचा मृद्गंध जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ गझलनवाझ भीमराव पांचाळे यांना जाहीर झाला आहे. कलाक्षेत्रात बहुमोल योगदान देणाऱ्या व्यक्तींना विठ्ठल उमप फाऊंडेशनचा मृद्गंध पुरस्कार' सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येतो. प्रसिद्ध गायक व विठ्ठल उमप फाऊंडेशनचे अध्यक्ष नंदेश उमप यांनी शुक्रवारी यंदाच्या पुरस्कारांची घोषणा केली. मृद्गंध पुरस्काराच्या यंदाच्या मान्यवरांमध्ये शाहीर राजेंद्र राऊत (लोककला क्षेत्र), प्रदीप शिंदे (शिल्पकला), अभिनेते जयवंत वाडकर (अभिनय), परेश मोकाशी (दिग्दर्शक), मधुगंधा कुलकर्णी (अभिनेत्री आणि निर्माती), अभिनेत्री रिंकू राजगुरू (नवोन्मेष प्रतिभा-अभिनय) आदींचा समावेश आहे. शाहीर विठ्ठल उमप यांच्या १५ व्या स्मृतिदिनानिमित्त १५ वा लोकशाहीर विठ्ठल उमप स्मृती संगीत समारोह व विठ्ठल उमप फाऊंडेशनचा 'मृद्गंध पुरस्कार' वितरणाचा भव्य सोहळा २६ नोव्हेंबरला रवींद्र नाट्यमंदिर येथे सायंकाळी ६ वाजता होईल.

### नोंदणीविना विकल्या जाणाऱ्या आयात सौंदर्यप्रसाधनांवर एफडीएची कारवाई

**मुंबई :** महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) मुंबईतील क्रॉफर्ड मार्केट आणि ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर येथील तीन ठिकाणी कारवाई करून नोंदणी तसेच आयात परवान्याशिवाय विक्री होत असलेल्या परदेशी सौंदर्यप्रसाधनांचा साठा जप्त केला. शिवाय, आक्षेपार्ह दावे असलेल्या एका आयुर्वेदिक उत्पादनावरही ठाण्यात कारवाई करण्यात आली. एफडीएने दिलेल्या माहितीनुसार, या ठिकाणी आयात केलेली कॉस्मेटिक उत्पादने नियमांचे पालन न करता विकली जात असल्याचे आढळले. त्यानुसार, सहाय्यक आयुक्त निशिगंधा पाष्टे यांच्या मार्गदर्शनाखाली औषध निरीक्षक हेमंत आडे आणि पूनम साळगावकर यांनी क्रॉफर्ड मार्केटमधील दोन विक्रेत्यांकडून अनुक्रमे २,४०,०६५ रूपये आणि ६१,१३२ रूपये किमतीची उत्पादने जप्त केली. ठाण्यातील उल्हासनगर येथे सहाय्यक आयुक्त रोहित राठोड यांच्या सूचनेनुसार औषध निरीक्षक एस. एस. भुजबळ यांनी एका दुकानातून रु. १,३२,८८८ किमतीची नियमबाह्य सौंदर्यप्रसाधनांची जप्ती केली.

### नवाब मलिक यांच्या अडचणींत वाढ; दोषमुक्तीचा अर्ज न्यायालयाने फेटाळला

**मुंबई :** राज्याचे माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नवाब मलिक यांच्या अडचणींत भर पडली आहे. त्यांच्या कुटुंबाने चालवलेल्या रिअल इस्टेट फर्मने दाऊद इब्राहिमशी संबंधित मनी लाँडरिंग प्रकरणात दाखल केलेला दोषमुक्तीचा अर्ज विशेष पीएमएलए न्यायालयाने फेटाळला आहे आणि सर्व आरोपींविरुद्ध आरोप निश्चित करण्याचे निर्देश दिले आहेत.

नवाब मलिक यांच्या कुटुंबीयांमार्फत चालवण्यात येणाऱ्या मेसर्स मलिक इन्फ्रास्ट्रक्चरने दोषमुक्तीसाठी अर्ज केला होता. त्यावर पीएमएलए न्यायालयाचे विशेष न्यायाधीश सत्यनारायण नावंदर यांनी निर्णय दिला. दोषमुक्तीचा अर्ज फेटाळतानाच न्यायालयाने सर्व आरोपींविरोधात मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायदा, २००२ च्या संबंधित कलमांतर्गत आरोप निश्चित करण्याचे निर्देश दिले.

# ठाणे ते भिवंडी प्रवास केवळ ५ मिनिटांत

## वसई खाडीवर कोलशेत ते काल्हेर पूल

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

ठाणे ते भिवंडी हे अंतर कमी वेळेत पार करणे आता शक्य होणार आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत वसई खाडीवर सहा पदरी पूल उभारला जाणार असून यामुळे ठाण्यातील कोलशेत आणि भिवंडीतील काल्हेर ही ठिकाणे जोडली जातील.

सध्या ठाणे ते भिवंडी हा प्रवास करण्यासाठी ४५ मिनिटांचा कालावधी लागतो. २.२ किमीचा पूल उभारण्यासाठी ४३० कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. या पुलामुळे ४५ मिनिटांचा प्रवास ५ ते ७ मिनिटांत पूर्ण करता येईल. या पुलासाठी गुरुवारी निविदा काढण्यात आल्या. पुलाचे बांधकाम ३ वर्षांत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

भिवंडी येथे मोठ्या प्रमाणावर गोदामे असल्याने व्यावसायिकदृष्ट्या या भागाला महत्त्व आहे. तसेच मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचे स्थानकही या ठिकाणी होणार आहे. भिवंडीतील गोदामांतून मालाची वाहतूक करणारी अवजड वाहने ठाणे-भिवंडी दरम्यान प्रवास करतात. यामुळे प्रचंड वाहतूक कोंडी होते. सध्या कोलशेत ते काल्हेर हा प्रवास करण्यासाठी बाळकुम नाका, कशेळी पूल या मार्गाने प्रवास करावा. यात वाहनचालकांचा बराच वेळ वाया जातो. यामुळे मालवाहतुकीवर व पर्यायाने उद्योगधंद्यांवर परिणाम होतो.

### भिवंडी अनुसूचित क्षेत्र

● ठाणे ते भिवंडी पुलामुळे प्रामुख्याने वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवला जाईल. यासोबतच भिवंडी अनुसूचित क्षेत्रही प्रस्तावित करण्यात आले आहे. या अंतर्गत वस्त्रोद्योग केंद्र आणि बहुउद्देशीय मार्ग उभारला जाणार आहे.

# समलिंगी दाम्पत्याला अंतरिम दिलासा देण्यास हायकोर्टाचा नकार

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

आयकर कायद्याच्या कलम ५६ (२) (एक्स) च्या संवैधानिक वैधतेला आव्हान देणाऱ्या समलिंगी दाम्पत्याला अंतरिम दिलासा देण्यास उच्च न्यायालयाने गुरुवारी नकार दिला. आयकर कायद्यातील कलम ५६ (२) (एक्स) नुसार परस्परलिंगी जोडीदारांमध्ये देवाणघेवाण होणाऱ्या भेटवस्तूंना करमुक्त केले जाते. त्या अनुषंगाने समलिंगी दाम्पत्याने कर लाभांसाठी पती/पत्नी या शब्दाचा समावेश करण्याची मागणी केली आहे.

गृहिणी पायियो आशिहो आणि वकील विवेक दिवान यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. कर लाभांसाठी 'जोडीदार' (पती किंवा पत्नी) या शब्दाचा समावेश करण्याची मागणी केली आहे. सध्याच्या तरतुदीमुळे समलिंगी जोडप्यांना आर्थिकदृष्ट्या असमान वागणूक मिळते, असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांतर्फे प्राथमिक सुनावणीदरम्यान करण्यात आला. न्यायमूर्ती बर्गेस कोलाबावाला आणि न्यायमूर्ती अमित जामसंडेकर यांच्या खंडपीठापुढे ही सुनावणी झाली.

# ज्येष्ठ अभिनेत्री कामिनी कौशल यांचे ९८ व्या वर्षी निधन

## बॉलीवूडच्या सुवर्ण काळातील साक्षीदार काळाच्या पडद्याआड





**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

बॉलीवूडच्या सुवर्णकाळातील लोकप्रिय आणि ज्येष्ठ अभिनेत्री कामिनी कौशल (वय ९८) यांचे शुक्रवारी वृद्धापकाळाने निधन झाले. गेल्या काही दिवसांपासून त्या आजारी होत्या. त्यांच्या निधनामुळे बॉलीवूडच्या सुवर्णकाळातील साक्षीदार असलेली अभिनेत्री काळाच्या पडद्याआड गेली आहे.

कामिनी कौशल यांनी १९४६ मध्ये 'नीचा नगर' या चित्रपटातून हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. विशेष म्हणजे या चित्रपटाने कान्स चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार जिंकला होता. यानंतर दो भाई (१९४७), शहीद (१९४८), नदिया के पार (१९४८), जिद्दी, पारस, नमुना, आरजू आणि शबनम यांसारख्या अनेक गाजलेल्या चित्रपटांतून त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले.

कामिनी कौशल यांनी दिलीप कुमार, राज कपूर, देव आनंद आणि अशोक कुमार यांसारख्या अनेक दिग्गज अभिनेत्यांबरोबर काम केले. नदिया के पार, शहीद, शबनम आणि आरजू या चित्रपटांमधील त्यांची आणि दिलीप कुमार यांची ऑनस्क्रीन केमिस्ट्री विशेष गाजली होती.

लाहोरमध्ये त्यांचा जन्म झाला. उमा कश्यप हे त्यांचे नाव होते. त्यांचे वडील शिवराम कश्यप हे एक प्रसिद्ध वनस्पतिशास्त्रज्ञ होते. 'नीचा नगर'चे दिग्दर्शक चेतन आनंद यांनी त्यांना कामिनी कौशल हे पडद्यावरील नाव दिले, जेणेकरून दुसऱ्या अभिनेत्रींच्या नावाशी गोंधळ होऊ नये.

**शेवटच्या दिवसांतही सक्रिय**

कामिनी कौशल यांनी गोदान (१९६३) मध्ये महत्त्वाची भूमिका साकारली, तसेच चेन्नई एक्स्प्रेस, कबीर सिंह आणि लाल सिंह चड्ढा यांसारख्या आधुनिक चित्रपटांमध्येही त्या महत्त्वाच्या भूमिकेत दिसल्या. २५ फेब्रुवारी २०२५ रोजी त्यांनी आपला ९८ वा वाढदिवस साजरा केला होता.

# लाच घेताना सहायक विद्युत अभियंता अटकेत

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

एक लाख रुपयांची लाच घेताना विद्युत कार्यालयातील एका सहाय्यक अभियंत्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली. गजानन प्रल्हाद राठोड असे या अभियंत्याचे नाव असून परवाना देण्यासाठी त्याने तक्रारदाराकडून चार लाखांची लाचेची मागणी केली होती, त्यापैकी एका लाखांचे टोकन घेताना त्याच्यावर कारवाई करण्यात आली आहे.

यातील तक्रारदार त्यांच्या पत्नीच्या कंपनीत प्रोजेक्ट मॅनेजर म्हणून काम करतात. ही कंपनी विद्युत उद्वाहन स्थापित करणे, त्याची देखभाल करणे आदी काम करते. ऑक्टोबर महिन्यात त्यांनी सांताक्रुज येथील ऊर्जा खात्यात एक अर्ज करुन परवाना मिळावा यासाठी प्रयत्न सुरु केले होते. त्यासाठी त्यांनी सहाय्यक अभियंता गजानन राठोड यांची भेट घेतली होती. या कामासाठी त्यांनी त्यांच्याकडे एक लाख ऐंशी हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. ही लाच दिल्याशिवाय त्यांचे काम होणार नव्हते. त्यामुळे त्यांनी लाच देण्याची तयारी दर्शवून त्यांच्याविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागात तक्रार केली होती. या तक्रारीची १२ नोव्हेंबरला शहानिशा करण्यात आली होती. यावेळी गजानन राठोड यांनी त्यांच्या कामासाठी परवानासाठी दुप्पट खर्च येईल असे सांगून चार लाखांची मागणी करुन एक लाख टोकन म्हणून घेऊन येण्यास सांगितले.

या घटनेनंतर या अधिकाऱ्यांनी गुरुवारी संबंधित कार्यालयात सापळा लावला होता. ठरल्याप्रमाणे तक्रारदार एक लाखांची लाच घेऊन गजानन राठोड यांना भेटण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांच्याकडून लाचेची रक्कम घेताना गजानन राठोड यांना या अधिकाऱ्यांनी रंगेहाथ अटक केली.

# जलद तिकिटासाठी मरेवर आता यूटीएस सहाय्यक

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

प्रवाशांना सुलभ तिकिटिंगची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी मध्य रेल्वेने एटीव्हीएम, यूटीएस प्रणाली, मोबाइल यूटीएस यानंतर आता मोबाइल यूटीएस सहाय्यकांची नियुक्ती केली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे सुरू करण्यात आलेल्या या सुविधेमुळे फक्त १३ दिवसात रेल्वेने २०.३३ लाख इतका महसूल मिळवला आहे.

मध्य रेल्वेने ही सुविधा ३१ ऑक्टोबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे सुरू केली असून, तिकीट खरेदीसाठी प्रतीक्षा करणाऱ्या प्रवाशांसाठी ३ सहाय्यक नियुक्त केले आहेत. एम-यूटीएस सहाय्यक म्हणून ओळ-खले जाणारे हे कर्मचारी, त्यांच्या सोबत एक मोबाइल फोन आणि एक लहान तिकीट प्रिंटिंग मशीन अशा दोन्ही सुविधा घेऊन फिरतात. हे एम-यूटीएस सहाय्यक होल्डिंग एरिया किंवा रेल्वे परिसरात रांगेत उभ्या असलेल्या प्रवाशांकडे जाऊन, प्रवासभाडे स्वीकारून तात्काळ तिकिट देतात.

पर्यायी व्यवस्था म्हणून, त्यांना काउंटरच्या आत बसून तिकीट देण्याचीही परवानगी आहे. प्रवाशांना डिजिटल किंवा रोख अशा दोन्ही प्रकारच्या पेमेंटची सुविधा उपलब्ध आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस व्यतिरिक्त, भारतीय रेल्वेने नवी दिल्ली, कोलकाता, बेंगलुरू आणि चेन्नई या स्थानकांवरही मोबाइल यूटीएस सहाय्यकांची सुरूवात केली आहे.

# शस्त्रक्रियेने लिंग बदलून खंडणीची मागणी

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

शस्त्रक्रिया करुन लिंग बदलून एका विद्यार्थ्याला ब्लॅकमेल करुन खंडणीची मागणी करणाऱ्या चारजणांना गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी अटक केली. भास्कर औरक्या स्वामी शेट्टी, कावेरी वेलमुर्गन वेदमा निकम, नझिया गौस शेख ऊर्फ नवाज आणि माही तबरेज खान अशी या चौघांची नावे असून ते सर्वजण तृतीयपंथी आहेत. अटकेनंतर चारही आरोपींना बोरिवलीतील स्थानिक न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे.

यातील तक्रारदार १९ वर्षांचा तरुण असून तो त्याच्या कुटुंबियासोबत मालाड परिसरात राहतो. सध्या तो एका नामांकित महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. दीड वर्षांपूर्वी त्याची आरोपीशी ओळख झाली होती. त्याने त्याला घरी बोलावून त्याला लिंग बदलण्यासाठी ब्रेनवॉश केले होते. मात्र त्याने लिंग बदलण्यास स्पष्टपणे नकार दिला होता. त्याचा राग आल्याने त्यांनी त्याला एका रुममध्ये कोंडून ठेवले होते. इतकेच नव्हे तर त्याला काही श्वानांसोबत लैंगिक कृत्य करण्यास प्रवृत्त केले. त्याचे व्हिडीओ बनविले. या व्हिडीओच्या माध्यमातून त्याला ब्लॅकमेल करुन त्याच्याकडून पैशांची मागणी केली होती. त्याला खोट्या गुन्ह्यांत अडकविण्याची धमकी दिली होती. हा प्रकार त्याने त्याच्या आईला सांगितला होता. त्यामुळे तिने त्यांना पैसे दिले होते. तरीही ते त्याला पैशांसाठी सतत ब्लॅकमेल करत होते. काही दिवसांपूर्वी त्यांनी त्याला सुरत येथे नेले. तिथेच त्याचे लिंग बदलून शस्त्रक्रिया केली होती. त्यासाठी त्याला काही मेडिकल कागदपत्रांवर स्वाक्षरी करण्यास प्रवृत्त केले होते.

शस्त्रक्रियेनंतर त्याला घरी कामावर ठेवून घेतले होते. त्यांच्या त्रासाला कंटाळून तो तेथून पळून गेला. घडलेला प्रकार त्याने त्याच्या आईला सांगितला. त्यानंतर त्यांनी ही माहिती मालवणी पोलिसांना सांगितली. या तरुणाच्या तक्रारीवरुन पोलिसांनी संबंधित आरोपींविरुद्ध वेगवेगळ्या कलमांतर्गत गुन्हा दाखल केला होता.

# पालकांची गैरसोय झाल्यास कारवाई : हायकोर्टाची मुलास तंबी

## कोल्हापूरच्या पालकांना मुंबईत निवासस्थानाचा वापर करण्यापासून मुलाने रोखल्याचे प्रकरण

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूरमध्ये राहणाऱ्या पालकांना मुंबईत वैद्यकीय उपचारांसाठी पश्चिम उपनगरातील आपल्या निवासस्थानाचा वापर करण्यापासून रोखण्यासाठी मुलाने दाखल केलेल्या याचिकेवर उच्च न्यायालयाने चिंता व्यक्त करताना मुलाला खडे बोल सुनावले. न्यायमूर्ती जितेंद्र एस. जैन यांच्या एकल पीठाने पालकांना पूर्ण आदर देण्याचे, प्रेम आणि काळजी घेण्याचे निर्देश दिले. एवढेच नव्हे तर त्यांची कोणत्याही प्रकारे गैरसोय झाल्यास गय केली जाणार नाही, आदेशाचे उल्लंघन झाल्यास योग्य ती कारवाई केली जाईल, अशी तंबीही दिली. वडिलांना तीन मुले आहेत. एक मुंबईत, दुसरा नवी मुंबईत आणि तिसरा कोल्हापूरमध्ये राहतो. वडिलांना त्यांना वैद्यकीय उपचारांसाठी नियमितपणे मुंबईला जावे लागते.



पालकांना मुंबईत वैद्यकीय उपचारांसाठी पश्चिम उपनगरातील त्यांच्या निवासस्थानाचा वापर करण्यापासून रोखण्यास कनिष्ठ न्यायालयाने २०१८ मध्ये नकार दिला होता. त्या निर्णयाविरोधात मुलाने उच्च न्यायालयात अपील दाखल केले होते. या याचिकेवर सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने अपीलबाबत नाराजी व्यक्त करत श्रावण बाळाचा उल्लेख केला. कुठे कावडीतून आपल्या माता-पित्याला तीर्थयात्रेला घेऊन जाणारा श्रावणबाळ आणि आपल्या आजारी, वृद्ध पालकांची काळजी घेण्याचे नैतिक कर्तव्य बजावण्याऐवजी प्रतिबंधात्मक आदेशासाठी न्यायालयात खेचणारा मुलगा... ही खेदाची बाब आहे. आजच्या युगात आपल्या संस्कृतीत रुजवण्यात आलेली नैतिक मूल्ये इतकी घसरली आहेत की, आपण आपल्या पालकांना तीर्थयात्रेला घेऊन जाणाऱ्या आणि वाटेतच आपले जीवन अर्पण करणाऱ्या श्रावणकुमारला विसरलो आहोत, अशी खंत व्यक्त करीत मुलाला पित्यास रुग्णालयात दाखल करण्याबरोबरच त्याच्या पत्नीने वडिलांचे स्वागत व आदरातिथ्य करून उपचारादरम्यान मदत करावी, त्यांच्या उपचाराचा खर्चही करावा, असे अंतरिम आदेश दिले आहेत.



# निवडणूक निकाल २०२५ बिहार विधानसभा



## मतांची टक्केवारी (२००५-२०२०)




# महिला सबलीकरण, कल्याणकारी योजनांमुळे एनडीएचा ऐतिहासिक विजय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

**बिहारच्या २०२५ च्या विधानसभा निवडणुकीच्या निकालांनी अलीकडच्या वर्षांतील सर्वात निर्णायक कौल दिला आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) महिला-केंद्रित कल्याणकारी योजना, जातीय समीकरणांची पुनर्रचना आणि घट्ट संघटनात्मक नियंत्रण यांच्या प्रभावी मिश्रणाद्वारे महागठबंधनचे आव्हान मोडून काढले आहे. भाजपची मजबूत कामगिरी, पुन्हा भरारी घेणारा जेडी(यू) आणि एलजेपी व हम (एस) यांसारख्या मित्रपक्षांच्या जोरावर एनडीएने नेत्रदीपक कामगिरी केली आहे. हा मोठा विजय नितीश कुमार यांचे फिनिक्स पक्षाप्रमाणे पुनरागमन, पंतप्रधान मोदींचा कायम असलेला करिष्मा आणि चिराग पासवान यांचा जबरदस्त स्ट्राईक रेट या सर्वांच्या एकत्रित शक्तीचे प्रतीक आहे.**

● **नितीश कुमार :** 'फिनिक्स'प्रमाणे पुनरागमन आरोग्याच्या चर्चा आणि पलटूराम या टीकेचा जनादेशावर परिणाम नाही. नितीश कुमार यांच्या राजकीय (प्रासंगिकतेची) ची अग्निपरीक्षा म्हणून पाहिल्या जाणाऱ्या या निवडणुकीने, त्यांची बिहारचे फिनिक्स ही प्रतिमा पुन्हा एकदा जिवंत केली आहे. एक असा नेता जो राजकीय अस्तित्वाच्या धोक्यातून वारंवार परत येतो. विरोधकांनी त्यांना पलटूराम (सतत पक्ष बदलणारे) म्हणून लक्ष्य केले असले, तरी मतदारांनी आघाड्यांमधील बदलांपेक्षा रस्ते, वीज, शाळा, सुरक्षा आणि महिला-केंद्रित योजनांच्या त्यांच्या रेकॉर्डला प्राधान्य दिले.

● **मोदींची जादू कायम :** लोकसभा २०२४ चा निकाल हा एक अपवाद होता. पंतप्रधान मोदींची निवडणुकीतील लोकप्रियता अजूनही अबाधित आहे. त्यांच्या सभा आणि लक्ष्यित कल्याणकारी योजनांच्या संदेशामुळे तरंगत्या मतदारांना एकत्र आणण्यास मदत झाली.

● **एलजेपी (आरव्ही) चा जबरदस्त स्ट्राईक रेट**

चिराग पासवान यांनी एनडीएसाठी सर्वोत्तम स्ट्राईक रेटपैकी एक कामगिरी केली. त्यांनी कठीण मतदारसंघांमध्ये जागावाटपात मिळालेल्या जागांचे विजयात रूपांतर केले. पासवान/दलित मतदारांवरील त्यांच्या पकडीमुळे महत्त्वाच्या जागांवर ५-६ % मतांचा फरक पडला.

● **प्रशांत किशोर :** नव्या चेहऱ्यांसाठी एक मोठी अडचण या निवडणुकीने स्टार रणनीतीकारांना मोठे नेते बनण्याच्या मर्यादा स्पष्ट केल्या आहेत. मोठ्या चर्चेनंतरही, जनसुराज काही जागांवर मतविभागणी करण्यापलीकडे कोणताही प्रभाव टाकू शकले नाही.



● घराणेशाही आणि प्रादेशिक पक्षांची मर्यादित धाव तेजस्वी यादव हे नैसर्गिक विरोधी पक्षनेते असले, तरी ते जातीय मर्यादा किंवा एनडीएच्या कल्याणकारी योजनांची अभेद्य भिंत तोडू शकले नाहीत. लहान प्रादेशिक पक्ष तर पूर्णपणे बाजूला फेकले गेले. केवळ अस्मितेच्या राजकारणाने विजय मिळत नाही; पक्षांना कल्याणकारी योजनांची विश्वासार्हता, आर्थिक संदेश किंवा जाती-धर्मापलीकडील आघाड्यांची गरज आहे.

● काँग्रेस आणि इंडिया आघाडी त्यांच्या सर्वात कमकुवत स्थितीत हा निकाल जेवढा एनडीएच्या सामर्थ्याचा आहे, तेवढाच तो विरोधी पक्षांच्या कमकुवतपणाचाही आहे. राजदची २०१५ मधील सर्वोच्च कामगिरीपासून घसरण झाली आहे.

● **मोफत योजना राहणारच :** आणि त्या सत्ताविरोधी लाट बोथट करतात कल्याणकारी योजनांनी ही निवडणूक निश्चित केली. मतदारांनी नव्या आश्वासनांपेक्षा त्यांना आधीच अनुभवलेल्या योजनांना थेट लाभ हस्तांतरण, पेन्शन, महिला-केंद्रित मदतपसंती दिली. बिहार २०२५ ने एक महत्त्वाचा ट्रेंड निश्चित केला आहे: मोफत योजना टाळण्याने नव्हे, तर कल्याणकारी योजनांमधील विश्वासार्हतेने निवडणुका जिंकल्या जातात.

● महिला तुम्हाला निवडणुका जिंकून देऊ शकतात. विक्रमी मतदानात पुरुषांपेक्षा ५ लाख अधिक महिलांनी मतदान केले ते निर्णायक ठरले. नितीश यांच्या दीर्घकालीन महिला केंद्रित धोरणांना आणि १०,००० च्या थेट मदतीच्या योजनेला यश आले.

● वाद जमिनीवर निष्प्रभ ठरला. मतदार याद्यांच्या विशेष सघन पुनरीक्षण आणि मोठ्या प्रमाणात नावे वगळल्याच्या आरोपांवरून अनेक महिने राजकीय गदारोळ होऊनही, या मुद्द्याचे रूपांतर निवडणुकीतील रोषात झाले नाही. बहुतेक भागांमध्ये विक्रमी मतदान आणि सुरळीत मतदानाने हे दाखवून दिले.

# महागठबंधनाचा धुव्वा का उडाला ?

**बिहार २०२५ च्या विधानसभा निवडणुकीत महागठबंधनला ऐतिहासिक पराभवाला सामोरे जावे लागले. ताज्या कलांनुसार, आघाडीला केवळ ३६ जागा मिळण्याची शक्यता आहे. मोठ्या अपेक्षा आणि सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीला आव्हान देऊ पाहणाऱ्या आघाडीनंतरही, महागठबंधनला आपल्या प्रयत्नांचे रूपांतर निवडणुकीच्या यशात करता आले नाही.**

### १ तेजस्वी उशिरा आले, त्यांनी नवीन काहीच दिले नाही

तेजस्वी यादव यांचा प्रचारातील उशिरा आणि निरुत्साही प्रवेश महागठबंधनसाठी अत्यंत हानिकारक ठरला. इतकेच नव्हे, तर त्यांच्या प्रचारातील आश्वासनांमध्ये जरी ती महत्त्वाकांक्षी असली तरी विशिष्टता आणि कृतीयोग्य योजनांचा अभाव होता, ज्यामुळे मतदारांमध्ये संशय निर्माण झाला. अगदी स्वतःच्या राघोपूर मतदारसंघातही तेजस्वी पिछाडीवर होते, जे जनतेशी तुटलेला संपर्क आणि प्रचारातील ऊर्जेचा अभाव दर्शवते.

### २ मैत्रीपूर्ण लढती ज्या मैत्रीपूर्ण नव्हत्या

महागठबंधनमधील मित्रपक्षांमधील जागावाटपाचे अंतर्गत सूत्र ही एक मोठी कमजोरी होती. एनडीएच्या शिस्तबद्ध आघाडीच्या विपरीत, महागठबंधनचे जागावाटप मतभेदांनी भरलेले होते आणि अनेक ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती झाल्या, जिथे मित्रपक्ष एकमेकांविरुद्ध लढले. या अकार्यक्षम समन्वयामुळे मतांचे विभाजन झाले, समर्थकांमध्ये गोंधळ निर्माण झाला आणि एकसंध विरोधी आघाडीत फूट पडली.

### ३ सत्ताविरोधी लाटेवर अवलंबून राहणे

महागठबंधनची निवडणूक रणनीती मोठ्या प्रमाणावर सत्ताविरोधी लाटेवर केंद्रित होती, ज्यात नितीशकुमार यांच्याबद्दल मतदारांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष आहे, असे गृहीत धरले होते. तथापि, या अंदाजाने जेडी(यू) आणि एनडीएने महिला आणि तरुणांसारख्या महत्त्वाच्या मतदार वर्गाला आकर्षित करणाऱ्या कल्याणकारी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीकडे दुर्लक्ष केले.

### ४ लालूंच्या 'जंगलराज'ची गडद छाया

लालूप्रसाद यादव यांच्या 'जंगलराज'च्या काळाची गडद छाया महागठबंधनला खाली खेचत राहिली. जंगलराज हा शब्द साधारणपणे १९९० ते २००५ या काळासाठी वापरला जातो, जेव्हा लालूंच्या राजवटीत मोठ्या प्रमाणावर कायदा आणि सुव्यवस्थेचा अभाव, वाढती गुन्हेगारी आणि प्रशासकीय अपयश दिसून आले. या काळात, बिहारमध्ये कायदा आणि सुव्यवस्थेचा पूर्णपणे ऱ्हास झाला, ज्यात अपहरण, खंडणी, जातीय हिंसाचार आणि राजकारणाचे गुन्हेगारीकरण वाढले.

### ५ व्हीआयपी-काँग्रेसने महागठबंधनला बुडवले

विकासशील इन्सान पार्टी (व्हीआयपी) आणि काँग्रेस यांसारख्या महत्त्वाच्या मित्रपक्षांची खराब कामगिरी महागठबंधनच्या पराभवास मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरली. व्हीआयपीचे उमेदवार लढवलेल्या सर्व जागांवर पराभूत झाले आणि कोणताही अर्थपूर्ण मतांचा वाटा किंवा संघटनात्मक ताकद आणण्यात अपयशी ठरले. काँग्रेस, बिहारमधील मर्यादित अस्तित्व आणि कमकुवत जमिनीवरील यंत्रणेमुळे, मतदारांना संघटित करू शकली नाही किंवा एनडीए-विरोधी मतांचे प्रभावीपणे एकत्रीकरण करू शकली नाही.

## पक्षीय बलाबल (२००५-२०२०)




# मोदींचा करिष्मा कायम

## सभा घेतलेल्या मतदारसंघांत एनडीएची बाजी

**पाटणा : वृत्तसंस्था**

बिहार विधानसभेच्या जागांवर एनडीएला मोठे यश मिळाले आहे. महागठबंधनला मोठा विशेष म्हणजे, बिहार निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जादू स्पष्टपणे दिसून आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिहार निवडणुकीदरम्यान जिथे-जिथे सभा घेतल्या, तिथे भाजप आणि एनडीए आघाडीला फायदा झाला. पंतप्रधान मोदींनी बिहारमध्ये १४ सभा आणि रोड शो केले. याचा परिणाम आता कलांमध्ये दिसून येत आहे. यावरून भाजपसोबतच त्यांच्या मित्रपक्षांनाही याचा फायदा होत असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

पंतप्रधान मोदींनी बिहार प्रचार दौऱ्यात जिथे-जिथे निवडणूक सभांना संबोधित केले, तिथे-तिथे जनतेने भरभरून मतदान केले आणि निवडणूक आयोगाचे आकडे याची साक्ष देत आहेत. पंतप्रधानांनी आपल्या निवडणूक सभेची सुरुवात भारतरत्न 'जननायक' कर्पूरी ठाकूर यांच्या मूळ गाव समस्तीपूर येथून केली होती. समस्तीपूरमध्ये पहिल्या टप्प्यात मतदान झाले.

याच दिवशी पंतप्रधान मोदींनी बेगुसरायमध्येही जाहीर सभेला संबोधित केले आणि येथे ६९.८७ टक्के मतदान झाले. यानंतर ३० ऑक्टोबर रोजी पंतप्रधान मोदींनी मुझफ्फरपूर आणि छपरा येथे जाहीर सभांना संबोधित केले. दोन्ही ठिकाणी पहिल्या टप्प्यात मतदान झाले. मुझफ्फरपूरमध्ये ७१.८१ टक्के आणि छपरामध्ये ६३.८६ टक्के मतदान झाले.

**छठी मातेचा अपमान केल्याचा आरोप**

पंतप्रधानांनी आपल्या निवडणूक सभेत महागंठबंधन आघाडीवर छठी मातेचा अपमान केल्याचा आरोप लावला होता, ज्याचा फायदाही निवडणूक निकालांच्या कलांमध्ये स्पष्ट दिसत आहे. २ नोव्हेंबर रोजी पंतप्रधान मोदींनी नवादा आणि आरा येथे सभा घेतल्या.

# मतदार अधिकार यात्रा निष्प्रभ

## राहुल गांधी यांच्या यात्रेच्या मार्गावर काँग्रेसचा धुव्वा



### मतचोरीचा दावा भावला नाही

गांधी यांनी वारंवार दिलेला मतचोरीचा इशारा बिहारच्या मतदारांना भावला नाही. काँग्रेसने या यात्रेला, मतदार यादीच्या विशेषकरून पुनरीक्षण मोहिमेद्वारे भाजपचे लाखो मतदारांना मतदानापासून वंचित ठेवण्याचे षड्यंत्र उघड करण्याचा प्रयत्न म्हणून सादर केले होते. पक्षाच्या नेत्यांनी या प्रयत्नांना एक नैतिक मोहीम आणि 'मोठा गेमचेंजर' म्हटले होते. 'एक व्यक्ती, एक मत या सर्वात प्रतीकात्मक लोकशाही हक्काचे संरक्षण करण्याची ही लढाई आहे,' असे गांधी यांनी घोषित केले होते. निवडणूक आयोगाने त्यांचे आरोप चुकीचे ठरवून फेटाळून लावले होते.

**पाटणा : वृत्तसंस्था**

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी या वर्षाच्या सुरुवातीला बिहारमध्ये मोठ्या प्रमाणावर काढलेली मतदार अधिकार यात्रा निवडणुकीत मतांमध्ये रूपांतरित करण्यात अपयशी ठरली आहे.

ही यात्रा सासाराममधून सुरू होऊन पाटण्यात संपली. या यात्रेत २५ जिल्हे आणि सुमारे १,३०० किमी अंतर पार केले. गांधींच्या टीमला आशा होती की, मतदारांशी थेट संवाद साधल्याने यात्रेच्या मार्गावरील ११० मतदारसंघांमध्ये पक्षात उत्साह निर्माण होईल. मात्र, सध्याच्या मतमोजणीच्या कलांनुसार, यापैकी एकही जागा काँग्रेसच्या बाजूने झुकताना दिसत नाही.

पक्षाने लढवलेल्या ६१ जागांपैकी केवळ वाल्मिकीनगर, किशनगंज, मनिहारी आणि बेगुसराय येथेच पक्ष आघाडीवर आहे. ही कामगिरी काँग्रेसच्या त्या आत्मविश्वासाच्या अगदी विरुद्ध आहे, जो त्यांना २०२४ च्या लोकसभा आणि २०२३ च्या तेलंगणा निवडणुकांदरम्यान 'भारत जोडो' यात्रेच्या मार्गावर मिळालेल्या यशातून मिळाला होता.

# बिहारच्या निकालाने महाराष्ट्र भाजपला बळ

**तीन पक्षांची सर्कस असलेले महायुती सरकार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विधानसभेतील यशाची पुनरावृत्ती करू शकणार की लोकसभेप्रमाणे महाविकास आघाडी यशस्वी होणार असा प्रश्न माध्यमांना पडला असतानाच बिहारच्या निकालांनी जनता मोदी भाजप आणि एनडीएच्या पाठीशी असल्याचे अधोरेखित केले आहे. बिहारमधील कौल इतका निर्णायक आहे की महाराष्ट्रात आता त्याचे पडसाद उमटू शकतील. एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे भाजपचे सहकारी नेते आता वातावरण अनुकूल आहे हे जाणतील आणि त्याच वेळी जागावाटपाच्या चर्चेदरम्यान मागण्या मर्यादित ठेवतील असे मानले जाते आहे. विरोधी पक्षातील सर्वात लोकप्रिय नेते उद्धव ठाकरे हे दहा हजार रुपये देण्याच्या भाजपने निर्माण केलेल्या शिरस्त्याला पुरून उरायचे कसे अन जिंकायचे कसे या दुविधेत असल्याचे त्यांच्या निकटच्या सहकाऱ्यांनी नमूद केले.**

मृणालिनी नानिवडेकर
मुंबई

### महाराष्ट्र पॅटर्न

शिवसेना नेते संजय राऊत यांनी हा महाराष्ट्र पॅटर्न असल्याचे खिजवणारे विधान केले असले तरी मतचोरीची हाकाटी जनतेला पटलेली नाही असे सत्ताधारी युतीचे प्रतिपादन आहे. शिवसेना शिंदे गटाने या निकालाचा अर्थ लावत काँग्रेसला यश मिळालेले नाही हे लक्षात घेत आता जागा वाटपात अधिक जास्त काही देणार नाही असे स्पष्ट करत आगामी काळाची चुणूक दाखवली. सत्ताधारी पक्षाचा आत्मविश्वास या निकालांनी वाढवला असून विरोधी पक्ष काहीसे हतोत्साहित झाले आहेत.

### हिंदी भाषक उत्साही

मुंबई आणि बृहन्मुंबई भागात बिहारमधील अनेक स्थलांतरित वास्तव्याला आहेत. ही मंडळी भाजपचे मतदार आहेत, ते या निकालानंतर अधिक विश्वासाने भाजप आणि एनडीएला मतदान करतील असे मानले जाते.

### आयोगाला दिलासा

मतचोरी हा विषय मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र्याच्या राजकारणत चर्चेला आला होता. शिवसेना उबाठा आणि मनसे या पक्षाचा मोर्चा महाराष्ट्रातील राजकारणात बहुचर्चीत होता. त्यामुळे मतदानप्रक्रियेवरील विश्वास डळमळीत होण्याची भीती आयोगातील अधिकारी खाजगीत व्यक्त करतात.राजकारणी आपापल्या सोयीनुसार यावर टिप्पणी करत.आता बिहारमधल्या निकालंमुळे हा मुद्दा मागे पडेल अशी चर्चा आज सुरु होती

# मुस्लिमबहुल मतदारसंघांमध्ये एनडीएची जोरदार मुसंडी

**पाटणा :** बिहार विधानसभा निवडणुकीच्या निकालांच्या सुरुवातीच्या कलांनुसार, राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (एनडीए) अनेक मुस्लिमबहुल मतदारसंघांमध्ये लक्षणीय फायदा झाल्याचे दिसून येत आहे.

मुस्लिम बहुल मतदार संघात एनडीए किमान १६ जागा मिळवण्याच्या मार्गावर आहे. या आघाडीमध्ये मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या जनता दल (युनायटेड) पक्षाला सर्वाधिक फायदा झालेला दिसतो, कारण २०२० च्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत पक्षाला सुमारे आठ जागा जास्त मिळत आहेत. याशिवाय, चिराग पासवान यांचा एलजेपी (आरव्ही) पक्ष अशा सहा जागांवर आघाडीवर आहे, जिथे मुस्लिम मतदारांची संख्या लक्षणीय आहे.

२०२० च्या विधानसभा निवडणुकीत जिंकलेल्या किमान सात मुस्लिमबहुल जागांवर राजदला पराभव पत्करावा लागत आहे, तर काँग्रेस पूर्वी जिंकलेल्या चार अशा जागांवर पिछाडीवर आहे. २०२० मध्ये, राजदने यापैकी १८ जागा जिंकल्या होत्या आणि काँग्रेसने सहा जागांवर विजय मिळवला होता. ऐतिहासिकदृष्ट्या, मुस्लिमांनी धर्मनिरपेक्ष आघाड्यांना पाठिंबा दिला आहे. ते आपल्या समाजातील सदस्यांनी सर्वसमावेशक असल्याचा दावा करणाऱ्या पक्षांना मतदान करावे याची खात्री करतात. २०२२ च्या बिहार सर्वेक्षणानुसार, राज्याच्या लोकसंख्येत मुस्लिमांचे प्रमाण १७.७ टक्के आहे आणि २०१५ मध्ये जवळपास ८० टक्के व २०२० मध्ये ७७ टक्के मुस्लिम मते महागठबंधनला मिळाली होती.

# 'जनसुराज'ला अपयश का ?

**पाटणा : वृत्तसंस्था**

प्रशांत किशोर यांनी तीन वर्षे संपूर्ण बिहारमध्ये प्रवास करून, आपल्या जनसुराज पक्षाला राज्यातील जातीय राजकारणाला एक पर्याय म्हणून सादर केले. प्रशांत किशोर यांच्या पक्षाला एकही जागा जिंकता आलेली नाही. किंबहुना, पक्षाचा साधा उल्लेखही निवडणूक आयोगाच्या मतदानाच्या टक्केवारीच्या आलेखात नाही. त्यांचा पक्ष खाते उघडण्यात अपयशी ठरला का? याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

● **संघटनेशिवायची महत्त्वाकांक्षा**

प्रशांत किशोर यांच्या जनसुराज अभियानाने चर्चा निर्माण केली, पण बिहारमधील इतर पक्षांप्रमाणे मजबूत बूथस्तरीय रचना तयार केली नाही.

● **उतावीळपणा नडला**

जनसुराजमध्ये फक्त एकच नेता होता प्रशांत किशोर. पक्षाचा प्रचार हा वरच्या पातळीवरच मर्यादित राहिला आणि त्यात मधल्या फळीतील नेत्यांची कमतरता होती. प्रत्यक्ष जमिनीवर लोकांना कदाचित फक्त एकाच नावाची ओळख होती.

● **एकसुरी प्रचार**

प्रशांत किशोर यांचा 'बिहारला नव्या राजकीय पर्यायाची गरज आहे' हा वारंवार दिला जाणारा संदेश सुरुवातीला प्रभावी वाटला, पण अखेरीस तोच तोच वाटू लागला.

● **गैरसमजांचा गोंधळ**

प्रशांत किशोर यांनी आपल्या संपूर्ण प्रचारादरम्यान विकासाचा मुद्दा पुढे केला. पण बिहारचे निवडणुकीचे गणित आजही ओळख आणि जातीय समीकरणांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. बिहारमधील अनेक मतदारांमध्ये गैरसमज होता.

● **प्रशांत किशोर स्वतःच निवडणूक न लढवणे**

किशोर यांनी स्वतः निवडणूक का लढवली नाही, याबद्दल अनेक लोकांनी प्रश्न विचारले. त्यांना स्वतःच्या विजयाची खात्री नव्हती का? यामुळे एक प्रकारची संदिग्धता निर्माण झाली आणि अनेक समर्थक संभ्रमात पडले.

# एक्झिट पोल अन् प्रत्यक्ष निकाल

## कोणाचा अंदाज ठरला खरा? ; पोल डायरीचे भाकित तंतोतंत

**पाटणा : वृत्तसंस्था**

भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएने बिहार विधानसभा निवडणुकीत ऐतिहासिक विजय मिळविला.

एनडीएच्या विजयाचा अंदाज किमान १०-११ पोलस्टर्सनी वर्तवला होता; परंतु बहुतांश एक्झिट पोलना येणाऱ्या निकालांचा अंदाज आला नाही. सत्ताधारी पक्षाने ज्या प्रकारे विजय मिळवला आहे, त्याने पुन्हा एकदा एक्झिट पोल चुकीचे ठरवले आहेत, कारण केवळ एकाच पोलस्टरने अचूक अंदाज वर्तवला होता.

केवळ पोल डायरीनेच अचूक अंदाज वर्तवला. या पोलस्टरनुसार, एनडीएला १८४-२०९ जागा मिळण्याचा अंदाज होता, तर महागठबंधनला ३२-४९ आणि इतरांना १-५ जागा मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली होती. बहुतांश पोलस्टर्सनी १३५-१५० जागांच्या दरम्यान अंदाज वर्तवला होता. वस्तुतः, भाजपचे चाणक्य मानले जाणारे अमित शहा यांनी वर्तवलेल्या अंदाजापेक्षाही एनडीएला जास्त जागा मिळत आहेत.

| पोलस्टर | एनडीए | महागठबंधन | जेएसपी /इतर |
|---|---|---|---|
| ॲक्सिस माय इंडिया | १२१-१४१ | ९८-११८ | ०-२ |
| आयएएनएस-मॅट्रिझ | १४७-१६७ | ७०-९० | ०-२ |
| पीपल्स इनसाईट | १३३-१४८ | ८७-१०२ | ०-२ |
| चाणक्य स्ट्रॅटेजीज | १३०-१३८ | १००-१०८ | ० |
| पीपल्स पल्स | १३३-१५९ | ७५-१०१ | ०-५ |
| जेव्हीसी पोल्स | १३५-१५० | ८८-१०३ | ०-१ |
| दैनिक भास्कर | १४५-१६० | ७३-९१ | ५-१० |
| पी-मार्क | १४२-१६२ | ८०-९८ | १-४ |
| टीआयएफ रिसर्च | १४५-१६३ | ७६-९५ | ० |
| डीव्ही रिसर्च | १३-१५२ | ८३-९८ | २-४ |
| पोल डायरी (नवीन) | १८४-२०९ | ३२-४९ | १-५ |

महत्त्वाचे

## शेअरसाठी घेतलेल्या पैशांचा अपहार करुन फसवणुक

**मुंबई :** शेअरसाठी घेतलेल्या पैशांचा अपहार करुन फसवणुक केल्याप्रकरणी रजत अमरचंद जैन या व्यावसायिकाला पोलिसांनी अटक केली. अटकेनंतर त्याला बोरिवलीतील स्थानिक न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. तक्रारदार बोरिवली परिसरात राहत असून ते शेअर ट्रेडिंगसह डिलर म्हणून काम करतात. एप्रिल महिन्यांत त्यांच्याकडे एका खाजगी कंपनीने ५० हजार अनलिस्टेड शेअरची मागणी केली होती. मात्र त्याच्याकडे शेअर नसल्याने त्यांच्या परिचित मित्राने त्यांना रजत जैनची माहिती दिली होती. एप्रिल महिन्यांत त्यांनी रजतला संपर्क साधून त्याच्याकडे ५० हजार अनलिस्टेड शेअरची मागणी केली होती. पेमेंट मिळताच त्याने त्यांना ४० हजार शेअर पाठविले होते. मात्र वारंवार विचारणा करुनही त्याने त्यांना दहा हजार शेअर पाठविले नाही. त्यामुळे तक्रारदार त्यांच्या मित्रासोबत त्याच्या बंगलोर येथील राहत्या घरी गेले होते. मात्र त्यांना तिथे रजत भेटला नाही. त्याला कॉल केल्यानंतर त्याने त्यांना पैसे देणार नाही किंवा शेअर पाठविणार नाही असे सांगून बघून घेण्याची धमकी दिली होती. या धमकीनंतर ते दोघेही मुंबईत आले होते.

## मुंबईतून अपहरण झालेली चार वर्षांची मुलगी सापडली

**मुंबई :** मुंबईतून अपहरण झालेली चार वर्षांची मुलगी सहा महिन्यानंतर सापडली. गेल्या सहा महिन्यांपासून ती उत्तरप्रदेशच्या वाराणासी येथील काशी अनाश्रामात असल्याचे उघडकीस आले होते. या मुलीलात ताब्यात घेतल्यांनतर तिला तिच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आहे. आतापर्यंतच्या तपासात या मुलीचे एका अज्ञात व्यक्तीने अपहरण केले होते, त्याचा पोलिसांकडून शोध सुरु असल्याचे ोलिसांनी सांगितले. यातील तक्रारदार महिला ही सोलापूरची रहिवाशी असून ती तिच्या दिड वर्षांच्या मुलीच्या उपचारासाठी मुंबईत आली होती. सीएसएमटी रेल्वे स्थानकाजवळील फुटथपावर ही महिला तिच्या पती, दोन मुलींसोबत राहत होते. २० मे २०२५ रोजी तिची मोठी चार वर्षांची मुलगी बिस्कीट आणण्यासाठी दुकानात गेली होती, मात्र ती दुकानातून परत आली नाही. त्यामुळे त्यांनी तिचा शोध घेतला, मात्र ती सापडली नाही. तिने तिच्या मुलीची मिसिंगची तक्रार एमआरए मार्ग पोलिसांत तक्रार केली होती. या तक्रारीनंतर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा नोंदवून तिचा शोध सुरु केला होता.पालकांच्या स्वाधीन करण्यात आले होते.

## रेकी करुन फक्त कॅशची चोरी करणाऱ्या सराईत आरोपीस अटक

**मुंबई :** रेकी करुन कॅशची चोरी करणाऱ्या अझान खान ऊर्फ अभयराज मोतीलाल सरोज ऊर्फ मोनू या आरोपीस कांदिवली पोलिसांनी अटक केली. मोनू हा सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध शंभरहून अधिक गुन्ह्यांची नोंद आहे. नोव्हेंबर महिन्यांत कांदिवलीतील एका दुकानात घरफोडी झाली होती. अज्ञात चोरट्याने दुकानात प्रवेश करुन कॅशची चोरी केली होती. याप्रकरणी घरफोडीचा गुन्हा दाखल होताच आरोपीचा शोध सुरु केला होता. मालाड, मालवणीतील मढ परिसरातून पोलिसांनी मोनू याला चौकशीसाठी ताब्यात घेतले होते. चौकशीत त्यानेच ही घरफोडी केल्याची कबुली दिली. रात्री दोन ते चारच्या दरम्यान रेकी केल्यानंतर तो विविध दुकानात प्रवेश करुन चोरी करत होता. तो कुठल्याही सोन्याचे दागिने, मोबाईलला हात लावत नव्हता.फक्त कॅश चोरी करुन पलायन करत होता. याच पैशांतून ड्रग्ज विकत घेऊन त्याचे तो सेवन करत होता. अटकेनंतर त्याला बोरिवलीतील स्थानिक न्यायालयात हजर करण्यात आले होते. यावेळी न्यायालयाने त्याला पोलीस कोठडी सुनावली आहे.

# बालकामगारांचे पुनर्वसन कागदावरच

## अडीच वर्षात केवळ ७०१ धाडी टाकून ३९१ बालकामगारांची सुटका

**ठाणे : अनुपमा गुंडे**

राज्यशासनाच्या कामगार, महिला व बालविकास विभाग, पोलीस आणि सामाजिक संस्थांच्या वतीने टाकण्यात येणाऱ्या व्यवसाय व उद्योगात टाकणाऱ्या धाडी आणि त्यातून बालकामगारांची होणारी सुटका यांची संख्या दिवसेंदिवस घटते आहे. कामगार विभागाने गेल्या अडीच वर्षात केवळ ७०१ धाडी टाकून त्यातून सुमारे ३९१ बालकामगारांची सुटका केली आहे.

सुटका करण्यात आलेले बालकामगार शिक्षणाच्या प्रवाहात येण्यासाठी राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पातंर्गत कार्यरत असलेल्या औपचारिक शिक्षणाच्या शाळा बंद झाल्याने अनेक मुले पुन्हा बालमजुरीच्या प्रथेत ओढले जातात, हे वास्तव आहे. राज्यातील धोकादायक उद्योग, जरीकाम, हॉटेल, कपडा उद्योग आणि इतर अनेक व्यवसाय व उद्योगांमध्ये आजही हजारो बालकामगार कार्यरत आहेत, मात्र मनुष्यबळाची कमतरता आणि राज्यशासन बालकामगारांच्या प्रश्नाप्रती म्हणावे तितके संवेदनशील नसल्याचे शासकीय आकडेवारी सांगते आहे.

बालकामगाराची मुक्तता केल्यानंतर त्यांना पालक असले तर मुले त्यांच्या स्वाधीन केले तरी ते केंद्र सरकारच्या राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पातील शाळांमध्ये सामावून घेतले जात; परंतु या शाळा बंद करून या मुलांना समग्र शिक्षा अभिनयात सामावून घेतले जाते. त्या मुलाच्या निवाऱ्याची सोय नसल्यास त्याला एखाद्या संस्थेत दाखल करून घेतले जाते, पण जी मुले पालकांच्या स्वाधीन केली जातात, ती मुले कौटुंबिक गरजा भागविण्यासाठी बालमजूरीकडे वळतात, कारण बालमजूरी रोखण्यासाठी राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिपत्याखाली असेलेल्या कृती दलाच्या बैठका नियमित होत नाहीत.

त्यामुळे प्रथेतून मुक्त केलेली मुलांचे पुढे काय होते, हे यंत्रणा कागदोपत्री दाखवत असली शासकीय यंत्रणेकडे पुरेसे मनुष्यबळ आणि या विषयी आस्था नसल्याने या मुलांचा पुनर्वसन प्रक्रियेचा पाठपुरावा करण्यात यंत्रणा अपयशी ठरतात. महिला व बालविकास विभागाच्या मार्फत रस्त्यावर फिरणाऱ्या बालस्नेही फिरत्या पथकांच्या शाळांमार्फत औपचारिक शिक्षणाची सोय केली जात असली तरी राज्यातील सर्व शहरे आणि महानगरांमध्ये ही सुविधा कार्यरत नाही, त्यामुळे सुटका झालेल्या कोवळ्या हातांना व्यवस्थेत वालीच नाही.

**राज्यात २०२३ ते २०२५ या कालावधीतील बालकामगारांची माहिती**

| वर्ष | धाडींची संख्या | मुक्त केलेले बालकामगार | | एफआरआय दाखल झालेले मालक |
|---|---|---|---|---|
| | | १४ वर्षाखालील | १८ वर्षाखालील | |
| २०२३ | १९५ | ६९ | ६६ | ७३ |
| २०२४ | २६० | ५४ | ६३ | ५५ |
| २०२५ (जून) | २४६ | ४४ | ९५ | ७३ |
| एकूण | ७०१ | १६७ | २२४ | ०१ |

### औपचारिक शाळा बंद झाल्याने अनेक मुले पुन्हा बालमजुरीच्या प्रथेत

**प्रथेतून मुक्ती कधी ?**

बालकामगारांशी संबंधित सर्व यंत्रणांच्या वतीने बालकामगारांच्या बाबतीत जागृती मोहीम राबविण्यात येत असली तरी या प्रथेतून मुक्त झालेल्या किंवा कुटुंबांसाठी राबणाऱ्या हातांना या प्रथेतून मुक्ती कधी मिळणार, का त्याची मुक्तता कागदोपत्रीच राहणार, हा प्रश्न आहे.

## प्रभादेवी येथील इमारतींची पाहणी

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

प्रभादेवी पुलाच्या पायाभरणीचे काम सध्या सुरू आहे. १३ नोव्हेंबरपर्यंत एकूण ७ ठिकाणी काम पूर्ण झाले आहे. पायाभरणी कामादरम्यान सुमारे ५० स्थानिक रहिवाशांनी हे काम थांबवले. येथील दोन इमारती १०० वर्षे जुन्या असून पायाभरणीच्या कामामुळे निर्माण होणाऱ्या कंपनांमुळे इमारत कोसळण्याची भीती त्यांना वाटत होती.

इमारतींच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने कामादरम्यान इमारतीच्या स्थापत्य स्थितीचे परीक्षण करण्यासाठी एमएमआरडीएच्या कंत्राटदाराकडून व्हीजेटीआयच्या तज्ज्ञांची नियुक्ती केली आहे. तज्ज्ञांनी कामादरम्यान निर्माण होणाऱ्या कंपनांचा इमारतीवर होणारा परिणाम अभ्यासण्यासाठी -इमारतीवर ॲक्सेलरोमीटर वापरून कंपन अभ्यास, क्रॅक विड्थ गेजेस वापरून भेगांची रुंदी मोजणे व टिल्ट सेन्सर्स वापरून कलन मोजणे करिता उपकरणे बसविण्यात आली आहेत. १४ नोव्हेंबरला एमएमआरडीएचे अधिकारी, व्हीजेटीआयचे तज्ज्ञ प्राध्यापक व प्रकल्प सल्लागार यांनी रहिवाशांसोबत पाहणी करून परीक्षणाबाबत माहिती दिली. याव्यतिरिक्त व्हीजेटीआयचे तज्ञ प्राध्यापक यांनी पाइल बोरिंग दरम्यान प्रतिबंधात्मक उपाय म्हणून हार्ड रॉकमध्ये सॉकेटिंग करताना रिग मशीनचा आरपीएम कमी करणे, चिखल काढताना ध्वनी पातळी कमी ठेवणे व पाइल बोरिंग दरम्यान कंपन निरीक्षण करणे या सूचना कंत्राटदाराला केल्या.

## पुण्यातील मालमत्ता विक्रीत ३९ टक्के घट

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

पुण्यात ऑक्टोबर २०२५मध्ये १२ हजार ६९३ मालमत्तांची नोंदणी झाली असून यामुळे मुद्रांक शुल्क संकलन ५२७ कोटींवर पोहोचले आहे. मात्र ऑक्टोबर २०२४ नुसार तुलना करता मालमत्ता नोंदणीमध्ये ३९ टक्के घट झाली आहे तर, महसूल संकलन ३० टक्क्यांनी घटले आहे.

गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये नवरात्रोत्सव आणि दिवाळी हे दोन्ही सण आले होते. यामुळे ग्राहकांमध्ये उत्साह होता. याउलट, या वर्षी नवरात्रोत्सव सप्टेंबरमध्ये आला. केवळ दिवाळी ऑक्टोबरमध्ये आली.यावर्षी सप्टेंबरच्या तुलनेत ऑक्टोबरमध्ये ६ टक्के घट झाली. गेल्या चार वर्षांत वर्षाच्या पहिल्या दहा महिन्यांसाठीची सर्वाधिक मालमत्ता नोंदणी आणि मुद्रांक शुल्क संकलन या वर्षी साध्य झाले आहे. नाईट फ्रँक इंडियाने जाहीर केलेल्या अहवालातून ही बाब समोर आली आहे.

### पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त स्तुती रॅली...



**ठाणे: पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या १३७ व्या जयंतीनिमित्त ठाण्यातील धर्मराज पक्षाच्या नेतृत्वाखालील पक्ष आणि संघटन कामगार नेते राजन राजे यांनी ठाणे बाजारपेठेत स्तुती रॅली काढली. यावेळी ईव्हीएम आणि बोगस मतदानाच्या मुद्द्यांना ठळकपणे मांडण्यात आले. (छाया : अनिशा शिंदे)**

## पूरग्रस्त जमीनीसाठी खनिज रॉयल्टी माफ

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

अतिवृष्टी, पुरामुळे खरडून गेलेल्या शेतजमिनीला पूर्वस्थितीत आणण्यासाठी लागणारी माती, गाळ, मुरूम, कंकर मोफत पुरवण्याचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

पुरामुळे शेतीचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना त्यांची जमीन पुन्हा लागवडी योग्य व सुपीक करण्यासाठी लागणाऱ्या माती, गाळ, मुरूम, कंकर या गौण खनिजांवरील स्वामित्वधन (रॉयल्टी) माफीच्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याचे सक्त आदेश बावनकुळे यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले. बावनकुळे यांनी सांगितले की, नैसर्गिक आपत्तीग्रस्त व्यक्तींना घर, गुरांचा गोठा, शेत व विहिर यांसाठी आवश्यक पाच ब्रास गौण खनिजाच्या वापरासाठी सूट मिळेल. राज्याच्या अनेक भागात अतिवृष्टी आणि पूरस्थिती निर्माण झाल्याने शेतपिकांचे नुकसान झाले आहे. अशा जमिनी पडीक पडत असून, त्यांना पुन्हा लागवडीयोग्य करण्यासाठी शेतकऱ्यांना गौण खनिजांची आवश्यकता असते. त्यामुळे महसूल विभागाने हा निर्णय घेतला असल्याचे ते म्हणाले.

## सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात आता घुमणार 'तारा'ची डरकाळी



**कोल्हापूर :** सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात आता 'तारा'ची डरकाळी घुमणार आहे. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील चंदा वाघीण एक हजार कि.मी.चा २७ तासांचा प्रवास करत शुक्रवारी पहाटे चांदोलीत (जि. सांगली) दाखल झाली. तिला सोनार्ली येथील 'एनक्लोजर'मध्ये सोडण्यात आले. याकरिता राबविण्यात आलेले 'ऑपरेशन तारा' फत्ते झाले आहे. सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात आठ वाघ आणण्यात येणार आहेत. ते ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प आणि पेंच व्याघ्र प्रकल्पातून स्थानांतरित करण्यास केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने मंजुरी दिली आहे. 'चंदा'चे सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात आता 'तारा'असे नामकरण केले असून तिला एसटीआर टी ४ असा क्रमांकही देण्यात आला आहे. भारतीय वन्यजीव संस्था यांच्या मार्गदर्शनाखाली सुरक्षिततेचे सर्व मानदंड वापरून स्थानांतराची ही मोहीम राबविण्यात आली. चंद्रपूर येथील वन्यजीव पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. आर. एस. खोब्रागडे यांनी या मोहिमेचे नेतृत्व केले. बुधवारी (दि. १२) ताडोबा येथून रात्री दहा वाजता तिचा प्रवास सुरू झाला. शुक्रवारी रात्री दीड वाजता या वाघिणीला घेऊन पथक चांदोली येथे दाखल झाले.

# स्टार्टअप्स, बचत गटांना कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध करून देणार

## उद्योगमंत्री उदय सामंत : दिल्लीतील व्यापार मेळाव्यात महाराष्ट्र दालनाचे उद्घाटन

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**



महाराष्ट्रातील स्टार्टअप्स, बचत गट आणि 'एक जिल्हा एक उत्पादन'अंतर्गत उत्पादित वस्तूंना हक्काची बाजारपेठ तसेच छोट्या उद्योगांच्या व्यापारवाढीसाठी शासन नेहमीच प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी येथे केले.

दिल्लीतील प्रगती मैदान येथे आयोजित ४४ व्या भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळाव्यातील महाराष्ट्र दालनाचे उद्घाटन मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते झाले. यावेळी उद्योग विभागाचे सचिव डॉ. पी. अनबलगन, महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त व सचिव आर. विमला, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विवेक पानसरे आणि सह व्यवस्थापकीय संचालक प्रशाली दिघावकर यांसह मान्यवर उपस्थित होते. या मेळाव्यात महाराष्ट्राला भागीदार राज्याचा विशेष दर्जा देण्यात आला असून हे दालन राज्याच्या विकासाला नव्या दिशा देईल, असा विश्वासही सामंत यांनी व्यक्त केला.

त्यांनी दालनातील सहभागी स्टॉलची पाहणी करून स्टॉलधारकांशी संवाद साधला व त्यांच्या उत्पादनांची माहिती घेतली. राजधानीत अशा मोठ्या मेळाव्यात महाराष्ट्र दालनाची उभारणी राज्य आणि देशासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. यामुळे स्टार्टअप्सना गती मिळेल तसेच गुंतवणुकीला चालना आणि बचत गटांना प्रोत्साहन मिळेल, असेही यावेळी त्यांनी सांगितले. या मेळाव्यात झारखंडला फोकस राज्याचा दर्जा देण्यात आला असून महाराष्ट्रासह उत्तर प्रदेश, बिहार आणि राजस्थान या चार राज्यांना भागीदार राज्य म्हणून विशेष दर्जा प्राप्त झाला आहे.

### एक भारत श्रेष्ठ भारत संकल्पनेवर आधारित

- महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाने 'एक भारत श्रेष्ठ भारत' या संकल्पनेवर आधारित महाराष्ट्र दालनाची उभारणी केली आहे. दालनाचा दर्शनी भाग शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांना युनेस्को मान्यता मिळवून देण्यावर आहे. किल्ले हे सांस्कृतिक अभिमानाचे प्रतीक म्हणून मांडले गेले आहेत.

### महाराष्ट्र दालनात नेमके आहे काय?

- महाराष्ट्र दालनात ६० गाळे उभारण्यात आले असून यात विविध शासकीय विभाग, एक जिल्हा एक उत्पादन, महिला बचत गट, महिला उद्योजिकांसाठी राखीव आहेत. बचत गटातील महिलांनी बनवलेले खाद्यपदार्थांचे प्रदर्शन आणि विक्री होत आहे. हातमागावर पैठणी विणण्याचे प्रात्यक्षिक दाखवले आहे.

## मोबाइल चोरीप्रकरणी दोघांना अटक; चोरीचे मोबाइल जप्त

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मोबाईल चोरीच्या गुन्ह्यांतील दुकलीस बांगुरनगर पोलिसांनी अटक केली. सोहेल उमर फारुख खान आणि संदीप नंदू मोहिते अशी या दोघांची नावे आहेत. या दोघांच्या अटकेने दोन गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले असून त्यांच्याकडून चोरीचे मोबाईल हस्तगत करण्यात आले आहे.

दोन्ही आरोपी सराईत गुन्हेगार असून त्यांच्याविरुद्ध अनेक गुन्हे दाखल आहे. त्यांच्या अटकेने अशाच इतर काही गुन्ह्यांची उकल होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. ४४ वर्षांचा तक्रारदार मालाडच्या मालवणी परिसरात राहत असून रिक्षाचालक म्हणून काम करतो. ११ नोव्हेंबरला गोरेगाव येथे दोन अज्ञात व्यक्तींनी त्याच्या रिक्षात ठेवलेला मोबाईल चोरी करुन पलायन केले होते. याप्रकरणी गुन्हा दाखल होताच पोलिसांनी सोहेल खानला अटक केली.

## पदव्युत्तर 'प्रोव्हिजनल डिग्री' आता होणार ऑनलाइन

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी तात्पुरते पदवी प्रमाणपत्र मिळवण्याची प्रक्रिया अधिक गतिमान आणि सुलभ केली असून, यासाठीचे ऑनलाईन स्टुडन्ट पोर्टल विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. अजय चंदनवाले यांच्या हस्ते सुरू करण्यात आले. या वेळी परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू उपस्थित होते.

उद्घाटनानंतर बोलताना डॉ. चंदनवाले म्हणाले की, विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण, नोकरी किंवा इतर प्रक्रियांसाठी तात्पुरते पदवी प्रमाणपत्र ताबडतोब आवश्यक असते. पूर्वी यासाठी त्यांना दीर्घ प्रतीक्षा करावी लागत होती. नवीन पोर्टलमुळे प्रमाणपत्र तत्काळ उपलब्ध होणार असून संपूर्ण प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि विद्यार्थी-मैत्रीपूर्ण बनली आहे. मूळ पदवी प्रमाणपत्र पदवीदान समारंभापर्यंत उपलब्ध होत नसल्याने विद्यार्थ्यांना अडचणी येत; परंतु ऑनलाईन सेवेच्या माध्यमातून ही तूट भरून निघेल, असेही त्यांनी नमूद केले.

परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर होताच फक्त १ हजार रुपये शुल्क भरून तात्पुरते पदवी प्रमाणपत्र डाउनलोड करता येणार आहे. ऑनलाईन पोर्टलमुळे विद्यार्थ्यांचा वेळ, प्रवासाचा खर्च आणि प्रशासकीय प्रक्रियेत होणारा विलंब मोठ्या प्रमाणावर कमी होणार आहे, असे ते म्हणाले. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांतील विविध अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना केंद्रीय परिषदेकडे नोंदणीसाठी आवश्यक असलेली ही प्रमाणपत्रे पूर्वी ऑफलाईन पद्धतीने दिली जात. त्यामुळे प्रक्रिया वेळखाऊ ठरत होती. परीक्षा विभागात तंत्रज्ञानाचा व्यापक अवलंब करून संपूर्ण कामकाज ऑटोमेशनकडे नेण्यात आले आहे.

# विधी शिक्षणातून शिकण्याची 'सेकंड इनिंग'

## ८३ वयापर्यंत एलएलबी प्रवेश; वकिली 'घराण्यापलीकडे' शिक्षणाचा विस्तार

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

'या वयातही मी होणार वकील'...हे वाक्य आता फक्त बोलण्यासाठी नाही, तर प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रियेतील वास्तव बनले आहे. बारावीनंतर एलएलबी प्रवेशात पुढे वयाची अट नसल्यामुळे १९ वर्षांच्या तरुणांपासून ते ८३ वर्षांच्या ज्येष्ठापर्यंत उमेदवारांनी एलएलबीला प्रवेश घेऊन शिक्षणाची सेकंड इनिंग'सुरु केल्याचे दिसत आहे. विविध वयोगटांतील वकीलीतून स्वप्नपूर्तीचा मार्ग बनल्याचे तीन वर्षांच्या आकडेवारीतून समोर आले आहे.

यावर्षी ६५ वर्षांचे २६ जणांनी ७० वर्षांचे ९, ७७ वर्षांचे २, तर ८३ वर्षांचा १ विद्यार्थी विधी शिक्षण घेत आहेत. पूर्वी कायद्याचे शिक्षण म्हटले की वकिली घराण्यांतील मुलांचाच त्यात मोठा ओढा असायचा. न्यायालयीन परंपरा, कुटुंबातील वकिलांचा प्रभाव किंवा घरातील चाकोरीतून पुढे आलेली





प्रेरणा या सगळ्यामुळे विधी शिक्षण 'परंपरागत' मानले जायचे. मात्र काळ बदलला आहे. आज कायदा शिक्षण ही फक्त कोर्ट-कक्षापुरती मर्यादित करिअर निवड राहिलेली नाही; तर विविध करिअरसाठी आधुनिक, बहुआयामी आणि संधींनी भरलेला अभ्यासक्रम बनला आहे. कायद्याच्या शिक्षणाला वयोमर्यादा नाही; त्यामुळे हे शिक्षण कोणत्याही टप्प्यावर सुरू करता येते. म्हणूनच १९ वयापासून ते तब्बल ८३ वर्षांपर्यंतचे विद्यार्थी मागील तीन वर्षांत लॉ-सीईटी देताना दिसत आहेत.

| वयोगट | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ | एकूण |
|---|---|---|---|---|
| १९ ते २० वर्ष | ५ | ५ | ४४५ | ४५५ |
| २१ ते ३० वर्ष | ९,०५३ | ८,९३४ | ११,४०७ | २९,३९४ |
| ३१ ते ४० वर्ष | ५,३७३ | ५,२७८ | ७,१०२ | १७,७५३ |
| ४१ ते ५० वर्ष | २,५६१ | २,६७१ | ३,२१० | ८,४४२ |
| ५१ ते ६० वर्ष | ९५८ | ९०९ | १,०२७ | २,८९४ |
| ६१ ते ७० वर्ष | १५० | १३३ | १५८ | ४४१ |

### तरुणांचा गट कायमच सर्वाधिक सक्रिय

- गेल्या तीन वर्षांच्या प्रवाहावर नजर टाकल्यास २२ ते २५ हा तरुणांचा गट कायमच सर्वाधिक सक्रिय आहेच याचबरोबर २१ ते ३५ या विस्तृत वयोगटात वर्षागणिक सातत्याने वाढ होत आहे. सर्वांत उल्लेखनीय बाब म्हणजे ६० वर्षांपलीकडील ज्येष्ठ नागरिक ७० ते ७७, अगदी ८३ वर्षांपर्यंतही कायदा शिकण्यासाठी प्रवेश घेत आहेत. ४० ते ६० वयोगटातील ८ हजारहून अधिक विद्यार्थ्यांनी गेल्या तीन वर्षात विधी शिक्षणाची नवीन सुरुवात केली आहे. नोकरी, उद्योजकता, समाजकारण, कौटुंबिक जबाबदाऱ्या किंवा कायद्याचे हक्क जाणून घेण्याची गरज या सर्व कारणांनी हा गट विधी शिक्षणातून शिक्षण घेत आहे.


## पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक- २०२५
### जाहीर सूचना

पनवेल महानगरपालिकेच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला), नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्याकरिता सोडत दिनांक ११ नोव्हेंबर २०२५ रोजी पार पाडण्यात आली आहे.

परंतु मा. राज्य निवडणुक आयोग यांनी पत्र क्रमांक- रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.५७/का-५, दि.१४ नोव्हेंबर २०२५ अन्वये नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिलांच्या ६ जागांसाठी व सर्वसाधरण महिलांसाठी जागा नेमून देणेकरीता सुधारित सोडत काढणेबाबत कळविले आहे त्यानुसार खालीलप्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे:-

| | | |
|---|---|---|
| १. | ना.मा.प्र महिलांच्या आरक्षणाची सोडत काढणे व यथास्थिती नियमानुसार सर्वसाधारण महिला जागा नेमुन देण्याची कार्यवाही करणे. | सोमवार, दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ सकाळी- ११:०० वा स्थळ - आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह |
| २. | प्रारुप आरक्षण, हरकती व सूचना मागविण्यासाठी विहीत नमुन्यात प्रसिध्द करणे. | वार- बुधवार दिनांक १९ नोव्हेंबर २०२५ |
| ३. | प्रारुप आरक्षण हरकती व सूचना मागविण्याचा अंतिम दिनांक | वार- मंगळवार दिनांक- २५ नोव्हेंबर २०२५ (दुपारी ३:०० वा पर्यंत) |
| ४. | हरकती व सुचना दाखल करण्याचे ठिकाण | पनवेल महानगरपालिका मुख्यालय (नागरी सुविधा केंद्र) अथवा संबंधित प्रभाग कार्यालय येथे सादर कराव्यात. |

**टीप :-** दाखल झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन आरक्षणाची अंतिम अधिसूचना प्रसिध्द काण्यात येईल.

स्वाक्षरी/-
आयुक्त,
पनवेल महानगरपालिका

ठिकाण :- पनवेल
दिनांक :- १४/११/२०२५

# पुढारी

संस्थापक - संपादक कै. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव,
मुख्य संपादक - डॉ. प्रतापसिंह ग. जाधव (पद्मश्री पुरस्काराने सन्मानित)

कार्तिक कृ. ११, शके १९४७, श्री शिवशक ३५२ | ६

शनिवार, १५ नोव्हेंबर २०२५

● वर्ष : ८७ ● अंक : १९०


## विश्वासाचा जनादेश

बिहारच्या निवडणूक निकालाने राष्ट्रीय राजकारणाची दिशा स्पष्ट करून टाकली. हा निकाल केवळ एका राज्याचा राजकीय निर्णय नाही; तर केंद्रातील सत्तेला अधिक बळ देणारा जनादेश आहे. नितीश-मोदी जोडी पुन्हा प्रभावी ठरली. यामुळे केवळ बिहारमध्येच नव्हे, तर दिल्लीतील राजकारणातही विरोधकांना मोठा धक्का बसला. 'इंडिया' आघाडीतील विसंवाद आता अधिक ठळकपणे समोर येईल. या पराभवाने विरोधकांच्या ऐक्यावर, रणनीतीवर आणि नेतृत्वावर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. रालोआच्या नेत्यांनी नितीशकुमार यांचा पक्ष तसेच त्यांच्या राजकीय बळाचा विजयासाठी उपयोग करून घेत जी मोट बांधली, त्याने सुरुवातीचे धूसर वातावरण स्पष्ट होत गेले. भाजपची स्पष्ट रणनीती, लांगुलचालनाच्या राजकारणाला छेद देत कल्याणाचा केलेला वादा, जागावाटपात नितीशकुमार यांना विश्वासात घेत साधलेला समतोल, पासवान यांच्या लोकजनशक्ती पक्षासोबतचा राजकीय समझोता कायम ठेवण्यात आलेले यश आणि यशापर्यंत नेऊन पोहोचवणाऱ्या लोकप्रिय घोषणा या प्रमुख कारणांनी 'रालेआ'ने मोठ्या यशाने सत्ता राखली. निवडणुकीत सर्वाधिक चर्चा झाली 'रेवडी' आणि 'एसआयआर'ची. फुकटच्या योजना, मोफत लाभ हा रेवडी या शब्दाचा राजकीय अर्थ. प्रचारात विरोधकांनी घोषणा आणि मोफत योजनांची अक्षरश: बरसात केली, पण लोकांना त्या पोकळ वाटल्या. त्याला ना आधार, ना विश्वास. याउलट सत्ताधारी पक्षाच्या 'रेवड्यां'वर मात्र लोकांनी भरभरून विश्वास ठेवला. मोफत योजना तेव्हाच प्रभावी ठरतात जेव्हा लोकांचा अनुभव त्याच्याशी जोडला जातो. 'रेवडीं'च्या चर्चेत जनतेने विश्वास निवडला. महिलांना सायकली, मुलींसाठी प्रोत्साहन, दारूबंदी आणि यंदा दिलेली १०,००० रुपयांची मदत, या सर्वांचा प्रभाव स्पष्ट दिसून आला. या योजना म्हणजे निवडणूक प्रयोग असला तरी लाखो कुटुंबे त्याचा प्रत्यक्ष अनुभव आणि लाभ घेत आहेत, हे वास्तव नाकारता येणार नाही. हाच विश्वास एनडीएला प्रचंड मतांनी परत सत्तेत घेऊन आला. या लाटेत विरोधक पूर्णपणे वाहून गेले. विरोधकांच्या घोषणा भविष्यातील होत्या. त्यामुळे त्या अनिश्चित, कल्पित होत्या, तर सत्ताधारी पक्षाच्या योजना वर्तमानातील होत्या आणि जनतेने त्याचा आधीच अनुभव घेतला होता. हा मूलभूत फरक विरोधकांना कळला नाही. नितीशकुमारांचा प्रभाव निर्णायक ठरला. त्यांच्या प्रकृतीबद्दल अनेक चर्चा होत्या. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त जनता दलाला नुकसान होईल, असे म्हटले गेले, पण निकालांनी या सर्व अटकळी साफ चुकीच्या ठरवल्या. महिलांचा विश्वास पुन्हा नितीश यांच्यावर असल्याचे सिद्ध झाले. महिलांनी शांतपणे पण निर्णायक मतदान केले. हा विश्वास संयुक्त जनता दलासाठी (जेडीयू) संजीवनी ठरला. मोफत योजनांचे राजकारण अद्याप पूर्णत: गेलेले नाही, पण आता लोक 'विश्वासाचे राजकारण' निवडू लागले आहेत. मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रापासून ते बिहारपर्यंत याचा अनुभव अनेकदा आला आहे. 'एसआयआर'चा मुद्दा विरोधकांनी निवडणुकीतील घोटाळा म्हणून मांडला; परंतु जनतेने हा मुद्दा गांभीर्याने घेतला नाही. निवडणूक आयोगावर जनतेचा विश्वास कायम आहे. एसआयआरचा तांत्रिक परिणाम मात्र झाला. बनावट मतदार कमी झाले. लढत अधिक स्पष्ट झाली आणि 'एनडीए'ला या पारदर्शकतेचा लाभ मिळाला. सरकारने मतदारयादीला लावलेली चाळण सत्ताधाऱ्यांच्या पथ्यावरच पडली. नावे वगळल्याची विरोधकांची ओरड फोल ठरली. लालूप्रसाद यांच्या नेतृत्वाखालील राजद आणि तेजस्वी यादव यांना सामाजिक आधार वाढवण्यात सपशेल अपयश आले. मागासवर्गाचा जो पाठिंबा एकेकाळी लालूप्रसाद यादव यांना मिळायचा तो यावेळी तेजस्वी यांना मिळाला नाही. 'जंगलराज'ची प्रतिमा अजूनही राजद पक्षासोबत जोडली जाते. तेजस्वी ती प्रतिमा बदलू शकले नाहीत. त्यांचा प्रभाव मर्यादित राहिला. यादव-मुस्लिम समीकरणाबाहेर ते विस्तार करू शकले नाहीत आणि विस्तार झाला नाही तिथे पराभव स्वाभाविकच होता. काँग्रेसची स्थिती विशेष चांगली नव्हती. राहुल गांधींचे आरोप जनतेवर परिणाम करू शकले नाहीत. जनता आता आरोप ऐकून मतदान करत नाही; ती काम पाहते. काँग्रेस सध्या त्या 'कामाच्या विश्वासापासून' दूर आहे. हा निकाल काँग्रेससाठीही कठोर संदेश आहे. राहुल गांधींनी याचा गंभीर विचार करायला हवा, असा इशाराच हा कौल देतो. निकालाचा राष्ट्रीय राजकारणावरही मोठा परिणाम होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला विजयाने दिलासा व बळ मिळाले. विरोधक केंद्र सरकारला अस्थिर दाखवण्याचा प्रयत्न करत होते. नितीश कुमार, चंद्राबाबूंची जोड देत नवी समीकरणे मांडली जात होती, पण तसे काही घडणार नाही, हे स्पष्ट करत बिहारने तो मार्गच बंद केला. आता संसदेत सरकार अधिक आत्मविश्वासाने पावले टाकेल. या विजयाचा प्रभाव पूर्व भारतावरही पडेल. पश्चिम बंगालमध्ये तीन महिन्यांत निवडणुकांची शक्यता आहे. या निकालाने भाजपला नवी ऊर्जा दिली. बंगाल हे भाजपचे पुढचे लक्ष्य आहे. ममता बॅनर्जींसाठी हा निकाल धोक्याची घंटा मानावी लागेल. बिहारमधून आलेला हा जनादेश बंगालपासून ईशान्य भारतापर्यंतचे राजकारण बदलू शकतो. बिहारच्या राजकारणातील हा बदल खोल आहे. मतदार आता केवळ जात, धर्म किंवा भावनेवर वाहत जात नाही. जातीय राजकारण त्याने बाजूला ठेवले. तो राजकारण्यांना निरखून घेतो, विश्वास पाहतो. काम पाहतो. राजकारण जलद बदलत आहे. जनता परिपक्व होत आहे आणि आता ती राजकारणाची दिशा ठरवत आहे, हेच निकालाचे सार. 'रालोआ'ला विजयाचे आणि त्यासाठीच्या राजकारणाचे नेमके गणित सापडले आहे, असा निकालाचा दुसरा अर्थ. मध्य प्रदेश (२०२३), हरियाणा (२०२४), महाराष्ट्र (२०२४), दिल्ली (२०२५) आणि आता बिहार या पाठोपाठच्या निवडणूक विजयाने भाजपचा हा दावा सिद्ध केला आहे. आता सरकारसमोर आव्हान असेल ते या 'बिमारू' राज्याला गरिबी आणि दारिद्र्यातून बाहेर काढण्याचे. आता राष्ट्रीय राजकारणात या जनादेशाचे प्रभावी पडसाद दिसू शकतात.

# संपादकीय

## शेअर बाजारातही 'आत्मनिर्भरता'

**पूर्वी विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी जोमाने समभागांची विक्री केली की, भारतीय बाजारात गडगडाट होत असे; पण आता तसे घडत नाही. कारण, देशांतर्गत गुंतवणूकदारांनी त्यांची जागा घेतली आहे. भारताच्या शेअर बाजाराचे खरे मालक आता रिटेल आणि म्युच्युअल फंडस् झाले आहेत.**

**-संदीप पाटील,** शेअर बाजार अभ्यासक



भारतातील शेअर बाजार कोणाच्या इशाऱ्यावर चालतो, या प्रश्नाचे उत्तर काही वर्षांपूर्वीपर्यंत विदेशी गुंतवणूकदारांवर असे होते; पण सप्टेंबर २०२५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या इंडिया ओनरशिप रिपोर्टने आकडेवारीवर आधारित नवे उत्तर दिलं आहे. यावर्षीची सर्वात मोठी आणि ऐतिहासिक बाब म्हणजे पहिल्यांदाच रिटेल गुंतवणूकदारांनी म्हणजेच थेट गुंतवणूक करणाऱ्या आणि म्युच्युअल फंडमार्फत पैसा लावणाऱ्या गुंतवणूकदारांनी मिळून परदेशी गुंतवणूकदारांना मागे टाकले आहे. आता रिटेल गुंतवणूकदारांचा एकत्रित हिस्सा एफपीआयपेक्षा जास्त झाला आहे. दुसरीकडे एफपीआय म्हणजे परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांचा हिस्सा मागील पंधरा वर्षांतील सर्वात नीचांकी पातळीवर आला आहे; पण याच काळात देशांतर्गत म्युच्युअल फंडांनी आणि एसआयपी संस्कृतीने बाजाराला स्थैर्य दिलं आहे. प्रमोटर्सचा हिस्सा स्थिर आहे, तर सरकारचा हिस्सा किंचित कमी झाला आहे. या सर्व घडामोडींचा एकत्रित अर्थ असा आहे की, भारतीय शेअर बाजाराची मालकी आणि दिशा आता हळूहळू भारतीयांच्या हातात येत आहे.

कंपन्यांचे मूळ मालक म्हणजे प्रमोटर्स अजूनही सर्वात मोठे भागधारक आहेत. त्यांच्याकडे एकूण ५०.१ टक्के हिस्सा आहे आणि हा हिस्सा गेल्या काही तिमाहींमध्ये जवळजवळ स्थिर आहे. भारतीय प्रमोटर्सकडे ३२.२ टक्के हिस्सा आहे, तर परदेशी प्रमोटर्सचा हिस्सा वाढून ८.४ टक्क्यांवर पोहोचला असून तो मागील नऊ तिमाहींमधील सर्वाधिक आहे. यावरून भारतीय कंपन्यांवरील परदेशी रणनीतिक गुंतवणूकदारांचा विश्वास वाढत असल्याचे दिसते.

सरकारचा हिस्सा सध्या १० टक्क्यांवर असून तो मागील काही तिमाहींमध्ये किंचित घटला आहे. यामागे तीन प्रमुख कारणे आहेत. पीएसयू कंपन्यांमधील ओएफएस म्हणजे ऑफर फॉर सेल, डिसइन्व्हेस्टमेंटच्या योजना आणि खासगी प्रमोटर्सच्या हिश्श्यांत वाढ. गेल्या काही महिन्यांत पीएसयू बँक इंडेक्सने उत्कृष्ट कामगिरी दाखवली असली, तरी सरकारचा हिस्सा कमी झाल्यामुळे नियंत्रण हळूहळू घटत आहे. म्हणजेच गुंतवणूकदारांचा विश्वास टिकून असला, तरी सरकारी हस्तक्षेप मर्यादित होत चालला आहे.

परदेशी गुंतवणूकदार म्हणजे एफपीआय यांचा हिस्सा १६.९ टक्क्यांवर आला आहे आणि हा मागील १५ वर्षांतील सर्वात नीचांकी स्तर आहे. एफपीआयचा हिस्सा घटण्याची कारणे स्पष्ट आहेत. जागतिक बाजारातील अनिश्चितता, डॉलरचा भाव, भारतातील व्हॅल्यूएशन, अमेरिका-चीन व्यापार तणाव आणि फेडरल रिझर्व्हच्या धोरणातील अस्थिरता. पूर्वी एफपीआयची विक्री सुरू झाली की, बाजारात मोठी घसरण होत असे; पण यावेळी तसं झालं नाही. कारण, देशांतर्गत म्युच्युअल फंड आणि रिटेल गुंतवणूकदारांनी एफपीआयच्या विक्रीची भरपाई केली आहे. त्यामुळे बाजार स्थिर राहिला आहे आणि घसरण टळली.

देशांतर्गत म्युच्युअल फंड म्हणजे डीएमएफ आता भारतीय शेअर बाजाराचे खरे इंजिन ठरले आहेत. डीएमएफचा एकूण हिस्सा १०.९ टक्क्यांवर पोहोचला आहे आणि हा इतिहासातील सर्वाधिक स्तर आहे. सलग नऊ तिमाहींमध्ये डीएमएफने नवा उच्चांक गाठला आहे. दर महिन्याला सरासरी २८,६९७ कोटी रुपयांचे एसआयपी इनफ्लो होत आहे. या सातत्यपूर्ण भांडवल प्रवाहामुळे बाजारात स्थिरता निर्माण झाली आहे. एसआयपीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे बाजार घसरला, तरी गुंतवणूक सुरू राहते. त्यामुळे दीर्घकाळात कंपाऊंडिंगद्वारे संपत्ती वाढते आणि बाजाराला एक प्रकारचा बफर मिळतो. रिटेल, एचएनआय आणि एसआयपीद्वारे गुंतवणूक करणारे भारतीय एकत्रितपणे १८.७५ टक्के हिस्सा ठेवतात आणि हा हिस्सा एफपीआयपेक्षा जास्त आहे. हा गेल्या २२ वर्षांतील उच्चांक आहे. रिटेल गुंतवणूक वाढण्यामागे डिमॅट खात्यांमधील प्रचंड वाढ, शून्य ब्रोकरेज ॲप्सचा प्रसार, सोशल मीडियामुळे शेअर मार्केटचे डेमोक्रटायझेशन, एसआयपी संस्कृती आणि युवा गुंतवणूकदारांची नव्या पिढीतील सक्रियता अशी अनेक कारणे आहेत. या बदलामुळे पहिल्यांदाच रिटेल गुंतवणूकदारांनी परदेशी गुंतवणूकदारांना मागे टाकलं आहे आणि हा भारतीय भांडवली बाजारातील दीर्घकालीन संरचनात्मक बदल मानला जातो. एफपीआय प्रामुख्याने फायनान्शियल्स आणि कम्युनिकेशन सर्व्हिसेस या क्षेत्रात गुंतवणूक वाढवत आहेत; पण एनर्जी, मटेरियल्स, इंडस्ट्रियल्स आणि कंझ्युमर स्टेपल्स याबाबत सावध आहेत. डीएमएफ फायनान्शियल्स, कंझ्युमर डिस्क्रेशनेरी आणि मध्यम स्तरावरील हेल्थकेअर कंपन्यांमध्ये जास्त गुंतवणूक करत आहेत, तर एनर्जी आणि मटेरियल्स सेक्टर टाळत आहेत. रिटेल गुंतवणूकदार मात्र मिडकॅप, स्मॉलकॅप आणि मायक्रोकॅप स्टॉक्सकडे आकर्षित झाले आहेत. मोठ्या कंपन्यांमध्ये रिटेल हिस्सा थोडा कमी झाला असला, तरी लहान कंपन्यांमध्ये तो वाढला आहे.

भारतातील हाऊसहोल्ड इक्विटी वेल्थ गेल्या पाच वर्षांत ५३ लाख कोटी रुपयांनी वाढून ८४ लाख कोटींवर पोहोचली आहे. चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत बाजारातील थोड्या घसरणीमुळे ही संपत्ती २.६ लाख कोटींनी कमी झाली असली, तरी दीर्घकाळातील कामगिरी उल्लेखनीय आहे. पाच वर्षांची वार्षिक सरासरी वाढ २९.८ टक्के आणि दहा वर्षांची वाढ २१.१ टक्के इतकी नोंदली गेली आहे. अहवालात एक रोचक कल दिसतो, संस्थात्मक गुंतवणूकदार म्हणजे इन्स्टिट्युशन्स पुन्हा मोठ्या शेअर्सकडे म्हणजे लार्जकॅप्सकडे वळत आहेत. या अहवालातून रिटेल गुंतवणूकदारांना काही महत्त्वाचे धडे मिळतात. एसआयपी हीच सर्वात मोठी ताकद आहे. एफपीआयची विक्री आता धोक्याची बाब राहिलेली नाही. कारण, डीएमएफ आणि रिटेल मिळून बाजार संतुलित ठेवत आहेत. मिडकॅप आणि स्मॉलकॅपमधील धाव पाहून अंधाधुंद गुंतवणूक करू नये. कारण, जिथे परतावा जास्त असतो तिथे जोखीमही मोठी असते. लार्जकॅप शेअर्स पुन्हा एकदा सुरक्षित पर्याय ठरत आहेत. एका सेक्टरमध्ये किंवा एकाच स्टॉकमध्ये जास्त वा सगळा पैसा गुंतवू नका.

सारांश असा की, भारताच्या शेअर बाजाराचा खरा मालक आता रिटेल आणि म्युच्युअल फंडस् झाले आहेत. भारतीय शेअर बाजार आता परदेशी भांडवलावर अवलंबून न राहता देशांतर्गत बचतीवर चालतो आहे. हा केवळ आकड्यांचा बदल नाही, तर भारताच्या भांडवली बाजाराच्या रचनेतील एक दीर्घकालीन आणि स्थायी परिवर्तन आहे.

## महिला आरक्षणाचे कवित्व

**महिलांसाठी विधिमंडळांमध्ये ३३ टक्के आरक्षणासंबंधीची दुरुस्ती २०२३ मध्येच झाली होती; परंतु देशात पुढील निवडणूक क्षेत्रनिहाय पुनर्रचना (परिसीमन) झाल्यानंतरच ती उच्चस्तरीय विधिमंडळांमध्ये लागू केली जाईल.**

**- सुचित्रा दिवाकर**



संसद आणि राज्य विधानसभांमध्ये ३३ टक्के महिला आरक्षण लागू करण्यात विलंब का होत आहे, याबाबत सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल करून हा प्रश्न उपस्थित करण्यात आला. न्यायालयाने केंद्र सरकारकडून उत्तर मागवले आहे. सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा महिला सशक्तीकरणाच्या बाजूने उभे राहत महिलांना देशातील सर्वात मोठा अल्पसंख्याक गट म्हटले. याचे कारण देशाच्या एकूण लोकसंख्येच्या सुमारे ४८.४ टक्के महिला आहेत; परंतु देशाच्या मुख्य प्रवाहात त्यांचा सहभाग अत्यंत कमी आहे. तसे पाहता महिला आरक्षणासाठीचा कायदा आधीच संमत झाला आहे आणि तो लागू करण्याची जबाबदारी कार्यकारी यंत्रणेवर आहे. महिलांसाठी विधिमंडळांमध्ये ३३ टक्के आरक्षणासंबंधीची दुरुस्ती २०२३ मध्येच झाली होती; परंतु देशात पुढील निवडणूक क्षेत्रनिहाय पुनर्रचना (परिसीमन) झाल्यानंतरच ती उच्चस्तरीय विधिमंडळांमध्ये लागू केली जाईल.

मुख्य प्रवाहातील राजकारणात महिलांचा सहभाग तुलनेने कमी असल्याने महिला सशक्तीकरणाचा पुरस्कार करणाऱ्यांची काळजी समजण्यासारखी आहे. सर्वोच्च न्यायालयाने अशी विचारणा केली आहे की, आरक्षणाशिवाय महिलांना तिकीट का देता येत नाही, हा प्रश्नही राजकीय पक्षांनी विचारात घ्यायला हवा.

सध्या लोकसभेत ७५ महिला सदस्य आहेत आणि राज्यसभेत ४२ महिला आहेत; पण अनेक विधानसभांमध्ये महिलांची कमतरता प्रकर्षाने जाणवते. या पार्श्वभूमीवर महिला आरक्षण व्यवस्थेची अंमलबजावणी करण्याच्या बाजूने न्या. बी. व्ही. नागरत्ना आणि न्या. आर. महादेवन यांच्या खंडपीठाने दाखवलेली सक्रियता प्रशंसनीय आहे. जनहित याचिका आणि न्यायालयीन हस्तक्षेपामुळे सरकार परिसीमनाचे काम कधी पूर्ण करणार आहे, हे स्पष्ट होऊ शकेल. या परिसीमनानंतर भारतीय राजकारणात अनेक बदल होतील आणि त्यातील सर्वात मोठा बदल महिला आरक्षणामुळे होईल.

महिलांसाठीचे आरक्षण लागू झाले, तर लोकसभेतील महिला खासदारांची संख्या किमान १७९ होईल. परिसीमनामुळे जागांची संख्या वाढली, तर लोकसभेतील महिलांची संख्या २०० च्या वर जाईल. देशातील महिलावर्ग या दिवसाची आतुरतेने प्रतीक्षा करत आहे. याचे कारण मुख्य प्रवाहातील राजकारणात महिलांचा सहभाग स्वयंस्फूर्तीने वाढविण्याबाबत राजकीय पक्ष सजग नाहीत. आदर्श परिस्थितीत प्रत्येक पक्षाने स्वत:हून किमान ३३ टक्के जागांवर महिलांना तिकीट दिले पाहिजे. तसे झाल्यास स्वतंत्रपणे महिला आरक्षणासाठी कोणत्याही पक्षाला कायदेशीर बंधन घालण्याची गरज उरणार नाही.

पण, प्रत्येक पक्ष जिंकू शकणाऱ्या उमेदवारांच्या शोधात असतो आणि अशावेळी महिलांचा दावा कमकुवत ठरतो. एक पैलू हादेखील आहे की, बहुसंख्य महिला प्रस्थापित राजकीय घराण्यांतून येतात. केवळ स्वत:च्या गुणवत्तेवर राजकारणात स्थान निर्माण करणाऱ्या महिलांची संख्या कमी आहे. आरक्षण लागू झाल्यानंतरही घराणेशाही निर्माण होऊ न देणे, हे राजकीय पक्षांचे कर्तव्य आहे.

त्यामुळे महिलांना आरक्षण मिळायलाच हवे; पण त्यासाठी आधीच योग्य वातावरण तयार करणेही आवश्यक आहे. केवळ आरक्षण दिल्याने महिलांचे कल्याण होणार नाही. महिलांनाही स्वत:च सक्षमपणे पुढे यावे लागेल. यासाठी महिलांमधील व्यवहार्य जागरूकता सर्वात आवश्यक आहे.

# तडका

## बिबट्याची दहशत




दहशत निर्माण करणाऱ्यांना दहशतवादी असे संबोधले जाते. त्या अर्थाने महाराष्ट्रातील 'बिबटे' नावाचे दहशतवादी राज्यात जागोजागी दिसून येत आहेत आणि त्यांनी मानवांवर चांगलीच दहशत बसवली आहे. उत्तर पुणे, तसेच जुन्नर, अकोले, नाशिक, कोल्हापूर या भागात अनेक बिबट्यांचा मुक्त संचार आहे. आजपर्यंत जंगल आणि गावापर्यंत असणारा बिबट्या थेट शहरातही येतो. हायवेवरदेखील दिसून येतो. बिबट्या हा प्राणी कोणत्याही कारणाशिवाय मानवावर हल्ला करणारा म्हणून ओळखला जातो. हा निशाचर असल्यामुळे संध्याकाळनंतर बिबट्याप्रवण क्षेत्रातील लोक घराबाहेर पडत नसतात. बिबट्यांची संख्या वाढलीय. त्यामुळे आजकाल ते कधीही हल्ला करत आहेत.

बिबट्यांच्या हल्ल्यापासून वाचण्यासाठी खिळे असलेला गळ्याभोवती बांधायचा पट्टा आधी परिसरातील कुत्र्यांसाठी उपलब्ध होता. आता चक्क माणसे आणि महिला हा पट्टा गळ्यामध्ये बांधून शेतात कामाला जात आहेत. भक्षकवर्गातील प्राणी नेहमी माणसाच्या किंवा प्राण्यांच्या गळ्याला जबड्याने विळखा घालत असतात. गळ्याभोवती असे काही संरक्षक अणकुचीदार असेल, तर बिबट्या हल्ला करेल; परंतु जीव घेऊ शकणार नाही, हे निश्चित!

दररोज कुठे ना कुठेतरी बिबट्याने माणसांवर हल्ला केल्याच्या बातम्या येत असतात. या बिबट्यांच्या मुक्त संचाराचे सामाजिक परिणामही दिसायला लागले आहेत. परवाच संपलेल्या दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये ज्या मुलांच्या मामाचे गाव या बिबट्याप्रवण क्षेत्रामध्ये आहे ती मुले मामाकडे जाऊया, असे न म्हणता आपल्याच घरी बसून राहिली. मामाच्या गावी जाण्याचे मुलांना खूप आकर्षण असते; परंतु तिथे असलेली बिबट्यांची भीती पाहून त्यांच्या आई-वडिलांनी मुलांना मामाकडे न पाठवण्याचे ठरवले होते. असाच आणखी एक सामाजिक परिणाम ज्या तरुणांची लग्ने जुळत नाहीत त्यांच्यावरही झाला आहे. ग्रामीण भागात शेतकरी मुलांचे लग्न होणे आधीच अवघड झालेले आहे. मुली शेतकऱ्याकडे जाण्यास व नांदण्यास तयार नाहीत. त्यात पुन्हा नवरदेव म्हणजे लग्नाचा उमेदवार बिबट्याप्रवण क्षेत्रातील असेल, तर मुलींचे आई-वडील आपल्या पोटचा गोळा या भागात देण्यास अजिबात तयार नाहीत.

संसार असो, शेती असो वा व्यवसाय असो, काहीही असले, तरी तुम्हाला घराबाहेर पडावेच लागते. अशावेळी दबा धरून बसलेले बिबटे आजूबाजूला असतील, तर या भागात आपली मुलगी देण्यास कोण तयार होईल बरे? आधीच जटील झालेला मुलांच्या लग्नाचा प्रश्न बिबट्याप्रवण क्षेत्रामध्ये आता गंभीर रूप घेण्यापर्यंत येऊन पोहोचला आहे, हे निश्चित!

■ कलंदर

> लोकशाहीत एका मतदाराचे अज्ञान सर्वांच्या सुरक्षिततेवर परिणाम करते.
>
> - जॉन एफ. केनेडी

### काय चाललंय ?




# निवडक वाचकपत्रे

### 'जेन-झी'ची वाचनाकडे पाठ

'जेन-झी' या पिढीतील मुलांमध्ये वाचनाची ओढ खूप कमी झाली आहे. पाठ्यक्रमाची पुस्तके सोडून मुलांचे अवांतर वाचन अजिबातच होत नाही. मुले फक्त मोबाईलमध्ये गुंतून दिवसभर रिल्स बघण्यात व्यस्त असतात. मुलांना या वयात व्यायाम, शारीरिक खेळ तसेच चांगले वाचण्याची, पौष्टिक पदार्थ खाण्याची सवय लावायला हवी. मोबाईलच्या अतिवापरामुळे मानसिक व शारीरिक आरोग्य बिघडते. निद्रानाश, दृष्टीवर परिणाम, मान दुखणे, लक्ष विचलित होणे, एकाग्रता कमी होणे आणि मनाची चंचलता वाढणे ही लक्षणे मुलांमध्ये दिसून येत आहेत. मुले पालकांचेच अनुकरण करतात. त्यामुळे पालकांनी चांगल्या सवयी अंगी बाणवल्या पाहिजेत. वाचनाची सुरुवात पालकांनी स्वत:पासून करावी. बालपण मोबाईलमध्ये हरवून जायला नको.

**-आदित्य सोनवले,** कोल्हापूर

### सुदृढ आरोग्य महत्त्वाचे

शरीर ही सर्वात मोठी संपत्ती आहे. सध्याच्या काळात आरोग्य चांगले असणे हीच मोठी बाब आहे. नाहीतर सर्व सुखे पायापाशी असूनही त्याचा मनसोक्त उपभोग घेता येत नाही. सध्या व्यायामासाठी सायकल चालविणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. ही स्तुत्य बाब आहे. शक्य नसेल तर रोज ठरावीक अंतर चालण्यानेही चांगला व्यायाम होऊ शकतो. धावपळीच्या युगात आपले आरोग्य जपणे अधिक गरजेचे आहे. त्यासाठी सुदृढ आरोग्यासाठी सायकल चालविणे हा एक उत्तम पर्याय आहे. तसेच व्यायामासह योग्य आहारही महत्त्वाचा आहे. लहान मुलांमध्ये या सवयी रुजवल्या पाहिजेत.

**- संतोष शिंदे,** काष्टी, अहिल्यानगर

### बँकेत ग्राहकांना मार्गदर्शन करा

अनेक राष्ट्रीय बँकांमध्ये दुपारी जेवणाच्या वेळी संपूर्ण कामकाज बंद ठेवून लंच ब्रेक घेतला जातो. त्यामुळे त्या काळात बँकेत आलेल्या ग्राहकांना ताटकळत थांबण्याशिवाय पर्यायच नसतो. लंच ब्रेकवरून कर्मचारी आल्यानंतर लगेच बँकेचे कामकाज होईल, याची खात्रीपण नसते. अनेकदा सर्व्हर डाऊनची समस्या उद्भवते. त्यामुळे वेळ लागेल अशीही कारणे दिली जातात. एकाचवेळी सर्वजण जेवायला गेल्यावर ग्राहकांची गैरसोय होते. कधीतरी ठीक आहे, पण नियमित असे होत असेल तर त्यावर उपाय योजला गेला पाहिजे. आधीच बँकांना सुट्ट्या खूप असतात. त्यामुळे आहे त्या दिवसांत तरी निदान ग्राहकांना किमान चांगली वागणूक तरी द्यावी, अशी अपेक्षा असते. योग्य मार्गदर्शन केले, तर बरेच विषय सहज मार्गी लागू शकतात.

**- अनिल अगावणे,** पुणे

### दहशतवाद ठेचून काढा

जुन्या दिल्लीत झालेला भीषण स्फोट केवळ राजधानीच नव्हे, तर साऱ्या देशाला हादरा देणारा आहे. दहशतवाद्यांनी भारतावर वेळोवेळी हल्ले केले. समोरून थेट लढता येत नाही, तेवढी क्षमता आणि जिंकायची शक्यता नाही. त्यामुळे शेजारी देश पाकिस्तान अशा दहशतवादी कृत्यांना पाठीशी घालतो. गेल्या काही काळात असे हल्ले थंडावले होते. दिल्लीमध्ये २०११ नंतर झालेला हा मोठा स्फोट आहे. दरम्यान, यातून जे मॉड्युल समोर येत आहे ते धक्कादायक आहे. उच्चशिक्षित लोकांचा यातील सहभाग हा वेदनादायी आहे. भारताच्या एकतेवर येथील समान संधींवर ज्यांना विश्वास नाही, असेच लोक अशा दहशतवादाला भुलू शकतात. सरकारने अशा दहशतवाद्यांना ठेचून काढावा. दहशतवाद समूळ नष्ट करण्यासाठी प्रयत्न करावेत. अशी अद्दल घडवावी की, पुन्हा असे हल्ले करण्याची हिंमत होणार नाही. **- वैभव गायकवाड,** सांगली

वाचकांनी दै. 'पुढारी'च्या या संकेतस्थळावर आपली पत्रे पाठवावीत reader@pudhari.co.in

## स्वच्छ ऊर्जा गुंतवणुकीत कोण आघाडीवर ?

इन्फो वेध

इंटरनॅशनल एनर्जी एजन्सीने जूनमध्ये प्रकाशित केलेल्या १० व्या 'वर्ल्ड एनर्जी इन्व्हेस्टमेंट' अहवालात जागतिक पातळीवरील ऊर्जा क्षेत्राचा संपूर्ण आढावा घेतला आहे. २०२५ मध्ये चीन स्वच्छ ऊर्जेत सर्वाधिक गुंतवणूक करणार असून, एकूण जागतिक गुंतवणुकीतील २९ टक्के हिस्सा चीनच्या नावावर आहे. चीनची गुंतवणूक सुमारे ६३० अब्ज डॉलर्सची असेल, जी प्रगत अर्थव्यवस्थांमधील एकूण गुंतवणुकीच्या अर्ध्याहून अधिक आहे. गुंतवणुकीत दुसऱ्या स्थानी, तर युरोपियन युनियन (EU) तिसऱ्या क्रमांकावर आहे. स्वच्छ ऊर्जा क्षेत्रात कुणी किती टक्के गुंतवणूक केली आहे, याविषयी...




स्रोत - इंटरनॅशनल एनर्जी एजन्सी


पुढारी® This is Trade mark of Pudhari Publication Pvt. Ltd.

* R. N. I. No. MAHMAR/2009/28047 * For Pudhari Publication Pvt. Ltd. * Founder Editor Late G. G. Jadhav * Chief Editor Dr. Pratapsinh G. Jadhav * Group Editor, Printer & Publisher - Dr. Yogesh Pratapsinh Jadhav, Printed at - 1) Pudhari Publications Pvt, Ltd., Pudhari Sankul, Plot no. 29 to 32 , 36 & 37, Sector 30, Vashi, Navi Mumbai, Dist - Thane, State - Maharashtra. Phone: 022-62729999. 2) Dangat Media Pvt. Ltd, Plot No. 22, Digha M.I.D.C., the of TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400708, State - Maharashtra. Published at - Pudhari Bhavan,26/28, Dr.M.B.Velkar Street, Kalabadevi , Mumbai-400 002 Dist. Mumbai, State-Maharashtra. Phone: 022-22097200 (Note : As per PRB Act, the Editorial responsibility on the Executive Editor Vivek Girdhari only)



# निवडणूक निकाल २०२५ बिहार विधानसभा



# पंतप्रधान नरेंद्र मोदींचे हात बळकट करणारा निकाल

**विधानसभा निवडणुकीचे निकाल लागले आणि यामध्ये भाजपप्रणीत एनडीएला बहुमत मिळाले. त्यामुळे पुन्हा एकदा बिहारवर एनडीएची सत्ता असणार आहे. ही सत्ता येण्यापूर्वी अनेक अंदाज व्यक्त केले जात होते. बिहारमध्ये एनडीएची सत्ता आली नाही, तर केंद्रातील सरकारला हादरे बसणार का, असेही प्रश्न उपस्थित केले जात होते; मात्र बिहारमधील एनडीएच्या मोठ्या विजयाने पंतप्रधान नरेंद्र मोदींचे हात बळकट केले आहेत.**

**बिहारही आता भाजपचा मजबूत 'किल्ला'**

बिहार निवडणुकीच्या निकालांनी हे सिद्ध केले की, भाजप आता मध्य प्रदेश, राजस्थान आणि महाराष्ट्राइतकाच बिहार राज्यातही मजबूत होत आहे. हा मजबुतीचा ट्रेंड असाच सुरू राहिला, तर भविष्यात बिहारमध्ये भाजप स्वबळावर सरकार स्थापन करण्याच्या स्थितीत असेल. बिहारमध्ये पहिल्यांदाच भाजप सर्वात मोठा पक्ष बनला आहे. नितीशकुमार यांच्यानंतर जदयूचे भविष्य उज्ज्वल दिसत नाही. कारण, त्यांच्याकडे नितीशकुमार यांच्यानंतर त्या राजकीय उंचीचा नेता नाही. त्यामुळे आपसूकच जदयू फार मजबूत राहू शकणार नाही आणि त्यामुळे त्यांना भाजपच्या मागे जाण्यास भाग पाडले जाईल. २०१४ पासून विविध राज्यांमध्ये मित्रपक्षांशी युती करूनही भाजपने स्वतःचा मतदार आधार निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे आणि बिहारमध्ये ते करण्यात यशस्वी झाले आहे. या यशामुळे नितीशकुमार भाजपला सोडू शकत नाहीत. एकूण काय, तर बिहारच्या निकालाने स्वाभाविकच एनडीए आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात आपोआप मजबूत होतात.

## मोदी-नितीश कुमार यांच्यातील दोस्ताना



● पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांची विचारधारा भले विभिन्न असली तरी विकास आणि सुशासन या मुद्द्यांवर दोन्ही नेते एकत्र आल्याने त्यांचा गेल्या दोन दशकातील दोस्ताना आजही कायम आहे. २००५ मध्ये नितीश कुमार भाजपच्या मदतीने बिहारमध्ये सत्तेत आले आणि सुशासन बाबू म्हणून त्यांची प्रतिमा तयार झाली. या काळात ते एनडीएचा भाग होते. २०१३ मध्ये, नितीश कुमार यांनी नरेंद्र मोदी यांना पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून विरोध केला. गुजरात दंगलीच्या मुद्द्यावर तीव्र मतभेद व्यक्त करत त्यांनी एनडीएपासून फारकत घेतली. २०१७ मध्ये त्यांनी आरजेडीसोबतची आघाडी तोडून पुन्हा भाजपसोबत हातमिळवणी केली आणि एनडीएमध्ये परतले.

**प्रशांत वाघाये**

**नवी दिल्ली**

बिहार हे राजकीय आणि सामाजिकदृष्ट्या देशातील महत्त्वाचे आणि संवेदनशील राज्य आहे. विद्यमान केंद्र सरकार हे नितीशकुमार यांचा पक्ष जेडीयूच्या आणि चंद्राबाबू नायडू यांचा पक्ष तेलगू देसम पक्षाच्या मदतीने उभा आहे. अशा परिस्थितीत बिहार जिंकणे हे एनडीएसाठी त्यातही भाजपसाठी खूप महत्त्वाचे होते. बिहार विधानसभा निवडणूक निकालने एनडीएची वीण घट्ट झालीच; मात्र पक्ष म्हणून आधीच मजबूत असलेला भाजप आता अधिक मजबूत झाला आहे. एनडीएमध्ये भाजपचा मित्रपक्षांवर कायमच वरचष्मा असल्याचे पाहायला मिळाले. यानिमित्ताने त्यालाही पुन्हा एकदा मजबुती मिळाली.

२०२० ची विधानसभा निवडणूक नितीश कुमार यांच्या जेडीयूने एनडीएमधून भाजपसोबत लढवली होती. भाजपपेक्षा जेडीयूच्या कमी जागा आल्या होत्या, तरीही नितीशकुमारांच्या नेतृत्वात एनडीएचे सरकार स्थापन झाले; मात्र काही वर्षांत नितीशकुमारांनी भाजपशी फारकत घेऊन राजदच्या मदतीने सरकार स्थापन केले आणि पुन्हा मुख्यमंत्री झाले. हेच नितीशकुमार काही दिवसांनी राजदशी फारकत घेत पुन्हा भाजपसोबत आले. त्यानंतर पुन्हा २०२० प्रमाणेच २०२५ ची विधानसभा निवडणूक एनडीएसोबत लढवली आणि २०२० पेक्षा मोठा विजय एनडीएने मिळवला. दरम्यान, नितीशकुमार यांच्या भूमिकेबद्दल राष्ट्रीय राजकारणात अनेक प्रश्न उपस्थित केले जात होते. २०२५ च्या बिहार विधानसभा निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर नितीशकुमार काय भूमिका घेतील, पुन्हा एकदा जदयू-राजद असे सरकार अस्तित्वात येईल का, असेही अंदाज व्यक्त केले जात होते; मात्र भाजपला पक्ष म्हणून जे घवघवीत यश मिळाले, त्याने याही अंदाजाला ब्रेक लावला.

# काँग्रेसचे लवकरच विभाजन होणार : मोदी

**पान १ वरून...** एमएमसी - मुस्लिम लीग माओवादी काँग्रेस बनली आहे. काँग्रेसचा संपूर्ण अजेंडा आता याचभोवती फिरतो. म्हणूनच काँग्रेसमध्येही एक वेगळा गट उदयास येणार आहे, जो या नकारात्मक राजकारणामुळे अस्वस्थ आहे. हा गट काँग्रेसच्या नामदारांच्या विरोधात आहे. या गटामध्ये तीव्र निराशा वाढत आहे. भविष्यात काँग्रेसमध्ये आणखी एक मोठी फूट पडू शकते. काँग्रेसच्या मित्रपक्षांनाही आता हे समजत आहे की, काँग्रेस सर्वांना नकारात्मक राजकारणात बुडवत आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

**काँग्रेसच्या मित्रांनी सावध राहावे**

पंतप्रधान मोदी म्हणाले की, मी काँग्रेसच्या मित्रपक्षांना आधीच सांगितले आहे की, काँग्रेस हा एक परजीवी आहे. जो त्यांच्या मित्रपक्षांची व्होट बँक गिळंकृत करून पुनरागमन करू इच्छितो. म्हणून त्यांनाही काँग्रेसपासून सावध राहण्याची गरज आहे. बिहारमध्ये राजद अडचणीत आहे. काँग्रेस-राजद वाद लवकरच समोर येईल, असा दावा त्यांनी केला.

**बिहारमध्ये जंगलराज आणि कट्टा सरकार पुन्हा येणार नाही**

बिहारमध्ये जंगलराज आणि कट्टा सरकार पुन्हा येणार नाही, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. लोकांनी विकसित आणि समृद्ध बिहारसाठी मतदान केले आहे. जामिनावर असलेल्यांना जनता साथ देत नाही, हे बिहारने दाखवून दिले, असे म्हणत मोदी यांनी राष्ट्रीय जनता दलाचे नेते लालुप्रसाद यादव आणि तेजस्वी यादव यांच्यावर निशाणा साधला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाषणाच्या सुरुवातीला छटी मैयाचा जयजयकार केला. बिहारच्या लोकांनी गर्दा उडवला, असे ते म्हणाले. या अगोदर मंचावर येताच बिहारी पद्धतीने गमछा उडवत पंतप्रधानांनी विजयाचा जल्लोष व्यक्त केला.

**बिहारमध्ये नवा 'माय' फॉर्म्युला**

पंतप्रधान मोदी म्हणाले की, लोखंडच लोखंडाला कापते, अशी म्हण आहे. बिहारमधील काही घटक पक्षांनी एमवाय अर्थात माय (मुस्लिम आणि यादव) फॉर्म्युला बनवला होता. आजच्या विजयाने नवीन सकारात्मक एमवाय अर्थात माय फॉर्म्युला दिला. हा फॉर्म्युला म्हणजे महिला आणि युवक होय, असे ते म्हणाले.

**लोकशाहीचा विजय**

आज फक्त एनडीएचा विजय नाही, तर लोकशाहीचाही विजय झाला आहे. या निवडणुकीत निवडणूक आयोगावरील जनतेच्या विश्वासाला आणखी मजबूत केले, असे पंतप्रधान म्हणाले.

**मतदार यादी सुधारणा प्रक्रियेसाठी सर्व पक्षांनी पुढाकार घ्यावा**

मतदार यादीच्या सुधारणेला युवक खूप गंभीरतेने घेतात. बिहारमध्ये युवकांनी मतदार यादी सुधारणेचे समर्थन केले. लोकशाहीच्या पावित्र्यासाठी प्रत्येक मतदाराची किंमत आणि हक्क महत्त्वाचा असतो. त्यामुळे प्रत्येक पक्षाचे दायित्व बनते की, मतदार यादी सुधारणा प्रक्रियेसाठी बूथ स्तरावर आपापल्या कार्यकर्त्यांना सक्रिय करावे.

मतदार यादीच्या शुद्धीकरण प्रक्रियेमध्ये सर्व पक्षांनी योगदान द्यावे, असे आवाहन पंतप्रधान मोदी यांनी केले.

# आज ना उद्या, भाजपची जेडीयूशिवाय सत्ता?

**पान १ वरून...** सरकार सध्या जेडीयूला नाराज करण्याचा धोका पत्करणार नाही. ते प्रथम त्यांची राजकीय भूमिका काळजीपूर्वक मांडेल आणि त्यानंतरच ते कोणतेही निर्णायक पाऊल उचलतील, जेणेकरून राज्यातील सत्ता समीकरण किंवा केंद्रातील युती कमकुवत होऊ नये. या कारणास्तव काही काळासाठी जेडीयूच्या सहकार्याने सरकार चालवावे लागेल. परंतु भविष्यात मुख्यमंत्रिपद बदलू शकते. या शक्यतांसाठी राजकीय डावपेच खुले ठेवले जातील.

**भाजपची नजर काँग्रेस आमदारांवर**

काँग्रेसने जिंकलेल्या काही मोजक्या जागांवर भाजपचे लक्ष असेल. किशनगंज मतदारसंघ वगळता इतर सर्व आमदार भाजपमध्ये जाऊ शकतात. काँग्रेस आमदारांचा पक्ष बदलण्याचा मोठा इतिहास आहे.

**जेडीयूमध्येही शुभचिंतकांची कमतरता नाही**

जेडीयूमध्येही भाजपला पसंती देणाऱ्या आमदार आणि खासदारांची संख्या कमी नाही. जेडीयूचे खासदार लल्लन सिंग आणि संजय झा हे सर्वज्ञात आहेत. शिवाय पडद्यामागे भाजपच्या संपर्कात असलेली असंख्य नावे आहेत. नितीश कुमार यांच्या प्रकृतीत थोडासा चढ-उतारही पक्षावरील त्यांची पकड कमकुवत करेल. भाजप याचा राजकीय फायदा घेण्यास तत्पर असेल. यामुळे जेडीयूमध्ये फूट पडण्याची शक्यता निर्माण होईल आणि भाजपची स्थिती मजबूत होईल. या हालचालीमुळे भविष्यात भाजप बिहारमध्ये स्वबळावर सरकार स्थापन करण्याच्या स्थितीत येईल.

**आरजेडीच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह**

या निवडणूक निकालामुळे राजदच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. निकालानंतर लालू यादव यांच्या कुटुंबातील दरी वाढेल. तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वावर प्रश्न उपस्थित होतील. त्यांच्या कुटुंबातील सदस्यच हा आवाज उठवतील. राजद करत असलेल्या वर्गीय राजकारणावर तेजस्वी टिकू शकले नाहीत. एवढेच नाही तर राजदची मुख्य मतपेढी 'एम-वाय' समीकरणही पूर्णपणे तुटले आहे, तर लालूप्रसाद यादव यांनी सत्तेबाहेर असूनही या समीकरणावर आपली पकड कायम ठेवली होती. परंतु सीमांचलमध्ये असदुद्दीन ओवैसी यांच्या एआयएमआयएम पक्षाच्या वाढत्या प्रवेशामुळे माय समीकरणाला तडा गेला आहे. राजदला याचा फटका सहन करावा लागला आहे.

**१.२१ कोटी जीविकादीदीने खेळ खराब केला**

२९ ऑगस्ट २०२५ रोजी जाहीर झालेल्या महिला रोजगार योजनेने निवडणुकीचा समग्र देखावा पूर्णपणे बदलून टाकला. १८ ते ६० वयोगटातील महिलांना दोन लाख रुपये मदत म्हणून मिळाले, ज्यातून सुरुवातीला १०,००० रुपये थेट त्यांच्या खात्यात जमा झाले. यामुळे संपूर्ण बिहारमध्ये एक नवीन लाट निर्माण झाली. २६ सप्टेंबर रोजी पहिला हप्ता आल्यानंतर ही योजना १० हजारिया म्हणून ओळखली जाऊ लागली. निवडणुकीपूर्वी निधी १.२१ कोटी महिलांपर्यंत पोहोचला होता.

७१.६ टक्के महिला मतदारांनी मतदान केले, त्यामुळे २.५१ कोटी महिला मतदारांपैकी २ कोटींहून अधिक महिला मतदार एनडीएकडे झुकल्याचे मानले जाते. एनडीएच्या ऐतिहासिक विजयात महिलांनी निर्णायक भूमिका बजावली.


दूरध्वनी : ०२५० - २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स: ०२५० - २५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com
जावक क्र. : व.वि.श.म./बांध/काअ/५२१/२०२५
दिनांक : १४/११/२०२५

मुख्य कार्यालय, विरार
यशवंत नगर, विरार (प)
ता. वसई, जि. पालघर - ४०१ ३०३.

**वसई-विरार शहर महानगरपालिका**

**जाहीर ई-निविदा सूचना क्र. १० करीता प्रथम मुदतवाढ**

वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सार्व. बांधकाम विभागाने दि.०७/११/२०२५ रोजी ०९ कामांची जाहीर ई-निविदा सूचना https://mahatenders.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर जा.क्र.वविशम/बांध/काअ/४५१/२०२५ दि.०४/११/२०२५ अन्वये प्रसिध्द करून दि.०७/११/२०२५ ते दि. १४/११/२०२५ रोजी स. ११.०० वाजेपर्यंत ऑनलाईन मागविण्यात आल्या होत्या. सदर कामांपैकी काम क्र. १,२,३,८ व ९ करीता अल्प प्रतिसाद प्राप्त झाल्याने या कामांकरीता खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.

मुदतवाढीचा तपशील खालीलप्रमाणे.

१. ऑनलाईन ई-निविदा स्विकृतीची अंतिम दिनांक :- दि. १८/११/२०२५, सकाळी ११.०० वाजेपर्यंत
२. ऑनलाईन ई-निविदा उघडण्याची दिनांक :- दि. १९/११/२०२५, सकाळी ११.०० वाजेपर्यंत

सही/-
(संजय कुलकर्णी)
कार्यकारी अभियंता
वसई-विरार शहर महानगरपालिका



**मिरा-भाईंदर महानगरपालिका**
**निवडणूक विभाग**
स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, ४०१ १०१. दूरध्वनी क्र. २८१९२८२८/२८१९३०८७.
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/नि.वि./१५५/२०२५-२६ दिनांक:- १४/११/२०२५

**मिरा-भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५**
**// जाहीर सूचना //**

मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्याकडील पत्र क्र. रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.५३/का-५, दिनांक १३ नोव्हेंबर, २०२५ अन्वये दि. ११/११/२०२५ रोजीच्या आरक्षण निश्चिती व सोडत निकालास मा. राज्य निवडणूक आयोगाने मान्यता दिली आहे. सोडतीने आरक्षित झालेले प्रभागनिहाय प्रारूप आरक्षण हे दिनांक १७ नोव्हेंबर, २०२५ रोजी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर (www.mbmc.gov.in) महानगरपालिका मुख्यालय आणि सर्व प्रभाग कार्यालयांच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

प्रभागनिहाय प्रारूप आरक्षणाबाबत काही हरकती व सूचना असल्यास त्या दिनांक १७ नोव्हेंबर, २०२५ पासून ते दिनांक २४ नोव्हेंबर, २०२५ (दुपारी ३.०० वाजेपर्यंत) या कालावधीत मिरा-भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, निवडणूक विभाग, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) येथे सादर कराव्यात.

**जा.क्र. मनपा/मावज/जाहि./ई-७५४५४३६/२०२५-२६**
**दि. १४/११/२०२५**
दिनांक :- १७/११/२०२५
ठिकाण :- भाईंदर

सही/-
(राधाबिनोद अ. शर्मा भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा-भाईंदर महानगरपालिका



**पुणे महानगरपालिका**
**उप आयुक्त**
**घनकचरा व्यवस्थापन कार्यालय**
**निविदा प्रक्रिया कक्ष**
**निविदा जाहिरात - नवीन कामे**
अद्वितीय & Unique

**विक्री कालावधी :** दिनांक १५/११/२०२५ ते २५/११/२०२५ **जाहिरात क्र. २/१२२२ :** दि. १३/११/२०२५
**निविदा स्वीकृती :** दिनांक १५/११/२०२५ ते २५/११/२०२५ **तांत्रिक निविदा उघडणे :** दि. २६/११/२०२५

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा संच किंमत र. रु. | अंदाजित पूर्वगणित र. रु. (जीएसटीविरहित) | बयाणा र. रु. | कामाची मुदत (महिने) | निविदाविषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व मोबाईल क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | PMC/SWM / 2025-26 / 38 | घनकचरा व्यवस्थापन विभागअंतर्गत देवाची उरुळी येथे गार्डन वेस्ट प्रकल्प कार्यान्वित करणेकरिता स्थापत्य दुरुस्तीविषयक कामे करणे. | रु. ६०७९/- | ६७,६८,०७३/- | ६७,६८१ | ०५ | श्री. अजय खामकर ९६८९९४९२२३ |
| २ | PMC /SWM / 2025-26 / 39 | घनकचरा व्यवस्थापन विभागअंतर्गत स. नं. १३१ हडपसर येथील ॲमेनिटी स्पेस येथे गार्डन वेस्ट प्रकल्प कार्यान्वित करणेकरिता स्थापत्य दुरुस्तीविषयक कमे करणे. | रु. १३५९/- | ३८,०४,८३८/- | ३८,०४९ | ०५ | |
| ३ | PMC /SWM / 2025-26 / 40 | पुणे शहरातील आकांक्षी स्वच्छतागृहास केअरटेकर रूम बांधणे व इतर तदनुषंगिक कामे करणे. | रु. १३५९/- | ४२,३०,९६१/- | ४२,३०९ | ०५ | |

**टीप :** १) सदर कामाबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केलेला असून, सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहणेसाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत असून, सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.

सही/-
उप आयुक्त
घनकचरा व्यवस्थापन विभाग
पुणे महानगरपालिका



पुढारी Classified is Now Simplified... छोजा फक्त एका क्लिकवर Click classified.pudhari.news

**व्यवसाय**

**कंपनीसाठी घरबसल्या** ३ ते ४ तास काम करा म. २० ह कमवा मो. ९१४५५५१७१, ९५९३५७७१५५.

**घरी बसून काम** करा रॉ मटेरियल कंपनी देणार, पक्का माल कंपनी घेणार मो. ७७४३९२६८९५, ९६.

**अल्प खर्चात सिनियर** सिटीझनांनो ॲग्रोफुड उद्योगात प्रॉपर्टी सेक्यूरिटी घ्या दर महिना उत्पन्न मिळवा. तरुणांनो कमी खर्चात स्वउद्योग उभारा. संपर्क- ७०२८१२४४०१, ९०८२०२७१६१

**पाहिजेत**

**नामांकित हॉटेलमध्ये अनुभवी** कुक, कॅप्टन, वेटर, हेल्पर त्वरित पाहिजेत. वेटर पगार १२ ते १६ हजार. मोबा- ९७६५३०६५५५.

**घरी बसून मोबाईल** द्वारा रजिस्टर्ड काम करण्यासाठी मुले, मुलींची आवश्यकता आहे. मिस कॉल- ९०३९०३०५००.

**वाचकांसाठी निवेदन**

पुढारी वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करूनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे याची पुढारी पब्लिकेशन्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्तिसंदर्भातील कोणतीही जबाबदारी पुढारी पब्लिकेशन प्रा. लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


## आज दिनांक

### पंचांग

**सूर्योदय :** सकाळी ६.४७, **सूर्यास्त :** सायं. ५.५९, **चंद्रोदय :** ३.२१, **चंद्रास्त :** २.५८, **तिथी :** एकादशी, **नक्षत्र :** उत्तरा फाल्गुनी, **मास :** कार्तिक, **पक्ष :** कृष्ण, **राहूकाळ :** ९.३५ ते १०.५९, **शुभकाळ (अभिजित मुहूर्त) :** ११.४४ ते १२.२६, **यमगंड :** १.२६ ते २.४६, **यमघंट :** २.३५ ते ३.१८.

### दिनविशेष १५ नोव्हेंबर २०२५

● १९२९ : कवयित्री शिरीष पै यांचा जन्म. ● १९४८ : कादंबरीकार सुहास शिरवळकर यांचा जन्म ● १९४९ : महात्मा गांधींच्या हत्येसाठी नथुराम गोडसे व नारायण आपटे यांना फाशी.
●१९८९ : सचिन तेंडुलकरने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले.

### राशिभविष्य

– ज्यो. मंगेश महाडिक

**मेष :** तुम्ही मागील काळात बरेच काम अपूर्ण सोडलेले आहे. त्याची भरपाई आज तुम्हाला करावी लागू शकते.

**वृषभ :** तुमचे विनयशील वागण्याबद्दल कौतुक होईल. अनेक लोक तुमच्यावर स्तुतिसुमने उधळतील. मालमत्ताविषयक कामे होतील.

**मिथुन :** निव्वळ मजा, आनंद तुम्ही लुटू शकाल. कारण, आयुष्य संपूर्ण मजेत घालवणे हाच तुमचा विचार असतो. अधिकचा पैसा गुंतवा.

**कर्क :** एखादी चांगली बातमी मिळण्याची शक्यता आहे, ज्यामुळे केवळ तुम्हीच नाही, तर तुमचे कुटुंबीयदेखील मोहीत होतील.

**सिंह :** दीर्घकाळ प्रलंबित असणारी थकबाकी आणि येणे अंतिमत: प्राप्त होईल. कुटुंबात तुम्ही शांततेचे दूत म्हणून वागाल.

**कन्या :** तुम्हाला शांत ठेवणाऱ्या उपक्रमांमध्ये स्वत:ला गुंतवा. आज तुम्हाला कुणी अज्ञात स्रोताने पैसा प्राप्त होऊ शकतो.

**तूळ :** तुम्ही संकटात सापडू शकता, याची जाणीव ठेवा. मतभेदांमुळे खासगी नातेसंबंधात फूट पडण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक :** तुमच्या पुढे जाण्यासाठी कुणी तरी तुमचा मूड बिघडविण्याचा प्रयत्न करेल. परंतु, तुम्हाला त्रास देण्याचा हा प्रयत्न तुम्ही यशस्वी होऊ देऊ नका.

**धनु :** नातेवाईक, मित्रमंडळी, सहकारी यांच्याशी व्यवहार करताना तुमचे हित सांभाळा. कारण, ते विचार करणार नाहीत.

**मकर :** तुमच्या मैत्रीमधील चांगला काळ आठवा आणि त्या आठवणींना उजाळा देऊन नव्याने मैत्रीपूर्ण वाटचाल करा.

**कुंभ :** तुमच्या परिपूर्ण आत्मविश्वासाचा फायदा घ्या आणि बाहेर जाऊन नवीन लोकांशी, मित्रमंडळींशी संपर्क साधा.

**मीन :** आर्थिक आघाडीवरील सुधारणा तुम्हाला तुमची प्रलंबित देणी आणि बिले देण्यास उपयोगी पडतील.

### गुगल ट्रेंडस्

- बिहार विधानसभा निवडणुकांतील बलाबल शोधले गेले.
- निवडणूक आयोगाचे संकेतस्थळ ट्रेंडिंगमध्ये राहिले.
- दक्षिण आफ्रिका - भारत क्रिकेट न्यूजही ट्रेंडिंगमध्ये होत्या.
- बाल दिनाचे संदेश शोधले गेले.

## शब्दकोडे क्रमांक २८७६

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ■ | ३ | ४ | | ५ |
| ६ | | ■ | ७ | ■ | | ■ | |
| ८ | | ९ | | १० | ■ | ११ | |
| | ■ | | ■ | १२ | | | |
| ■ | १३ | | १४ | | ■ | १५ | |
| १६ | | ■ | १७ | | १८ | ■ | |
| १९ | | २० | ■ | २१ | | २२ | ■ |
| २३ | | | | ■ | २४ | | |

**आडवे शब्द** : १) कापडी/कागदाची तात्पुरती उभारलेली भिंत, ३) मृत्युदेव, ६) हुर्यो, चेष्टा; नावे ठेवणे, ८) दुसऱ्याची कदर करणारा, ११) पाणी/पेट्रोल खेचण्याची मोटर (इं.), १२) पृथ्वी, धरणी, १३) विश्वास, भरोसा, १५) रहस्य; गवंडी; सत्ता, १६) पर्वत; दागिना; वस्तू, १७) आकाश, नभ, १९) जाण्यास निघालेला, २१) परीट, २३) सैन्यातील घोडेस्वारांतील एक हुद्याची जागा, २४) जीभ, वाणी.

**उभे शब्द** : १) त्रास, दगदग, आपत्ती, २) कळ लावणारे देवर्षी, ४) मकरंद, ५) विजय-पराभव, हार-जीत, ७) या वर्षी, ९) स्थितीस्थापकत्व दर्शविणारा एक लवचिक पदार्थ; खोडण्याचे साधन, १०) कल्हईसाठीचा पदार्थ; स्फटिक, ११) दहा आणि पाच मिळून होणारी संख्या, १३) देव, ईश्वर, १४) तमाशातील कथाभाग, १६) मऊ; राठ नसलेले, १८) दृष्टी, २०) विनाश, लय; नष्ट होणे, २२) मातीची सुपीकता; सोन्याची परीक्षा.

**शब्दकोडे क्रमांक २८७५ चे उत्तर :**

**आडवे शब्द** : १) फापटपसारा, ६) पाद, ७) गवत, ९) नवल, १२) सारा, १३) पवन, १६) महासागर, १८) कलह, २०) ससा, २२) लघुत्तम, २५) महाशिवरात्री.

**उभे शब्द** : १) फाल्गुन, २) टपाल, ३) पद, ४) राग, ५) रातराणी, ८) वसा, १०) वक्ता, ११) अवसान, १३) पहा, १४) नग, १५) आकलन, १६) महत्तम, १७) रस, १९) लघु, २१) सावित्री, २३) महा, २४) पाव.

### सुडोकू क्र. ४२२५

| | | | |
|---|---|---|---|
| | | १ | |
| १ | | | |
| | १ | | |
| | | | १ |

### कसे सोडवाल सुडोकू?

सुडोकू सोडवताना उभ्या आणि आडव्या चार कॉलममध्ये एक ते चार हे अंक उभे किंवा आडवे असे बसवा की ते एका सरळ रेषेत एकदाच आले पाहिजेत.

### उत्तर क्र. ४२२४

| | | | |
|---|---|---|---|
| २ | ३ | १ | ४ |
| १ | २ | ४ | ३ |
| ४ | १ | ३ | २ |
| ३ | ४ | २ | १ |

THE NEWS

Those who want to join Telegram Channel,
You , will get all those newspapers in at early morning ,which our user have been getting till now
**The Hindu, The Indian Express All City Editions**

# Click here to join our Telegram channel - https://t.me/+tCO9wU79mq44OTc1

**The Hindu All City Editions**
**Editions:**
Delhi, Bangalore, Chennai, Coimbatore, Eerode, Hyderabad, International, Kochi, Kolkata, Kozhikode, Madurai, Mangalore, Mumbai, Thiruvananthapuram, Tiruchirapalli, Vijayawada, Visakhapatnam
**The Indian Express All City Editions**
**Editions:**
Pune, Mumbai, Lucknow, Kolkata, Jaipur, Chandigarh, Ahmedabad, Delhi

Click here to join our Telegram channel - **https://t.me/+tCO9wU79mq44OTc1**

**Access to 40+ newspapers with city-specific editions**

**Early morning uploads**—always stay ahead!

**Direct PDF delivery on the channel**

**Access to past editions anytime**

**Daily The Hindu & Indian Express Special UPSC IAS Edition**

**Daily The Hindu Ad-Free Edition, The Hindu Editorial, TH + IE Combo Edit For UPSC IAS**


**The Hindu All City Editions**
**Editions:**
Delhi, Bangalore, Chennai, Coimbatore, Eerode, Hyderabad, International, Kochi, Kolkata, Kozhikode, Madurai, Mangalore, Mumbai, Thiruvananthapuram, Tiruchirapalli, Vijayawada, Visakhapatnam
**The Indian Express All City Editions**
**Editions:**
Pune, Mumbai, Lucknow, Kolkata, Jaipur, Chandigarh, Ahmedabad, Delhi

Click here to join our Telegram channel - **https://t.me/+tCO9wU79mq44OTc1**


## Daily All English & Hindi Editorial Newspapers

## Daily The Hindu Analysis PDF, The Hindu Vocabulary

## Others English Newspapers you will get on Telegram Channel

**Business Line** All City Edition, **The Times of India** All City Edition, **The Economic Times** All City Edition, **The Economic Times Wealth**, **Mirror**, **Maharashtra Times**, **Hindustan Times**, **Mint**, **The New Indian Express** All City Edition, **Financial Express** All City Edition, **Business Standard** (Hindi+ English) All City Edition, **Mid-Day (English +Gujarati)**, **Deccan Chronicle** All City Edition, **The Tribune** All City Edition, **The Asian Age** All City Edition, **The Telegraph**, **The New York Times**, **Financial Times**, **The Washington Post**, **New York Post**, **Los Angeles Times**, **USA Today**, **The Wall Street Journal**, **The Guardian**, **The Times**, **The New Yorker**, **Youth Ink**, **Frontline**, **The Economist**, **India Today**, **National Geographic**, **Forbes**, **Employment News**, **English Editorial**

## Hindi & Others Language Newspapers

दैनिक जागरण सभी शहर संस्करण, दैनिक भास्कर सभी शहर संस्करण, ददव्य भास्कर, द दस्ति, नवभारत टाइम्स, अमर उजाला, पिंजाब केशरी, लोकमत, जिसत्ता, लोकसत्ता, दैनिक दिब्यि, प्रभात खबर, सकाल, राष्ट्रीय समाचार,मबई चौफेर, Anandbazar Patrika, Eisamay, Tamil,Telugu & Malayalam Newspaper, रोजगार समाचार, द न्दी एडिटोररयल, The Hindu Hindi Edition,

**Access to 40+ newspapers with city-specific editions**
**Early morning uploads**—always stay ahead!
**Direct PDF delivery on the channel**
**Access to past editions anytime**
**Daily The Hindu & Indian Express Special UPSC IAS Edition**
**Daily The Hindu Ad-Free Edition, The Hindu Editorial, TH + IE Combo Edit For UPSC IAS**

Click here to join our Telegram channel - https://t.me/+tCO9wU79mq44OTc1

THE NEWS

Those who want to join Telegram Channel,
You , will get all those newspapers in at early morning ,which our user have been getting till now
**The Hindu, The Indian Express All City Editions**

# Click here to join our Telegram channel - https://t.me/+tCO9wU79mq44OTc1

**The Hindu All City Editions**
**Editions:**
Delhi, Bangalore, Chennai, Coimbatore, Eerode, Hyderabad, International, Kochi, Kolkata, Kozhikode, Madurai, Mangalore, Mumbai, Thiruvananthapuram, Tiruchirapalli, Vijayawada, Visakhapatnam
**The Indian Express All City Editions**
**Editions:**
Pune, Mumbai, Lucknow, Kolkata, Jaipur, Chandigarh, Ahmedabad, Delhi

Click here to join our Telegram channel - https://t.me/+tCO9wU79mq44OTc1

**Access to 40+ newspapers with city-specific editions**

**Early morning uploads**—always stay ahead!

**Direct PDF delivery on the channel**

**Access to past editions anytime**

**Daily The Hindu & Indian Express Special UPSC IAS Edition**

**Daily The Hindu Ad-Free Edition, The Hindu Editorial, TH + IE Combo Edit For UPSC IAS**

**The Hindu All City Editions**
**Editions:**
Delhi, Bangalore, Chennai, Coimbatore, Eerode, Hyderabad, International, Kochi, Kolkata, Kozhikode, Madurai, Mangalore, Mumbai, Thiruvananthapuram, Tiruchirapalli, Vijayawada, Visakhapatnam
**The Indian Express All City Editions**
**Editions:**
Pune, Mumbai, Lucknow, Kolkata, Jaipur, Chandigarh, Ahmedabad, Delhi

Click here to join our Telegram channel - https://t.me/+tCO9wU79mq44OTc1

## Daily All English & Hindi Editorial Newspapers

## Daily The Hindu Analysis PDF, The Hindu Vocabulary

## Others English Newspapers you will get on Telegram Channel

**Business Line** All City Edition, **The Times of India** All City Edition, **The Economic Times** All City Edition, **The Economic Times Wealth**, **Mirror**, **Maharashtra Times**, **Hindustan Times**, **Mint**, **The New Indian Express** All City Edition, **Financial Express** All City Edition, **Business Standard** (Hindi+ English) All City Edition, **Mid-Day (English +Gujarati)**, **Deccan Chronicle** All City Edition, **The Tribune** All City Edition, **The Asian Age** All City Edition, **The Telegraph**, **The New York Times, Financial Times, The Washington Post, New York Post, Los Angeles Times, USA Today, The Wall Street Journal, The Guardian, The Times, The New Yorker, Youth Ink, Frontline, The Economist, India Today, National Geographic, Forbes, Employment News, English Editorial**

## Hindi & Others Language Newspapers

दैनिक जागरण सभी शहर संस्करण, दैनिक भास्कर सभी शहर संस्करण, ददव्य भास्कर, द दस्ति, नवभारत टाइम्स, अमर उजाला, पिंजाब केशरी, लोकमत, जिसत्ता, लोकसत्ता, दैनिक दिब्यि, प्रभात खबर, सकाल, राष्ट्रीय समाचार,मबई चौफेर, Anandbazar Patrika, Eisamay, Tamil,Telugu & Malayalam Newspaper, रोजगार समाचार, द न्दी एडिटोररयल, The Hindu Hindi Edition,

**Access to 40+ newspapers with city-specific editions**
**Early morning uploads**—always stay ahead!
**Direct PDF delivery on the channel**
**Access to past editions anytime**
**Daily The Hindu & Indian Express Special UPSC IAS Edition**
**Daily The Hindu Ad-Free Edition, The Hindu Editorial, TH + IE Combo Edit For UPSC IAS**

Click here to join our Telegram channel - https://t.me/+tCO9wU79mq44OTc1

# ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान

## राम सुतार यांच्या शिल्पकलेमुळे भारताचा जगभरात लौकिक : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे गौरवोद्‌गार

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

जगविख्यात शिल्पकार राम सुतार यांनी आपल्या शिल्पांच्या माध्यमातून महाराष्ट्रासह देशाचा नावलौकिक जगभरात वाढविला आहे. त्यांनी घडविलेली शिल्पे इतिहासाचे साक्षीदार असून त्यातून अभिव्यक्त होणारा वारसा शेकडो वर्षे अबाधित राहील, अशा शब्दांत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज प्रसिद्ध शिल्पकार राम सुतार यांचा गौरव केला.

राम सुतार यांना शुक्रवारी राज्य सरकारचा सर्वोच्च नागरी सन्मान असणारा 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. भारतरत्न पुरस्कारासाठी ही त्यांच्या नावाचा पाठपुरावा करू, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

राम सुतार यांच्या नोएडा (उत्तर प्रदेश) येथील निवासस्थानी झालेल्या या अनौपचारिक कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, खासदार महेश शर्मा, अनिल सुतार आदी उपस्थित होते. शिल्पकला क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल राम सुतार यांना हा पुरस्कार देण्यात आला असून सन्मानचिन्ह, मानपत्र आणि २५ लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

पुरस्कार प्रदान केल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राम सुतार यांनी घडविलेली शिल्पे अतिशय परिपूर्ण असून जगभरात ती दिमाखात उभी आहेत. त्यांच्या विविध कलाकृती त्यांच्यातील श्रेष्ठ कलाकाराची साक्ष देतात. राम सुतार यांच्या जीवनातील शिल्पांचे महत्त्व अलौकिक असून त्यांच्या असामान्य सृजनशीलतेचा आविष्कार अनेक कलाकृतींमधून अनुभवायला मिळतो. सुतार यांच्या मनात महाराष्ट्र असून पुरस्कार प्रदान करतेवेळी 'जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा' असा जयघोष त्यांनी केला. राम सुतार यांच्यामुळे महाराष्ट्र भूषण पुरस्काराची उंची वाढल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, राम सुतार यांनी केवळ देशातच नव्हे तर जगभर शिल्पे उभारली आहेत. 'देशाचे स्टॅच्यूमॅन' अशी त्यांची ओळख असून अनेक उंच पुतळे उभारणाऱ्या राम सुतार यांच्यामुळे पुरस्काराचीच उंची वाढली आहे. प्रतिभावान ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व असलेले राम सुतार हे मराठी माणसाचा मानबिंदू आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, राम सुतार यांच्या श्रेष्ठ कलेची अनुभूती घेतली आहे. सुतार हे महाराष्ट्राचा अभिमान असून त्यांचे या क्षेत्रातील योगदान अतुलनीय आहे. त्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा निर्मिलेला पुतळा इंदू मिल येथील स्मारकामध्ये उभारण्यात येणार आहे. सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात पुरस्कारामागची भूमिका विशद करून राम सुतार यांनी कलेच्या क्षेत्रात दिलेल्या योगदानाची माहिती दिली. सुतार परिवाराच्या वतीने अनिल सुतार यांनी मनोगतात महाराष्ट्र सरकारचे आभार मानले.



**नवी दिल्ली : ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना शुक्रवारी राज्य शासनाच्या वतीने त्यांच्या दिल्लीतील घरी जाऊन महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या हस्ते सुतार यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्यासह राम सुतार यांचे सुपुत्र अनिल सुतार आणि सुतार कुटुंबीय उपस्थित होते.**

# जागावाटपात मोठा वाटा मागणाऱ्या काँग्रेसचे विजयाचे प्रमाण कमी

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

निवडणुकीच्या जागा वाटपादरम्यान काँग्रेस जास्त जागा मागते. पण प्रत्यक्षात निकालाच्या वेळी त्यांचे विजयाचे प्रमाण खूपच कमी असते. काँग्रेसची आणि त्यांच्या कार्यकर्त्यांची हीच मानसिकता असून याच मानसिकतेमुळे इतर पक्षांचे नुकसान होते, अशी टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी केली.

बिहार विधानसभा निवडणुकीत काँग्रेस महाआघाडीच्या पराभवाच्या पार्श्वभूमीवर बोलताना अंबादास दानवे यांनी काँग्रेसच्या मानसिकतेवर टीका केली. दानवे म्हणाले, तेजस्वी यादव आणि काँग्रेसचा पराभव झाला हे मान्य आहे. तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून घोषित करण्यासाठी लावलेला वेळ आणि जागावाटप अर्ज भरण्याचा अखेरच्या दिवशीपर्यंत चालू होते, हे सुद्धा पराभवाचे एक कारण असल्याचे दानवे म्हणाले.

### अंबादास दानवेंचा खोचक टोला


**जाहीर नोटीस**

याद्वारे जाहीर आवाहन करण्यात येते की, अर्जदार श्री. विरेंद्र नायर, पत्ता-२०१, ओम गणेश बी, प्लॉट नं. १०२, से.१, सानपाडा, नवी मुंबई यांनी त्यांची आई कै. जयंथी नारायण नायर यांच्या मृत्यूची नोंद नवी मुंबई महानगरपालिका यांचे अभिलेखात केली नसल्याने कै. जयंथी नारायण नायर यांनी मृत्यूची नोंद करणेकामी नवी मुंबई महानगरपालिका यांना आदेश देणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज केला आहे.

भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दि.११/०८/२०२३ रोजीच्या राजपत्रान्वये जन्म व मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा, २०२३ मध्ये कलम ११ (२) व (३) मध्ये सुधारणा करुन जन्म-मृत्यूच्या तारखेपासून १ वर्षानंतरच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणांमध्ये जन्म-मृत्यूची नोंद करणेबाबत अनुषंगिक कार्यवाही करुन आदेश देणेकामी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम २३ (२) अन्वये या कार्यालयास अधिकार प्रधान केले ओहत. तरी प्रकरणी कै. जयंथी नारायण नायर यांचे मृत्यूची नोंद करण्याच्या अनुषंगाने आदेश पारीत करणेकामी कोणाचे आक्षेप/हरकत असल्यास १५ दिवसांच्या आत या कार्यालयात कार्यालयीन वेळी स्वत: अगर कायदेशीर सल्लागारासह तसेच आवश्यक त्या पुराव्यांसह न चुकता हजर रहावे. अन्यथा उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे पुढील निर्णय घेण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

क्र.महसूल/कक्ष-१/ज.मृ.नोंद-१/टे-३/ कावि-१३८७/२४
तहसीलदार कार्यालय, ठाणे
दिनांक:- ०३/११/२०२५ सही/-
(उमेश पाटील)
तहसीलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, ठाणे


# 'मविआ'काळातील कारभार भाजपच्या निशाण्यावर !

## विरोधकांवर करणार राजकीय आरोपपत्र; समितीची नियुक्ती

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील स्थानिक स्वराज संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपने विरोधी महाविकास आघाडीच्या कारभाराला लक्ष्य करण्याचा निर्णय केला आहे. त्यासाठी राजकीय आरोपपत्र तयार करण्याचा निर्णय भाजपने केला आहे. या कामासाठी नव्याने गठीत करण्यात आलेल्या निवडणूक संचलन समितीत विशेष नेत्यांची नियुक्तीही करण्यात आली आहे.

**● निवडणूक कार्यक्रम, प्रचार, महिला, युवा, सामाजिक, सहकार, कृषी अशा सर्व विभागांसाठी स्वतंत्र प्रमुख नेमण्यात आले आहेत. विविध समाजघटकांपर्यंत पोहोचण्यासाठी ही संचालन समिती महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास भाजपने व्यक्त केला आहे. निवडणूक साहित्य, वितरण, मीडिया आय.टी., कारभार, कार्यालयीन समन्वय यांसाठी देखील अनुभवी कार्यकर्त्यांची नेमणूक करण्यात आली आहे.**

आगामी महापालिका, नगरपरिषद नगर पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणुकांसाठी भाजपने प्रदेश संचालन समिती जाहीर केली आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी शुक्रवारी या समितीची घोषणा केली. यात प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांच्यासह प्रभारी म्हणून मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि अन्य २१ जबाबदाऱ्यांसाठी राज्यभरातील महत्वाच्या नेत्यांवर जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. यात पक्षाचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये आणि माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांच्याकडे 'आरोप पत्र प्रमुख' आणि 'मीडिया संपर्क'ची दुहेरी जबाबदारी देण्यात आली आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळातील गैरकारभार पुन्हा एकदा लोकांसमोर आणण्याचे भाजपचे धोरण आहे. महाविकास आघाडीवर आरोपांची सरबत्ती करत स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार अशा पक्षाकडे देणार का, असा प्रश्न मतदारांसमोर मांडण्याचे भाजपचे धोरण आहे.

आरोपपत्र प्रमुखांसोबतच समन्वयक म्हणून माधवी नाईक यांची नियुक्ती करण्यात आली असून, सहसमन्वयक पदी विक्रांत पाटील यांची निवड करण्यात आली आहे. तर, विश्वास पाठक हे जाहीरनामा प्रमुख असतील.

# डॉ. अक्षय कुळकर्णींचा प्रदेश काँग्रेस सरचिटणीस पदाचा राजीनामा

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई महापालिका निवडणुकीचे पडघम वाजलेले असतांना काँग्रेस पक्षाला धक्का बसला. महाराष्ट्र युवक काँग्रेस प्रदेश सरचिटणीस डॉ. अक्षय विजय कुळकर्णी यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. त्यांनी पक्षश्रेष्ठीना पत्र लिहून सदर जबाबदारी व भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा अत्यंत जड अंत:करणाने सादर करत असल्याचे सांगितले.


**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ** म्हाडा MHADA

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ

ई-निविदा सुचना क्र.का.अ. (पूर्व)/ मुं. झो.सु.मंडळ/ई-निविदा/मससंम/४६/२०२५-२६

कार्यकारी अभियंता पूर्व विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३६, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (दूरध्वनी क्र. ०२२ ६६४०५२५१) हे जिल्हा उपनिबंधक /पूर्व/मुंबई उपनगरे जिल्हा यांचेकडे नोंदणीकृत पात्र मजूर सहकारी संस्थांकडून एकूण ०४ कामांकरिता बी-१ (टक्केवारी) नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. विस्तृत निविदा सूचना व निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in उपलब्ध असतील. निविदा विक्री दिनांक १७.११.२०२५ दुपारी ०३.०५ पासून दिनांक २४.११.२०२५ सायंकाळी ६.१५ पर्यंत राहील. निविदा सूचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास https://mahatenders.gov.in संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (पूर्व), मुं. झो. सु.मंडळ यांनी राखून ठेवला आहे.

Follow us:@mhadaofficial

सही/-
कार्यकारी अभियंता (पूर्व),
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई

CPRO/A/959

म्हाडा-गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था



जा.क्र. ५५१४/२०२५ दिनांक: २८/१०/२०२५
धर्मादाय आयुक्त भवन, २ रा मजला, सास्मिरा इमारत, सास्मिरा रोड, वरळी, मुंबई- ४०० ०३०.

**जाहिर नोटिस**

**महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५०, कलम ४७ अन्वये खालील नमुद न्यासात विश्वस्तांची नेमणूक करणे बाबत**

**अर्ज क्रमांक :- ६३/२०२५**
**न्यासाचे नाव :- "जाधवपूर युनिव्हसिटी ॲल्युमनी असोसियशन (बॉम्बे ब्रँच) ट्रस्ट"**
**न्यास नोंदणी क्रं :- एफ-६१७२ (मुंबई)**

१. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ४७ अन्वये दाखल अर्ज क्रमांक ६३/२०२५ मधील अर्ज निशाणी क्रमांक १ वर मा. धर्मादाय सह आयुक्त-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिनांक २४/०७/२०२५ रोजी आदेश पारीत केला आहे. सदर आदेशानुसार संबंधित लोकांना व आम जनतेला या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, **"जाधवपूर युनिव्हसिटी ॲल्युमनी असोसियशन (बॉम्बे ब्रँच) ट्रस्ट" नोंदणी क्रं. एफ-६१७२ (मुंबई)** या न्यासात विश्वस्तांची नेमणुक करणेकरीता अर्जदार यांनी सदर अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदाराने नि. क्र. १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे न्यास नोंदणीच्या वेळी न्यासाचे कामकाज पहाण्यासाठी खालील व्यक्ती होते.

१. सुप्रिया कुमार बसू २. मिहिर राजन लोध ३. मनिद्रं नाथ दास
४. गितींद्र मोहन साहा ५. गंगा नारायण घोष ६. जतींद्र मोहन दत्ता ७. अमल कुमार बसू

३. अर्जदार यांनी खालील विश्वस्तांची न्यासाच्या विश्वस्तपदी नेमणूक करण्यासाठी विनंती केली आहे. त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

१. श्यामा प्रसाद रे २. सुकुमार प्रामाणिक ३. अंजान आशुतोष चॅटर्जी
४. अशोक कुमार अधिकारी ५. स्वपनकुमार घोष ६. अनुप घोष ७. दिब्येंडू चक्रबोर्ती

४. सदरचे प्रकरण उपरोक्त नमुद व्यक्तींची न्यासात विश्वस्तपदी नेमणुक करण्यासाठी मा. धर्मादाय सह आयुक्त-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे समोर दिनांक **३०/१२/२०२५** रोजी सकाळी **११.००** वाजता ठेवण्यात आले आहे. तरी वरील नमुद पदनियुक्ती बाबत कोणाला काही हरकती/आक्षेप किंवा काही सांगावयाचे असल्यास त्यांनी स्वत: सदर नोटीस जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांपर्यंत या कार्यालयात हजर राहुन लेखी हरकत किंवा म्हणणे मांडावे. जर कोणीही हजर न राहिल्यास आपणास काहीही हरकत/म्हणणे मांडावयाचे नाही असे गृहीत धरुन योग्य तो कायदेशीर न्याय निर्णय घेण्यात येईल याची आपण सर्वांनी नोंद घ्यावी.

ही नोटीस माझे सही व मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे शिक्यानिशी आज दिनांक २८/१०/२०२५ रोजी दिली.

आपली विश्वासू,
शिक्का
सही/-
(सीमा केणी)
अधिक्षक (न्याय),
धर्मादाय आयुक्त कार्यालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई


# उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतली अमित शहा यांची भेट

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्यासाठी अजित पवार दिल्ली दौऱ्यावर होते.



मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री, सांस्कृतिक कार्यमंत्र्यांच्या उपस्थितीत राम सुतार यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यानंतर मुंबईला रवाना होण्यापूर्वी अजित पवार हे अमित शहा यांच्या निवासस्थानी दाखल झाले. जवळपास अर्धा तास ही भेट चालली. एनडीएचा घटक पक्ष म्हणून ही सौजन्य भेट असल्याचे सांगण्यात येत असले तरी राज्यातील विविध विषय आणि पुण्यातील एका जमीन प्रकरणात पार्थ पवारांचे नाव आल्याच्या पार्श्वभूमीवर ही भेट झाल्याची चर्चा आहे.


iRIS
Building Transparency. Driving Growth.

**आयरीस बिझनेस सर्व्हिसेस लिमिटेड**

नोंदणीकृत कार्यालय : टी-२३१, टॉवर २, तिसरा मजला, इंटरनॅशनल इन्फोटेक पार्क, वाशी - ४००७०३, महाराष्ट्र, भारत
दूरध्वनी: +९१ २२ ६७२३१०००, फॅक्स: +९१ २२ २७८१ ४४३४
ईमेल : cs@irisbusiness.com, वेबसाइट: www.irisbusiness.com,
सीआयएन : L72900MH2000PLC128943

**३० सप्टेंबर, २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि सहामाहीसाठीच्या एकत्रित अलेखापरीक्षित आर्थिक निकालांचा उतारा**

(रक्कम लाखांमध्ये, प्रति शेअर आणि प्रति इक्विटी डेटा वगळून)

| अ. क्र. | तपशील | तिमाही अखेर | | | सहामाही अखेर | | वार्षिक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३०.०९.२०२५ | ३०.०६.२०२५ | ३०.०९.२०२४ | ३०.०९.२०२५ | ३०.०९.२०२४ | ३१.०३.२०२५ |
| | | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित |
| **चालू कामकाज** | | | | | | | |
| १ | कामकाजातून एकूण उत्पन्न | २८५६.३५ | २५१९.२२ | २६९१.१५ | ५३७५.५७ | ५१०८.३६ | १०९६७.६० |
| २ | चालू कामकाजातून कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींपूर्वी #) | २०९.६३ | ७८.७० | ४८२.९८ | २८८.३३ | ८३२.६१ | १९१६.५७ |
| ३ | चालू कामकाजातून कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींनंतर #) | २०९.६३ | ७८.७० | ४८२.९८ | २८८.३३ | ८३२.६१ | १९१६.५७ |
| ४ | चालू कामकाजातून कालावधीसाठी करानंतरचा निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींनंतर #) | १८३.८८ | ३६.७८ | ३७७.०४ | २२०.६६ | ६५६.३० | १३६५.४६ |
| **बंद केलेले कामकाज** | | | | | | | |
| ५ | बंद केलेल्या कामकाजातून कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींपूर्वी #) | (१६.७०) | (४६.३१) | १४.९५ | (६३.०१) | २७.५२ | (६१.५०) |
| ६ | अपवादात्मक बाबी (टीप "f" पहा) | १३५९८.६७ | - | - | १३५९८.६७ | - | - |
| ७ | बंद केलेल्या कामकाजातून कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींनंतर #) | १३५८१.९७ | (४६.३१) | १४.९५ | १३५३५.६६ | २७.५२ | (६१.५०) |
| ८ | बंद केलेल्या कामकाजातून कालावधीसाठी करानंतरचा निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींनंतर #) | ११५०१.१६ | (१४.३५) | १२.२२ | ११४८६.८१ | २१.४१ | (४०.२८) |
| ९ | **कालावधी / वर्षासाठी निव्वळ नफा/(तोटा)** | ११६८५.०४ | २२.४३ | ३८९.२६ | ११७०७.४७ | ६७७.७१ | १३२५.१८ |
| १० | कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न कालावधीसाठी नफा/(तोटा) (करानंतर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करानंतर) यांचा समावेश | ११६३७.२३ | ०.२७ | ३६९.२८ | ११६३७.५० | ६५३.९१ | १३२१.१७ |
| ११ | इक्विटी शेअर भांडवल | २०५५.८२ | २०५३.८१ | १९९०.४६ | २०५५.८२ | १९९०.४६ | २०५३.८१ |
| १२ | मागील वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदात दर्शविल्याप्रमाणे राखीव निधी (पुनर्मूल्यांकन राखीव निधी वगळून) | - | - | - | - | - | ५५१५.११ |
| १३ | प्रति इक्विटी शेअर मिळकत ₹१०/- प्रत्येकी (^-वार्षिक नाही) | | | | | | |
| | **चालू कामकाज** | | | | | | |
| | अ. मूळ (₹) | ०.८९ | ०.१८ | १.९४ | १.०७ | ३.३८ | ६.८६ |
| | ब. डायल्यूटेड (₹) | ०.८८ | ०.१८ | १.९० | १.०६ | ३.३३ | ६.७४ |
| | **बंद केलेले कामकाज** | | | | | | |
| | अ. मूळ (₹) | ५५.९७ | (०.०७) | ०.०६ | ५५.८९ | ०.११ | (०.३१) |
| | ब. डायल्यूटेड (₹) | ५५.३५ | (०.०७) | ०.०६ | ५५.२९ | ०.११ | (०.३१) |
| | **चालू कामकाज आणि बंद केलेले कामकाज** | | | | | | |
| | अ. मूळ (₹) | ५६.८७ | ०.११ | २.०० | ५६.९७ | ३.४९ | ६.५५ |
| | ब. डायल्यूटेड (₹) | ५६.२३ | ०.११ | १.९७ | ५६.३६ | ३.४४ | ६.४३ |

**कंपनीच्या एकल निकालांच्या संदर्भात, रकमा खालीलप्रमाणे आहेत: (रक्कम लाखांमध्ये)**

| तपशील | तिमाही अखेर | | | सहामाही अखेर | | वार्षिक |
|---|---|---|---|---|---|---|
| | ३०.०९.२०२५ | ३०.०६.२०२५ | ३०.०९.२०२४ | ३०.०९.२०२५ | ३०.०९.२०२४ | ३१.०३.२०२५ |
| | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित |
| **चालू कामकाज** | | | | | | |
| कामकाजातून एकूण उत्पन्न | २७०८.९२ | २३८१.७३ | २५७०.८२ | ५०९०.६५ | ४८४२.१६ | १०४४०.५१ |
| करपूर्व नफा | ५५२.०३ | ७०.९५ | ४७१.९० | ६२२.९८ | ८१२.९३ | १८८३.५४ |
| करानंतरचा नफा | ४७२.८२ | २९.३६ | ३६८.७४ | ५०२.१८ | ६३९.१५ | १३३७.८४ |
| बंद केलेले कामकाज | | | | | | |
| करपूर्व नफा | (१७.८७) | (६३.०५) | २.९४ | (८०.९२) | (२.८५) | (१२३.२४) |
| व्यवसाय विक्रीवरील नफा (टीप "f" पहा) | १२६३१.१९ | - | - | १२६३१.१९ | - | - |
| करानंतरचा नफा | १०६४०.५३ | (२६.०९) | २.१ | १०६१४.४४ | (२.०७) | (८७.५४) |
| **कालावधीसाठी नफा** | ११११३.३५ | ३.२७ | ३७०.८४ | ११११६.६२ | ६३७.०८ | १२५०.३० |
| **एकूण सर्वसमावेशक उत्पन्न** | ११०४९.१२ | (२५.७८) | ३४३.९५ | ११०२३.३४ | ६०६.८८ | १२४१.८३ |

टिप :

ए. कंपनीचे एकत्रित आर्थिक निकाल कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३३ अंतर्गत विहित भारतीय लेखा मानके ((Indian Accounting Standards) ) आणि कंपनी (भारतीय लेखा मानके) नियम, २०१५, जे वेळोवेळी सुधारित केले जातात, तसेच भारतात सामान्यतः स्वीकृत इतर मान्यताप्राप्त लेखा पद्धतींनुसार तयार केले आहेत.

बी. ३० सप्टेंबर, २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि सहामाहीसाठीचे वरील एकत्रित आर्थिक निकाल १३ नोव्हेंबर, २०२५ रोजी झालेल्या बैठकीत संचालक मंडळाच्या लेखापरीक्षण समितीने पुनरावलोकन करून शिफारस केले आणि संचालक मंडळाने मंजूर केले.

सी. इंड-एएस १०८-ऑपरेटिंग सेगमेंट्समध्ये परिभाषित ''व्यवस्थापन दृष्टिकोन'' वर आधारित, मुख्य कार्यकारी निर्णयकर्ता ((CODM)) गटाच्या कामगिरीचे तीन व्यावसायिक विभागांमध्ये मूल्यांकन करतो, ते म्हणजे: ''सुप टेक'', 'रेगटेक'', आणि ''डेटाटेक''. हे विभाग व्यवसायाच्या स्वतंत्र शाखा दर्शवतात, जे एकमेकांपासून स्वतंत्रपणे महसूल निर्माण करतात आणि खर्च करतात. अंतर्गत अहवाल आणि निर्णय घेण्याच्या उद्देशाने, महसूल आणि थेट संबंधित खर्चाच्या आधारावर विभागाच्या कामगिरीचे मूल्यांकन करतो, ज्यात व्यावसायिक विभागाशी थेट संबंधित नसलेल्या खर्चाचे वाटप केले जात नाही. त्यानुसार, जे खर्च थेट व्यावसायिक विभागाशी संबंधित नाहीत ते न वाटलेले खर्च म्हणून स्वतंत्रपणे उघड केले जातात. वरील सादरीकरणानुसार मागील कालावधीतील आकडे आवश्यकतेनुसार पुनर्गटित/पुनर्वर्गीकृत केले आहेत.

डी. अमेरिकेत स्थापित आयआरआयएस बिझनेस सर्व्हिसेस, एलएलसी (उपकंपनी) मधील आमच्या गुंतवणुकीसंदर्भात, ३० सप्टेंबर, २०२५ रोजी एकूण दायित्वे तिच्या एकूण मालमत्तेपेक्षा ₹५७.०१ लाखांनी जास्त होती. कंपनी आवश्यकतेनुसार आर्थिक सहाय्य प्रदान करण्यास वचनबद्ध आहे. उपकंपनीचे भविष्यातील स्वरूप आणि कंपनीचा सततचा पाठिंबा लक्षात घेता, उपकंपनीमधील गुंतवणूक खर्चावर मोजली जाते.

ई. उपकंपनीचे भविष्यातील स्वरूप आणि मूळ कंपनीच्या वचनबद्ध सततच्या पाठिंब्याच्या प्रकाशात, टीप (ड) मध्ये नमूद केलेल्या उपकंपनीचे आर्थिक निकाल चालू व्यवसाय आधारावर (going concern basis)) तयार केले आहेत आणि तेच एकत्रित आर्थिक निकाल तयार करण्यासाठी विचारात घेतले आहेत.

एफ. ३० सप्टेंबर, २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीत, कंपनीने आपला टॅक्स टेक्नॉलॉजी जीएसटी ॲप्लिकेशन सर्व्हिस प्रोव्हायडर ( ('GST ASP') ) व्यवसाय, आयआरआयएस लॉजिक्स सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेडमधील १००% इक्विटी हिश्यासह, सोवोस कंप्लायन्स लिमिटेड, यूके, आणि मलेशियातील आपला ई-इन्व्हॉइसिंग व्यवसाय सोवोस मलेशियाला विकला. ही विक्री कामकाज सोपे करण्यासाठी आणि मुख्य व्यवसाय शाखांवर लक्ष केंद्रित करण्यासाठीच्या धोरणात्मक उपक्रमाचा भाग आहे. या व्यवहारांमुळे एक अपवादात्मक नफा ओळखला गेला आणि व्यवसाय इंड-एएस १०५ नुसार बंद केलेले कामकाज ((discontinued operations) ) म्हणून सादर केला आहे.

जी. मागील कालावधीतील संबंधित आकडे आवश्यकतेनुसार पुनर्गटित आणि पुनर्वर्गीकृत केले आहेत.

एच. वरील माहिती सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या नियम ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजकडे दाखल केलेल्या, ३० सप्टेंबर, २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि सहामाहीसाठीच्या आर्थिक निकालांच्या तपशीलवार स्वरूपाचा उतारा आहे. ३० सप्टेंबर, २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि सहामाहीसाठीचे एकल आणि एकत्रित आर्थिक निकालांचे संपूर्ण स्वरूप स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइट www.nseindia.com आणि www.bseindia.com वर आणि कंपनीच्या वेबसाइट www.irisbusiness.com

आय. #अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबी, जे इंड-एएस नियमांनुसार, जे लागू असेल, नफा आणि तोटा विवरणात समायोजित केल्या आहेत.

कंपनीच्या वेबसाइटवर आर्थिक निकाल पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

ठिकाण: नवी मुंबई
दिनांक: १३ नोव्हेंबर, २०२५

आयरीस बिझनेस सर्व्हिसेस लिमिटेडच्या
संचालक मंडळाच्या आदेशानुसार
के. बालचंद्रन
पूर्ण-वेळ संचालक आणि सीईओ
DIN : 00080055

**PUDHARI TALENT SEARCH EXAMINATION (PTSE)**

**विश्वसंचार पानातील मजकुरावर आधारित सामान्य ज्ञानाच्या अभ्यास व सरावासाठी खालील प्रश्नांची उत्तरे शोधून स्पर्धा परिक्षांची तयारी करा.**

१) कोणत्या देशाला हिमयुगाचा सर्वात मोठा धोका संभवतो?

उत्तर : १. अमेरिका ☐

२. आईसलँड ☐

२) दीर्घायुष्यासाठीची गोळी कोणत्या देशात बनवली जात आहे?

उत्तर : १. चीन ☐

२. जपान ☐

# भारताचा पहिला स्वदेशी एआय चॅटबॉट 'कायवेक्स' लाँच




**नवी दिल्ली :** भारतीय अब्जाधीश उद्योजक पर्ल कपूर यांनी देशातील पहिला पूर्णपणे स्वदेशी बनावटीचा आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) चॅटबॉट लाँच केला आहे. या चॅटबॉटचे नाव 'कायवेक्स' (Kyvex) असे ठेवण्यात आले आहे. कंपनीच्या म्हणण्यानुसार, हे प्लॅटफॉर्म डीप रिसर्च (सखोल संशोधन), संदर्भ-आधारित आणि अचूक उत्तरे देण्यासाठी डिझाईन केले गेले आहे, जे चॅटजीपीटी आणि परप्लेक्सिटीसारख्या आंतरराष्ट्रीय एआय मॉडेल्सना थेट आव्हान देईल.

'कायवेक्स'ची सर्वात खास गोष्ट म्हणजे ते पूर्णपणे भारतात तयार करण्यात आले आहे. हे कंपनीने स्वतः विकसित केलेल्या 'लार्ज लँग्वेज मॉडेल' (एलएलएम) वर आधारित आहे. वापरकर्त्यांना जलद, अधिक अचूक, संदर्भ-समृद्ध आणि सखोल माहिती प्रदान करणे हे यामागील मुख्य उद्दिष्ट आहे. 'कायवेक्स'च्या या महत्त्वपूर्ण उपक्रमाला आयआयटीमधील दिग्गज शिक्षणतज्ज्ञांचे पाठबळ मिळाले आहे. यामध्ये आयआयटी दिल्लीचे माजी संचालक प्रोफेसर रामगोपाल राव आणि आयआयटी खरगपूरचे माजी संचालक प्रोफेसर पी. पी. चक्रवर्ती यांसारख्या मान्यवरांचा समावेश आहे. यावरून हे स्पष्ट होते की, 'कायवेक्स' हे केवळ एक एआय साधन नसून, भारताला एआयच्या क्षेत्रातील जागतिक नेतृत्वाच्या दिशेने पुढे नेण्याचा एक महत्त्वाकांक्षी प्रयत्न आहे. सध्या 'कायवेक्स' हे एक वेब-आधारित प्लॅटफॉर्म म्हणून उपलब्ध आहे. परंतु, कंपनी लवकरच ते अँड्रॉईड, आयओएस आणि ब्राऊझर इंटिग्रेशनसह सादर करण्याची तयारी करत आहे. यामुळे ते जगभरातील वापरकर्त्यांसाठी अधिक व्यापकपणे उपलब्ध होईल. लाँचच्या वेळी पर्ल कपूर यांनी सांगितले की, 'कायवेक्स' हे भारतासाठी भविष्याची दिशा ठरवणारे पाऊल आहे, जे माहिती शोधण्याच्या आणि संशोधन करण्याच्या पद्धतीत संपूर्ण बदल घडवून आणू शकते. कंपनी हे प्लॅटफॉर्म सर्वांसाठी विनामूल्य आणि ओपन-अ‍ॅक्सेस ठेवून एआय इनोव्हेशनचे लोकशाहीकरण करण्याच्या दिशेने काम करत आहे. कंपनीच्या माहितीनुसार, 'कायवेक्स' हे भारतीय एआय अभियंते आणि संशोधकांनी संपूर्णपणे भारतात विकसित केले आहे. 'मेड इन इंडिया, फॉर द वर्ल्ड' या विचारावर आधारित असलेले हे प्लॅटफॉर्म शिक्षण, संशोधन आणि उद्योगांमध्ये एआय सर्वांसाठी उपलब्ध करण्याचे लक्ष्य ठेवते. यासह, 'कायवेक्स' जागतिक स्तरावर इंटेलिजेंट इन्फॉर्मेशन सिस्टीममध्ये एक नवीन ओळख निर्माण करण्यास सज्ज आहे.

# भारतीय टेक्टोनिक प्लेट दोन भागांत तुटतेय



**नवी दिल्ली :** पृथ्वीचा पृष्ठभाग अस्थिर आहे. शास्त्रज्ञांनी एक धक्कादायक शोध लावला आहे. भारताची मुख्य टेक्टोनिक प्लेट (इंडियन प्लेट) तिबेटच्या खाली दोन भागांत विभागली जात आहे. यामुळे भूकंप, ज्वालामुखीचा उद्रेक आणि मोठे भूगर्भीय बदल होऊ शकतात. अमेरिकेतील कोलोरॅडो विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी केलेल्या एका नवीन अभ्यासात हे उघड झाले आहे. जर हे लवकरच घडले, तर हिमालयीन प्रदेशातील लाखो लोकांचे जीवन धोक्यात येऊ शकते.

पृथ्वीचा कवच अनेक प्लेटस्‌मध्ये (टेक्टोनिक प्लेटस्) विभागलेला आहे, ज्या हळूहळू सरकतात. भारतीय प्लेट आफ्रिकेपासून वेगळी होत उत्तरेकडे सरकत आहे. आता नवीन संशोधन असे सूचित करते की, ही प्लेट तिबेटच्या खाली १०० किलोमीटर खोलीवर दोन भागांत विभागली जात आहे. वरचा भाग हिमालयाकडे ढकलत आहे, तर खालचा भाग मंगोलियाकडे सरकत आहे. नेचर जिओसायन्स जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या या अभ्यासानुसार, ही प्रक्रिया ५० लाख वर्षांपूर्वी सुरू झाली होती. परंतु, आता ती वेगाने वाढली आहे. शास्त्रज्ञांनी भूकंपाच्या लाटांचा अभ्यास केला, ज्यावरून असे दिसून येते की, प्लेटस्‌मध्ये एक दरी निर्माण होत आहे. ही दरी २०० ते ३०० किलोमीटर लांब आहे. जर ती विस्तारली तर तिबेटी पठार आणि हिमालयीन शिखरांमध्ये बदल होऊ शकतात. या अभ्यासाचे प्रमुख शास्त्रज्ञ ब्रॅडेन चाऊ म्हणाले की, प्लेट तुटली तर हिमालयाच्या निर्मितीतील एक नवीन टप्पा असू शकते. परंतु, त्यामुळे ८ किंवा ९ तीव्रतेचे मोठे भूकंपदेखील होऊ शकतात. कोलोरॅडो विद्यापीठाच्या पथकाने २० वर्षांच्या डेटाचे विश्लेषण केले. त्यांचे म्हणणे आहे की, तिबेटच्या खाली असलेल्या प्लेटचा खालचा भाग वितळत आहे, जसे उष्णतेमध्ये आईस्क्रीम वितळते. यामुळे मॅग्मा बाहेर पडू शकतो, ज्यामुळे ज्वालामुखी निर्माण होऊ शकतात. भारतीय भूगर्भ सर्वेक्षण (जीएसआय) चे डॉ. आर. के. सिंह म्हणतात की, यामुळे भारताला धोका निर्माण झाला आहे. हिमालय आधीच भूकंपप्रवण आहे. २००५ मध्ये काश्मीरमध्ये आलेला भूकंप (७.६ तीव्रता) या प्लेटमुळे झाला होता. जर ही प्लेट फुटली, तर दिल्ली आणि मुंबईसारख्या शहरांमध्ये भूकंपाचे धक्के जाणवतील. अभ्यासानुसार, पुढील १-२ कोटी वर्षांत हा बदल होईल, परंतु आता लहान भूकंप वाढू शकतात. टेक्टोनिक प्लेटस् म्हणजे पृथ्वीच्या बाह्य थराचे (कवचाचे) तुकडे आहेत जे मॅग्मावर तरंगतात. भारतीय प्लेट दरवर्षी सुमारे ५ सेंटीमीटरने उत्तरेकडे सरकते. तिबेटच्या अंतर्गत, ती खाली जाण्याऐवजी फाटत आहे. जगातील ८० टक्के मोठे भूकंप हिमालयीन पट्ट्यातील हालचालींमुळे होत आहेत. भारत, नेपाळ आणि चीनमध्ये लाखो घरे कोसळू शकतात. २०१५ च्या नेपाळ भूकंपात ९,००० लोकांचा मृत्यू झाला. मॅग्मा वाढताच नवीन ज्वालामुखी तयार होतील. हिमनद्या वितळल्याने गंगा आणि ब्रह्मपुत्र नद्यांमध्ये पूर येईल. हिमालयीन प्रदेशात १० कोटींहून अधिक लोक राहतात. भूकंपाचा धक्का दिल्ली-एनसीआरपर्यंत पोहोचला. अर्थव्यवस्थेला १ ट्रिलियन रुपयांचे नुकसान झाले.

# माणूस १५० वर्षे जगण्यासाठी चीन बनवत आहे औषधाची गोळी!

**बीजिंग :** माणसाला अमर होण्याची किंवा दीर्घायुष्यी होण्याची इच्छा आदिम काळापासूनच आहे. त्यासाठी काळाच्या ओघात वेळोवेळी प्रयत्न केले जात असतात. आता चीनमधील संशोधक यासाठी प्रयत्न करीत आहेत. द्राक्ष्यांच्या बियांपासून बनवलेल्या 'पीसीसी१' या औषधावर ते सध्या काम करीत असून, या औषधामुळे माणूस दीडशे वर्षे जगू शकेल ,असे त्यांना वाटते! शेनझेनची लॉनवी बायोसायंसेज कंपनी ही अँटी-एजिंग गोळी म्हणजेच वृद्धत्वरोधक गोळी बनवत आहे. उंदरांवर या गोळीची चाचणी केली असता त्यांच्या आयुष्यात ९ टक्के वृद्धी झाल्याचे आढळून आले. माणसावर या गोळीची चाचणी अद्याप केलेली नाही.



हे औषध द्राक्ष्यांच्या बियांमध्ये आढळणाऱ्या एका नैसर्गिक घटकावर आधारीत आहे. मात्र, अनेक संशोधकांचे म्हणणे आहे की, चिनी संशोधकांचा हा केवळ दावा असून, याबाबत मोठ्या परीक्षणाची गरज आहे. या गोळीचा मुख्य घटक 'प्रोस्यानिडिन सी१' 'पीसीसी१' हे आहे. ते द्राक्ष्यांच्या बियांच्या अर्कात आढळते. कंपनीचा दावा आहे की, ही गोळी वृद्ध आणि कमजोर पेशींना नष्ट करून निरोगी पेशींचे रक्षण करते. त्यामुळे माणसाचे आयुष्य वाढू शकते. हे संशोधन २०२१ मध्ये 'नेचर मेटाबॉलिझम' या जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या एका संशोधनावर आधारीत आहे. त्यामध्ये उंदरांवर परीक्षण करण्यात आले होते. 'पीसीसी१' ने उंदरांमधील वृद्ध पेशींना निवडून नष्ट केले होते. तसेच, निरोगी पेशींना वाचवले होते. त्यामुळे हे औषध घेणाऱ्या उंदरांच्या सरासरी आयुर्मानात ९ टक्क्यांची वाढ झाली होती. हा उपचार सुरू केल्यानंतरच्या त्यांच्या वयोमानाची गणना केल्यावर ते ६४.२ टक्के अधिक झाल्याचे आढळले होते. कंपनीचे सीईओ यिप त्सझो (जिको) यांनी या गोळीला 'लॉन्गेविटी सायन्सचे होली ग्रेल' म्हटले आहे. निरोगी जीवनशैली तसेच हे औषध यामुळे माणसाचे आयुष्य १५० वर्षे करण्याचे स्वप्न लवकरच पूर्ण होऊ शकते, असेही त्यांनी म्हटले आहे. मात्र, अन्य संशोधक याबाबत सतर्क आहेत. बक इन्स्टिट्यूट फॉर रिसर्च ऑन एजिंगमधील तज्ज्ञांनी म्हटले आहे की, उंदरांवरील परीक्षणाचे निकाल उत्तम आहेत. औषधाची परिणामकारकता पाहण्यासाठी कठोर क्लिनिकल ट्रायलची गरज आहे.

# सर्वात मोठी अंडी घालणारे पशू-पक्षी



**शहामृग :** हा पक्षी जगातील सर्वात मोठे अंडे घालतो, ज्याचे वजन सुमारे १.५ किलोग्राम असते आणि ते १५ सेंटीमीटरपर्यंत लांब असू शकते. ही अंडी इतकी मोठी असतात की, तुम्हाला वाटेल ती डायनासोरच्या संग्रहालयातून आणली आहेत!



**एमू :** हा ऑस्ट्रेलियन महाकाय पक्षी गडद हिरव्या रंगाची अंडी घालतो, ज्यांचे वजन सुमारे ७०० ग्रॅम असते. ही अंडी एका मोठ्या एवोकॅडोच्या आकाराची असतात आणि तितकीच आकर्षक असतात.



**कॅसोवरी :** आपल्या आकर्षक रूपासाठी ओळखले जाणारे कॅसोवरी चमकदार, मटारसारख्या हिरव्या रंगाची अंडी घालतात, ज्यांचे वजन ६०० ग्रॅमपर्यंत असते आणि ती बऱ्याचदा घनदाट वर्षावनात लपलेली असतात.



**किवी :** लहान आकार असूनही, मादी किवी त्यांच्या शरीराच्या वजनाच्या सुमारे २० टक्के असलेले अंडे घालू शकते. एका लहान पक्ष्यासाठी ही एक अविश्वसनीय कामगिरी आहे!



**लेदरबॅक सागरी कासव :** हे महासागरातील महाकाय प्राणी एकाच वेळी १०० हून अधिक अंड्यांच्या मोठ्या थव्यात मऊ, पिंग-पाँग बॉलच्या आकाराची अंडी घालतात, ज्यापैकी प्रत्येकाचे वजन सुमारे ८० ग्रॅम असते.



**हिरवे सागरी कासव :** ही कासवं सुमारे १०० गोल्फ-बॉल-आकाराची अंडी घालतात, प्रत्येकाचे वजन जवळजवळ ५० ग्रॅम असते. एकाच घरट्यात ही अंडी असतात!



**मगर :** मादी मगरी सुमारे ३० ते ५० कठीण कवचाची अंडी घालतात, प्रत्येकाचे वजन अंदाजे १५० ग्रॅम असते आणि त्या शिकारींपासून आपल्या घरट्याचे जोरदार संरक्षण करतात.



**प्लॅटिपस :** हा विचित्र सस्तन प्राणी अंडी घालणाऱ्या मोजक्या सस्तन प्राण्यांपैकी एक आहे, जो सुमारे १.५ सेंटीमीटर रुंदीची चामड्यासारखी अंडी घालतो, जे निसर्गाचे खरे आश्चर्य आहे!



**जाळीदार अजगर :** अंडी घालणाऱ्या सापांमध्ये सर्वात मोठा असलेला जाळीदार अजगर (रेटिक्युलेटेड पायथॉन) सुमारे १० सेंटीमीटर लांब आणि एकूण २० किलोग्रामपेक्षा जास्त वजनाची अंडी घालू शकतो.

# बकरीचे दूध ठरते अनेक बाबतीत लाभदायक



**नवी दिल्ली :** गायी, म्हशीचे दूध पिणे सामान्य गोष्ट आहे. सध्याच्या काळात उंटिणीच्या आणि गाढविणीच्या दुधालाही मागणी आहे. अनेकजण बकरीचे किंवा शेळीचे दूधही पितात. हे दूधही आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे, असे आहारतज्ज्ञ सांगतात. बकरीचे दूध विविध औषधी गुणांनी समृद्ध असते. पारंपरिक उपचारपद्धतींमध्ये याचा वापर केला जातो.

बकरीच्या दुधातील सूक्ष्म चरबीचे कण आणि ए२ कॅसिन प्रथिन पचनक्रिया सुधारतात. त्यामुळे गॅस, अपचन, आम्लपित्त इत्यादी समस्यांपासून आराम मिळतो. बकरीच्या दुधात कॅल्शियम, फॉस्फरस आणि व्हिटॅमिन डी मुबलक प्रमाणात असते. त्यामुळे हाडे मजबूत होतात. संधिवात, सांध्यांचा त्रास आणि अकड कमी होऊन लवचिकता वाढते. तसेच सेलेनियम आणि झिंक शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात. डेंग्यू झाल्यावर शरीरातील प्लेटलेटस्‌ची संख्या कमी होते. अशा वेळी बकरीचे दूध पिल्यास प्लेटलेटस्‌ची संख्या वाढते, असे मानले जाते. ते पूर्ण बरे करत नसले, तरी रुग्णाचे आरोग्य सुधारण्यास मदत करते. बकरीच्या दुधात दाहशामक गुणधर्म आहेत. त्यामुळे स्नायू आणि ऊतींमधील सूज कमी होते आणि वेदना कमी होतात. जर शरीरात लोह (आयर्न) कमी असेल तर बकरीचे दूध फायदेशीर ठरते. हे रक्तातील हीमोग्लोबिनचे प्रमाण वाढवते आणि रक्ताल्पता दूर करते.

# हिवाळ्यात बाजरीचे सेवन आरोग्यदायी

**नवी दिल्ली :** हिवाळा ऋतूचे आगमन झाले आहे. प्रत्येक ऋतूनुसार आहारातही बदल करावा लागतो. थंडीच्या दिवसात शरीर उबदार ठेवण्यासाठी आणि रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी अनेकजण त्यांच्या आहारात अधिक पौष्टिक आणि उष्ण प्रकृतीच्या पदार्थांचा समावेश करतात. हिवाळ्यात अनेकजण बाजरीसह अनेक पारंपरिक धान्यांचादेखील त्यांच्या आहारात समावेश करतात. बाजरी हे हिवाळ्यातील सुपरफूड मानले जाते. बाजरीचे पदार्थ खाल्ल्याने दिवसभर ऊर्जा मिळते आणि उबदारपणादेखील जाणवतो. बाजरीमध्ये मुबलक प्रमाणात फायबर, लोह, मॅग्नेशियम, प्रथिने आणि अँटीऑक्सिडंटस् असतात. बाजरीचा समावेश आरोग्यदायी व सकस धान्यात केला जातो. यात आढळणारे पोषक तत्त्व शरीरासाठी फायदेशीर असतात. विशेषतः, हिवाळ्यात बाजरीचे सेवन आरोग्यदायी ठरते, असे तज्ज्ञ सांगतात.





एके काळी फक्त ग्रामीण भागातच बाजरी जास्त प्रमाणात खाल्ली जात. मात्र, सध्या लोक तंदुरुस्तीबद्दल अधिक जागरूक होत आहेत. परिणामी, शहरी भागातही अनेक पारंपरिक धान्ये लोकप्रिय होत आहेत. लोक बाजरीच्या भाकरीपासून ते लापशीपर्यंत सर्व काही त्यांच्या आहारात समावेश करतात. आहारतज्ज्ञांच्या मते बाजरीची लापशी ही थंडीच्या दिवसात सेवन करणे अत्यंत फायदेशीर आहे. दररोज सकाळी नाश्त्यात लापशी खाल्ल्याने तुम्हाला दिवसभर ऊर्जा मिळेल आणि आळस येणार नाही. गोड लापशी बनवण्यासाठी तुम्ही त्यात गुळाचा वापर करू शकता. चवदार व मसालेदार लापशीसाठी तुम्ही विविध भाज्या त्यात मिक्स करू शकता, ज्यामुळे त्याचे पौष्टिक मूल्य आणखी वाढते. हिरवे मूग यात मिक्स केल्याने व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता दूर होण्यास मदत होते. बाजरीत भरपूर फायबर असते, ज्यामुळे वजन कमी करण्याचा किंवा नियंत्रित करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांसाठी ते एक उत्तम पर्याय आहे. दररोज एक वाटी बाजरीची लापशी खाल्ल्याने बद्धकोष्ठता आणि गॅसदेखील दूर होतो. ओमेगा-३ मुळे तुमच्या शरीरातील रक्तदाब नियंत्रित करण्यासदेखील मदत करते. आहारतज्ज्ञ यांच्या मते उकडलेली बाजरी खाल्ल्याने अनेक फायदे आपल्या शरीराला होत असतात. याच्या सेवनाने शरीरातील ऊर्जेची पातळी वाढवते आणि आळस दूर होतो. बाजरी पोटासाठी हलकी मानली जाते, ज्यामुळे अल्सर किंवा ॲसिडिटीचा त्रास असलेल्यांसाठी ते फायदेशीर ठरते. बाजरीमधील मॅग्नेशियमचे प्रमाण उच्च रक्तदाब, मधुमेह आणि हृदयरोगाचा धोका कमी करण्यास मदत करते. बाजरी हा एक सुपरफूड आहे, जो तुम्ही तुमच्या आहारात अनेक प्रकारे समाविष्ट करू शकता. लोकांना सामान्यतः बाजरीची भाकरी खायला आवडते, जी स्वादिष्ट आणि फायदेशीर दोन्ही मानली जाते. हिवाळ्यात बाजरीची भाकरी खाल्ल्याने शरीर आतून उबदार राहते. त्यामुळे रक्तातील साखर नियंत्रित होण्यास मदत होते आणि पचन सुधारते. तज्ज्ञांच्या मते तुम्ही दिवसातून बाजरीच्या दोन भाकरी खाऊ शकता.

# हिमयुग येणार? सर्वप्रथम गोठणार 'हा' सुंदर देश

**लंडन :** पृथ्वीवर दर दिवशी काही भौगोलिक आणि काही नैसर्गिक बदल होत असून, या ग्रहावर आता एका अशा युगाची सुरुवात होण्याची चिन्हं आहेत, जे अनेकांसाठीच अनपेक्षित आहे. अटलांटिक महासागराचा मुख्य सागरी प्रवाह अर्थात 'ओशन करंट' आता धीम्या गतीनं लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. हा तोच प्रवाह आहे, ज्यामुळं युरोपासह कैक खंडांच्या तापमानात संतुलन राखलं जातं. थोडक्यात हा सागरी प्रवाह गोठण्यास सुरुवात झाली आहे. ज्यामुळं युरोपात एका मोठ्या धोक्याचे संकेत मिळत आहेत. जर हा प्रवाह थांबला, तर संपूर्ण युरोपात पुन्हा एकदा हिमयुग येणार असून, नजर जाईल तिथं फक्त आणि फक्त बर्फ, असंच काहीसं चित्र पाहायला मिळणार आहे. याचा सर्वाधिक परिणाम आईसलँड या सुंदर देशावर अतिप्रचंड प्रमाणात पाहायला मिळेल.

आईसलँडचे पर्यावरणमंत्री जोहान्सन पाल यांच्या माहितीनुसार देशासाठी हा एक मोठा धोका असून, सरकार आता सर्वात वाईट परिस्थितीचा सामना करण्याच्या उंबरठ्यावर आहे. ज्यासाठी आता उपाययोजना राबवल्या जात आहेत. आईसलँड हे एक असं ठिकाण आहे, ते पृथ्वीच्या उत्तर ध्रुवाच्या निकट असून, सर्वाधिक वाईट परिणाम याच देशावर होणार असल्याची धोक्याची आणि सतर्क करणारी सूचना देण्यात येत आहे. अटलांटिक मेरिडियनल ओवरटर्निंग सर्कुलेशन नावाचा हा सागरी प्रवाह गरम पाण्याला उष्णकटिबंधीय क्षेत्रातून आर्क्टिकच्या दिशेनं पुढे नेते. ज्यामुळं युरोपातील हिवाळ्याची तीव्रता कमी होते. मात्र, पर्यावरणात सातत्यानं होणाऱ्या बदलांमुळं आर्क्टिकमधील बर्फ अतिशय वेगानं वितळू लागला आहे. ज्यामुळं ग्रीनलँडमधून बर्फाच्या चादरीवरूनच हाडं गोठवणारं थंड पाणी समुद्राच्या दिशेनं वाहत आहेत. संशोधकांच्या निरीक्षणानुसार हेच थंडगार पाणी अटलांटिक प्रवाहाला प्रभावित करू शकतं. जर हा प्रवाह पूर्णपणे कोलमडला, तर युरोपातील हिवाळा आणखी तीव्र होईल.



हिमवर्षावात वाढ होईल, जागोजागी बर्फच असेल आणि हिमवादळांची संख्या वाढेल. तज्ज्ञांच्या माहितीनुसार हा प्रवाह आता जवळपास कोलमडला आहे, ज्यामुळं येणारं संकट थांबवता येणार नाही. साधारण १२,००० वर्षांपूर्वी अखेरच्या हिमयुगाचा अंत झाला. या हिमयुगाच्या सुरुवातीला अशीच स्थिती कारणीभूत ठरली होती आणि आता याचीच पुनरावृत्ती होताना दिसत आहे. अटलांटिक प्रवाहातील या बदलांमुळं युरोमधील देशांसह इतर देशसुद्धा सतर्क आहेत. आयर्लंडच्या हवामान विभागानं पंतप्रधानांपासून संसदीय समितीला याबाबतची माहिती दिली आहे, तर नॉर्वेनेही या स्थितीवर संशोधन सुरू केले आहे. ब्रिटनकडून याबाबतच्या संशोधनासाठी ८१ मिलियन पौंडहून अधिक रक्कम खर्च केली आहे. युरोपात हिमयुग आल्यास भारतावरही याचा परिणाम दिसून येणार असून, दक्षिण अमेरिकासुद्धा इथं अपवाद नसेल. या भागांमध्ये पाऊस, मान्सूनची संरचना बदलून शेतकरी वर्गावर संकट ओढावणार आहे. ज्यामुळं आता हे हिमयुगाचं संकट नेमकं किती दूर आहे, याचीच फेरपडताळणी जगभरातील संशोधक करताना दिसत आहेत.

## फनको पॉपचा सर्वात मोठा संग्रह

अमेरिकेतील पॉल सकारडिनो यांनी फनको पॉपचा सर्वात मोठा संग्रह करण्याचा विश्वविक्रम केलेला आहे. ५ मार्च २०२० रोजी केलेल्या गणनेनुसार, त्यांच्या संग्रहातील वस्तूंची एकूण संख्या ५,३०६ होती. पॉल सकारडिनो यांनी डिसेंबर २०१८ पासून हा विक्रम कायम ठेवला आहे; पण तेव्हापासून त्यांच्या संग्रहात जवळपास १,००० वस्तूंची भर पडली आहे!



# उमर नबीच्या घरावर बुलडोझर

## पुलवामा येथे सुरक्षा दलाची कारवाई; दिल्ली स्फोटात सहभाग

**जम्मू : अनिल साक्षी**

दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या भीषण कार बॉम्बस्फोटात सहभागी असलेल्या डॉ. उमर नबी याचे घर जम्मू-काश्मीरच्या पुलवामा जिल्ह्यात सुरक्षाबलांनी उद्ध्वस्त केले आहे. उत्तर प्रदेशातील योगी सरकारने दहशतवाद्यांविरुद्ध अवलंबलेल्या कडक पद्धतीप्रमाणेच ही कारवाई करण्यात आली असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. गुरुवार आणि शुक्रवारी रात्री ही कारवाई करण्यात आली.

कलम ३७० रद्द झाल्यानंतर काश्मीरमध्ये दहशतवाद्यांच्या मालमत्तेविरुद्ध कारवाईची ही पद्धत आता सामान्य होत चालली असून, उमर नबीच्या घरावर केलेली कारवाईही त्याच प्रक्रियेचा भाग असल्याचे सुरक्षा अधिकाऱ्यांनी सांगितले.

तपास यंत्रणांनी सांगितले की, उमर हा या आठवड्याच्या सुरुवातीला उघडकीस आलेल्या 'व्हाईट कॉलर' दहशतवादी मॉड्यूलचा एक महत्त्वाचा सदस्य होता. तो दक्षिण काश्मीरमधील पुलवामा जिल्ह्यातील कोईल गावचा रहिवासी होता.

सोमवारी संध्याकाळी, जैश-ए-मोहम्मद आणि अन्सार गजवत-उल-हिंदशी संबंधित दहशतवादी मॉड्यूलचा भंडाफोड करून तीन डॉक्टरांसह आठ जणांना अटक केल्यानंतर काहीच तासांत लाल किल्ला परिसरात प्रचंड स्फोट झाला. संध्याकाळी सुमारे ६.५२ वाजता, लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या गेट क्रमांक १ जवळ धीम्या गतीने चालणाऱ्या कारमध्ये स्फोट घडवून आणण्यात आला. या स्फोटात १३ जणांचा मृत्यू झाला, तर २० हून अधिक नागरिक जखमी झाले होते. स्फोट इतका भीषण होता की, परिसरातील अनेक वाहने जळून खाक झाली आणि आसपासच्या इमारती हादरल्या.



### उमर नबीचे अनेक कट्टर गटांशी कनेक्शन

● अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, उमर नबी दिल्लीत विस्फोटकांनी भरलेली ह्युंदाई आय २० कार चालवत होता. घटनास्थळावरून गोळा केलेल्या डीएनए नमुन्यांची त्याच्या आईच्या नमुन्यांशी जुळणी झाल्यानंतर त्याची ओळख निश्चित झाली. उमर गेल्या दोन वर्षांत कट्टरपंथी विचारसरणीकडे वळला असल्याचे तपासात उघड झाले. तो सोशल मीडियावरील अनेक कट्टर गटांशी जोडला गेला होता.

# एप्स्टीनच्या संदर्भातील लैंगिक शोषणाची माहिती ट्रम्प यांना होती; दस्तऐवजात गौप्यस्फोट

**वॉशिंग्टन डी.सी. : अनिल टाकळकर**



सेक्स ऑफेंडर जेफ्री एप्स्टीनने आपल्या वैयक्तिक ई-मेलमध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना अल्पवयीन मुलींच्या लैंगिक शोषणाबद्दल माहिती होती, परंतु त्यांचा त्यात सहभाग नव्हता, असे म्हटले आहे. यामुळे या वादाला नवे वळण मिळाले आहे. अमेरिकेच्या हाऊस ओव्हरसाइट कमिटीने प्रसिद्ध केलेल्या हजारो पानांच्या दस्तऐवजांमध्ये ही नोंद समोर आली आहे.

एप्स्टीनने १ फेब्रुवारी २०१९ रोजी स्वत:लाच पाठवलेल्या ई-मेलमध्ये लिहिले होते, 'ट्रम्प यांना हे सर्व माहीत होते. त्या काळात ते अनेकदा माझ्या घरी आले होते.' हा ई-मेल त्यांनी त्यांच्या आत्महत्येपूर्वी काही महिने आधी लिहिल्याचे स्पष्ट झाले. हा नवा खुलासा ट्रम्प यांनी याआधी केलेल्या दाव्याच्या विरोधी आहे. एप्स्टीनच्या २००८ च्या गुन्हेगारी कबुलीनाम्यापूर्वी त्यांना त्यांच्या अवैध कृतींची माहिती नव्हती, असे ट्रम्प यांनी सांगितले होते. एप्स्टीनला पाम बीच, फ्लोरिडामधील सामाजिक कार्यक्रमांतून आपण ओळखत होतो आणि मधल्या दशकात दुरावा निर्माण झाला, हे त्यांनी मान्य केले होते.

ट्रम्प यांनी या नव्या घडामोडीला राजकीय हल्ला ठरवत ४३ दिवस चाललेल्या शासकीय शटडाऊनवरून लोकांचे लक्ष वळवण्यासाठी डेमोक्रॅट्स ही प्रकरणे पुन्हा पुढे आणत असल्याचा आरोप केला. त्यांनी समाज माध्यमांवर डेमोक्रॅट्स हे राजकीय हेतूने जेफ्री एप्स्टीन फसवेगिरी प्रकरण वापरत आहेत, जेणेकरून त्यांच्या अपयशावर त्यांना पडदा टाकता येईल, असे लिहिले आहे. दरम्यान, काँग्रेसमध्ये एप्स्टीनच्या प्रकरणातील तपास नोंदी सार्वजनिक करण्यासाठी झालेल्या प्रयत्नांना निर्णायक पाठिंबा मिळाला. रिपब्लिकन आणि डेमोक्रॅट्स मिळून आवश्यक २१८ सह्या झाल्याने प्रस्ताव मतदानासाठी सादर झाला.

**एप्स्टीन हा अघोरी माणूस होता**

व्हाईट हाऊसच्या प्रवक्त्या कॅरोलिन लिव्हिट यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले, ट्रम्प यांनी २००७ मध्ये एप्स्टीनला आपल्या प्रॉपर्टीवर येण्यास बंदी घातली होती. कारण तो पेडोफाईल म्हणजे मुलांबरोबर लैंगिक कृत्ये करणारा अघोरी माणूस होता. एप्स्टीनच्या ई-मेलमधील उल्लेख एका पीडितेबद्दल होता. तिचे नाव दस्तऐवजांत लपवण्यात आले आहे. मात्र सूत्रांच्या माहितीनुसार ती व्हर्जिनिया ज्यूफ्रे असल्याचे समजते. ती २००० मध्ये मार-आ-लागो येथील स्पा अटेंडंट होती आणि मॅक्सवेलनेच तिला एप्स्टीनकडे नेले होते. या वर्षाच्या सुरुवातीला, वयाच्या ४१ व्या वर्षी तिने आत्महत्या केली.

# दुबईच्या अजमान फ्री झोनमध्ये १० हजार कंपन्या आणणार

## मुख्य कार्यकारी अधिकारी ऋषी सोमैया यांचे प्रतिपादन

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

'अजमान न्यू व्हेंचर्स सेंटर फ्री झोन' (एएनसीएफझेड)ची ऑक्टोबर २०२४ मध्ये स्थापना करण्यात आली. 'एएनसीएफझेड'ने पहिल्या वर्षात साडेसहा हजार व्यवसायांची नोंदणी करून महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. त्यामुळे २०२६ अखेर दहा हजार कंपन्या 'एएनसीएफझेड'मध्ये आणण्याचे लक्ष्य आहे, असे प्रतिपादन 'एएनसीएफझेड'चे मुख्य कार्यकारी अधिकारी ऋषी सोमैया यांनी केले.

अजमानमधील उच्चस्तरीय प्रतिनिधी मंडळ पहिल्यांदा भारत दौऱ्यावर आले आहे. त्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ऋषी सोमैया बोलत होते. यावेळी संचालक नासेर अल खनबाशी, वित्त संचालक मोहम्मद फाथी आदी उपस्थित होते. या वेळी ऋषी सोमैया म्हणाले की, 'एएनसीएफझेड'मध्ये ४५ टक्के कंपन्या भारतीय उद्योजकांच्या आहेत. येथील गुंतवणूकदारांना २ तासांत व्यवसाय परवाना, २४ तासांत व्हिसा, तसेच डिजिटल पोर्टल आणि सर्व प्रशासकीय कामांसाठी कुशल सपोर्ट टीम उपलब्ध करण्यात आली आहे. सुलभ, पारदर्शक प्रक्रियांमुळे 'अजमान' नव्या पिढीच्या उद्योजकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.

'एएनसीएफझेड'चे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन अब्दुल्ला अल नुआइमी म्हणाले, सध्या एएन-सीएफझेडमध्ये १५० हून अधिक देशांतील गुंतवणूकदार कार्यरत आहेत. एका वर्षात इतक्या मोठ्या प्रमाणावर कंपन्या स्थापन होणे हे जागतिक उद्योजकांच्या आमच्यावर असलेल्या विश्वासाचे प्रतीक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन, डिजिटल गेमिंग, क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीसारख्या क्षेत्रांपासून ते पारंपरिक व्यवसायांपर्यंत विविध उद्योगांना फ्री झोन व्यासपीठ मिळाले आहे. यावेळी संचालक नासेर अल खनबाशी, वित्तसंचालक मोहम्मद फाथी यांनी उद्योजकांचा वाढता सहभाग 'एएनसीएफझेड'साठी महत्त्वाचा असल्याचे सांगितले.




'एएनसीएफझेड'तर्फे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात मुख्य कार्यकारी अधिकारी ऋषी सोमैया, संचालक नासेर अल खनबाशी, वित्त संचालक मोहम्मद फाथी यांनी संवाद साधला.




